

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## भारतातील मानवाधिकार व कर्तव्ये – कायदा, नीती, समाज व अंमलबजावणी यंत्रणा




## पाठ्यपुस्तक – ३











# विद्यापीठ गीत

ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हें पवित्र तीर्थ मानतों
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्त्वपरीक्षा
हें विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

मंगेश पाडगांवकर

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# भारतातील मानवाधिकार व कर्तव्ये - कायदा, नीती, समाज व अंमलबजावणी यंत्रणा

## पाठ्यपुस्तक – ३

प्रा. डॉ. टी. एस. एन. सास्त्री
**मा. कुलगुरू तामिळनाडू डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ, चेन्नई**
माजी समन्वयक, मानव अधिकार शिक्षण कार्यक्रम,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

शुभ संदेश
महामहीम श्री. सी. विद्यासागर राव
माननीय राज्यपाल, महाराष्ट्र

उपोद्घात
प्रा. डॉ. नितीन करमळकर
कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

डॉ. एन. एस. उमराणी
प्र–कुलगुरु
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**प्रकाशक–**
कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**मुद्रणालय–**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रण विभाग
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
मराठी भाषांतर आवृत्ती २०१९.

सदर पुस्तकातील कोणताही भाग किंवा दर्शिका हे पुणे विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारे पुनर्प्रस्तुत करू नयेत.

या प्रकाशनात वापरल्या गेलेल्या बाह्य अथवा तृतीय पक्षाच्या इंटरनेट वेबसाईट URLs च्या अचूकतेशी व संलग्नतेशी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जबाबदार नाही; तसेच सदर वेबसाईटवरील मजकूर भविष्यात अचूक आणि योग्य राहील याचीही हमी देत नाही.

सा.फु.पु.वि.मु. – ६०७–०२–२०१९(पीसी–३)

भाषांतर सेवा
प्राचार्य डॉ भा. व्यं . गिरधारी
शासन प्राधिकृत अनुवादक भाषातज्ज्ञ
चलभाष क्रमांक.९८२३०१२३०१ ,
इ-मेल - bvgirdhari@gmail.com
पत्ता :- सदनिका क्रमांक जे – १२०२, आसावरी, नांदेड सिटी, सिंहगड रस्ता, धायरी फाट्याजवळ, पुणे ४११ ०६८

## भाषांतर प्रमाणपत्र

ज्या कुणाशीही संबंधित त्यांच्यासाठी

दिनांक: २५ / ०१/ २०१८

मी, डॉ भा. व्यं. गिरधारी असे घोषित करतो की मी इंग्लिश व मराठी भाषेमध्ये तज्ज्ञ आहे. दिनांक ७.८.२००१ रोजीच्या शासन निर्णय क्रमांक भाषा – १००१ / ७११ – प्रकरण क्रमांक ५३ – २००१ -२० –ब ह्या द्वारे महाराष्ट्र शासनाने भाषांतराचे काम करण्यास मला प्राधिकृत केले आहे. मी असे प्रमाणित करतो की प्रा. डॉ. टी. एस. एन सास्त्री यांनी लिहिलेल्या “ Introduction To Human Rights& Duties” असे शीर्षक असलेल्या इंग्रजी पुस्तकांचा मी मराठीमध्ये अनुवाद केला आहे.

मी असेही प्रमाणित करतो की माझ्या ज्ञानानुसार सोबत संलग्न मराठी मधील पुस्तक हे मूळ इंग्लिश पुस्तकाचा खरा व योग्य अनुवाद आहे . मूळ पुस्तकातील कायदेशीर गर्भितार्थ जुळून येण्यासाठी मूळ संहितेनुसार शैली व भाषा स्वीकारण्यात आली आहे.

भा. व्यं. गिरधारी

( डॉ. भा. व्यं. गिरधारी )

Dr. B.V. GIRDHARI
Govt. Authorised Translator
Panel Member
LNG -2007/68/ CASE No. 9-07-20
Dt. 18-1-2008
Directorate of Languages Maharashtra State

शासन प्राधिकृत अनुवादक व भाषातज्ज्ञ , महाराष्ट्र राज्य.

(सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in ह्या अधिकृत संकेतस्थळावर २००८०११८११५२०२१००१ ह्या संकेत क्रमांकावर उपलब्ध आहे.)

Seal :

# अनुक्रमणिका


**शुभ–संदेश**
**उपोद्घात**
**मनोगत**
**प्रस्तावना**
**संदेश**
**अभ्यासक्रमाचा पाठ्यक्रम**

**घटक १**

| | |
|---|---|
| **भारतीय संदर्भात मानवाधिकार** | **१–४१** |
| १. परिचय | १ |
| २. भारतीय अधिकारांची सनद विधेयक | १ |
| ३. सर्वोदयाची अर्थ व संकल्पना | ४ |
| ४. भरतीय राज्यघटनेचा थोडक्यात परिचय | ६ |
| ५. प्रस्तावना | ७ |
| ६. मुलभूत अधिकार | ८ |
| ७. राज्यकारभाराची मार्गदर्शक तत्वे | २५ |
| ८. मुलभूत कर्तव्ये | ३७ |
| ९. सारांश | ४१ |
| नमुना प्रश्न | ४२ |

**घटक २**

| | |
|---|---|
| **मानवाधिकार – अंमलबजावणीची यंत्रणा** | **४३–६३** |
| १. मानवाधिकारांवर एक धावता दृष्टीक्षेप भारतातील परिस्थिती | ४३ |
| २. राष्ट्रीय मानवाधिकार अधिनियम १९९३ | ४४ |
| ३. न्यायसंस्थेची अंगे | ४४ |
| ४. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग | ४९ |
| ५. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग | ५० |
| ६. महिला, बालके, अल्पसंख्यांक व अनुसूचित जाती व | ५१ |
| ७. राष्ट्रीय महिला आयोग | ५२ |
| ८. महाराष्ट्र राज्य महिला आयोग | ५३ |
| ९. राष्ट्रीय बालअधिकार संरक्षण आयोग | ५३ |
| १०. महाराष्ट्र राज्य बालअधिकार संरक्षण आयोग | ५४ |
| ११. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग | ५५ |
| १२. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती राष्ट्रीय आयोग | ५६ |
| १३. आंतरराष्ट्रीय यंत्रणांचे सर्वेक्षण | ५८ |
| १४. सारांश | ६२ |
| नमुना प्रश्न | ६३ |

## घटक ३

**मानवाधिकारातील अडथळे व भारतीय राज्यव्यवस्था** ६४-८३
१. समाजातील असमानता व मानवी अधिकार ६४
अ. लोकसंख्या ६५
ब. दारिद्र्य ६८
क. जात ७०
ड. कायदेशीर उपाय करण्यासाठी सुविधांचा अभाव ७३
२. कार्यकारी सत्तेचा गैरवापर - भ्रष्टाचार - आप्तानुग्रह व वशिलेबाजी ७५
३. मानवाधिकार व उत्तम शासन ७९
४. सारांश ८२
**नमुना प्रश्न** **८३**

## घटक ४

**समर्थन गटांची भूमिका** ८४-९९
१. परिचय ८४
२. समर्थक गटांची भूमिका ८५
३. व्यावसायिक संस्था ८५
अ. माध्यमे, ८५
ब. वकील यांच्या भूमिका - कायदेशीर मदत ८८
क. शैक्षणिक संस्था ९०
ड. समुदायिक क्षेत्राची भूमिका ९३
इ. बिगर शासकीय संस्था ९६
४. सारांश ९८
**नमुना प्रश्न** ९९-१००

**निष्कर्ष** १०१

**संदर्भ/निर्देशित संकेतस्थळे** १०२-१०७

## अभ्यासक्रम ३

### भारतातील मानवी अधिकार व कर्तव्ये – कायदा, धोरण, समाज व अंमलबजावणी यंत्रणा

### श्रेणी –१

**१ भारतीय संदर्भात मानवाधिकार**

अ) भारतीय अधिकार विधेयक व सर्वोदय

ब) प्रस्तावना – मुलभूत अधिकार – मार्गदर्शक तत्वे – मुलभूत कर्तव्ये

**२. मानवाधिकार – अंमलबजावणी यंत्रणा**

अ) मानवधिकार अधिनियम १९९३.

ब) न्यायालयीन अंगे – सर्वोच्च न्यायालय ( कलम ३२ ) व उच्च न्यायालय (कलम २२६)

क) राष्ट्रीय व महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग

ड) महिला, बालके, अल्पसंख्यांक , अनुसूचित जाती / जमाती आयोग

इ) आंतरराष्ट्रीय यंत्रणेचे सर्वेक्षण

**३) मानवाधिकारांचे उल्लंघन व भारतातील राज्यव्यवस्था**

अ) समाजातील असमानता – लोकसंख्या– निरक्षरता,–गरिबी– जात – कायदेशीर उपाय योजनेस अभिगम्यतेचा अभाव

ब) कार्यकारी अधिकारांचा दुरुपयोग – भ्रष्टाचार – आप्तानुग्रह व वशिलेबाजी

क) मानवाधिकार व उत्तम शासन

**४) पुरस्कर्त्या गटांची भूमिका**

अ) व्यावसायिक संस्था – वृत्तपत्रे, माध्यमे, वकील यांच्या भूमिका – कायदेशीर मदत

ब) शैक्षणिक संस्था

क) समुदायाची भूमिका

ड ) बिगर शासकीय संस्था

CH. Vidyasagar Rao
GOVERNOR OF MAHARASHTRA



RAJ BHAVAN
Malabar Hill
Mumbai 400 035
Tel. : 022-2363 2660
Fax.: 022-2368 0505

१६ फेब्रुवारी २०१९

# संदेश

आधुनिक काळात मानवाधिकारांचे संरक्षण आंतरराष्ट्रीय पातळीबरोबरच राष्ट्रीय पातळीवरही महत्त्वाचे मानले गेले आहे. मानवी स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी कायदे आणि संस्थात्मक यंत्रणा जर नसेल तर कायद्याचे राज्य या संकल्पनेलाच अर्थ राहत नाही. संस्थात्मक आणि कायदेशीर संरक्षणाबरोबरच नागरी संघटनांनीही मानवाधिकार संवर्धनासाठी आपला वाटा उचलायला हवा.

प्रस्तुत पुस्तक भारतातील मानवाधिकार व कर्तव्ये-कायदा, नीती, समाज व अंमलबजावणी यंत्रणा ह्या संबंधाने असून, विद्यापीठाच्या मानवाधिकार अभ्यासक्रमाअंतर्गत प्रकाशित होणाऱ्या तिसऱ्या पाठ्यपुस्तकाची ही अनुवादित आवृत्ती आहे.

सदर आवृत्ती प्रकाशित करण्यास प्रोत्साहन देणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू आणि मानवाधिकार अभ्यासक्रम यशस्वीपणे अंमलात आणणारे प्राध्यापक तसेच सहकाऱ्यांचे मी अभिनंदन करतो, तसेच या अभ्यासक्रमाला शुभेच्छा देतो.

**(चे. विद्यासागर राव)**
महाराष्ट्राचे राज्यपाल



मानवाधिकाराच्या प्रसारामध्ये सन १९४८ पासून UDHR - Universal Declaration of Human Rights च्या माध्यमातून गती निर्माण झाली. हे कार्य आणखी गतिमान होण्याकरिता संयुक्त राष्ट्र संघाने सन १९९३ मध्ये मानवाधिकार शिक्षण प्रसाराचे आवाहन केले. हे शैक्षणिक धोरण स्वीकारून सन २०११ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मानवाधिकार अभ्यासक्रमास प्राधान्य देऊन हा अभ्यासक्रम सर्वप्रथम अंमलात आणला.

मानवाधिकार अभ्यासक्रमाची ही तिसऱ्या पाठ्यपुस्तकाची भाषांतरित आवृत्ती आहे. त्यात मानवाधिकार व त्याची कर्तव्ये, कायदा, नीती, समाज व अंमलबजावणीकरिता आवश्यक यंत्रणांची सोप्या भाषेत चर्चा केली आहे. तसेच भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार, राज्यधोरणांची मार्गदर्शक तत्त्वे व मुलभूत कर्तव्ये यांची मांडणी अगदी सरळ व सोप्या भाषेत केलेली आहे.

कायदेशीर प्रक्रिया जपून ठेवण्याची तसेच ही प्रक्रिया गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. मानवाधिकारांची मूल्ये ही समाजात बिंबविण्याकरिता त्याचे मुलभूत शिक्षण व जाणीव हाच एक पर्याय आहे. म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने हा अभ्यासक्रम पदव्युत्तर स्तरावर अनिवार्य केला आहे.

विद्यापीठाचे कुलपती ह्या नात्याने अशा उपक्रमांना पाठबळ देणारे महाराष्ट्राचे राज्यपाल महामहीम मा. श्री. सी. विद्यासागर राव यांचे मी आभार मानतो. हा लक्षणीय कार्यक्रम अमलात आणणारे प्रा. डॉ. टी. एस. एन. सास्त्री (मा. कुलगुरू, तामिळनाडू डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ, चेन्नई) व त्यांच्या सहकाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करणे यथोचित ठरेल.

**संदर्भ क्र. व्हीसी/९०**
**दिनांक : ०७.०२.२०१९**

**प्रा. डॉ. नितीन करमळकर**
**कुलगुरू,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**



मानवाधिकार हा सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेला आहे. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता समता व सामाजिक न्यायाचे ध्येय साध्य करण्यासाठी मानवाधिकारांचे पालन करून, त्यांचा प्रसार करणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे.

उपरोल्लेखित तत्त्वांचा विचार करून संयुक्त राष्ट्रसंघाने एक शाश्वत आंतरराष्ट्रीय समाज विकसित करण्यासाठी सर्व राष्ट्रांना मानवाधिकारांचे शिक्षण देण्याचा अतिशय योग्य निर्णय घेतला आहे.

ह्या संदर्भात सर्व शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये मानवाधिकार अभ्यासक्रम अंमलात आणण्याचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय आणि त्या दृष्टीने घेतलेला पुढाकार प्रशंसनीय ठरला आहे. मानवाधिकारांच्या संदर्भात आपुलकी आणि आस्था निर्माण करण्यासाठी सर्व पुस्तके मराठी भाषेत भाषांतरित करण्याचा निर्णयसुद्धा योग्य दिशेने उचललेले पाऊल म्हटले पाहिजे.

विद्यापीठाचे कुलपती म्हणून विद्यापीठाच्या अशा शैक्षणिक उपक्रमांना सतत पाठबळ देऊन तो पूर्णत्वाला नेण्यासाठी सतत प्रेरणा दिल्याबद्दल मी महाराष्ट्राचे राज्यपाल महामहीम मा. श्री. सी. विद्यासागर राव यांचा अत्यंत आभारी आहे, तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. डॉ. नितीन करमळकर यांचा अत्यंत ऋणी आहे. मानवाधिकार अभ्यासक्रमाची सन २०११ पासून अंमलबजावणी करणारे प्रा. डॉ. टी. एस. एन. सास्त्री (मा. कुलगुरू, तामिळनाडू डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ, चेन्नई) यांच्या अविरत परिश्रमांचे मी कौतुक करतो.



**संदर्भ क्र. पी.व्हीसी/४२**
**दिनांक : ०९.०२.२०१९**

**प्रा. डॉ. एन. एस. उमराणी**
**प्र–कुलगुरु**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**



संयुक्त राष्ट्रांनी मानवाधिकार स्वीकारल्यामुळे प्रत्येक राष्ट्रांमध्ये हा अधिकार पायाभूत असा ठरला आहे. राष्ट्र हे लोकांचे प्रातिनिधीक अंग आहे, ह्या अधिकारांची राष्ट्रीय स्तरावर संस्थागत पद्धतीने वाढ करण्याची गरज आहे. राज्यघटनेने हमी दिलेली संस्थागत पद्धत ही कमजोर असलेल्या वैयक्तिक अधिकारांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोक्यापासून बचावते.

आधुनिकतेबरोबर भारतदेश सांस्कृतिक व बहुआयामी समाजाच्या विषमतेमध्ये व्यापला आहे. ही विषमता संपवून समानतेचा विचार आणण्यासाठी न्यायसंस्था मोलाचा वाटा निभविते आहे. न्यायप्रणाली कित्येक वर्षापासून न्यायिक व अन्यायिक अधिकार यांच्यातले भिन्न स्वरूप संपवून दोन्हीमध्ये दुवा स्थापित करण्याचे काम करत आहे. तसेच, राज्यघटनेतील प्रस्तावना, भाग तीन-मुलभूत अधिकार व भाग चार राष्ट्रीय धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे यांची उद्दिष्टपूर्ती करण्यास यशस्वी ठरेल, आणि तात्त्विक विचारसरणीच्या आंतरराष्ट्रीय कायद्याशी सूर जुळवून वैयक्तिक अधिकाराचे सर्व वेळी दहशतीपासून संरक्षण होईल.

तरीसुध्दा समाजात आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक फरक असलेले मानवी परिपूर्ण क्षमतेने विधिप्रदान अधिकारांची मोकळेपणाने अंमलबजावणी करताना समस्या उभ्या राहतात. प्रो. लक्ष्मीनाथ मानतात की, कायदा हे समाजाचे मुखसंरक्षण कवच आहे. तरीदेखील जोपर्यंत कायदा लोकल्याणासाठी सक्रिय सहभाग घेत नाही, तोपर्यंत सरकारी घोषणा ह्या कायदेशीरदृष्ट्या आश्वासने म्हणूनच राहतील. सुसंस्कृत समाजात मानवी संस्था व संबंधित गटाचे जाळे स्थापित झाले आहे व हे जाळे काबूत करण्यासाठी योग्य कायदेशीर यंत्रणा चलनात आणण्याची गरज आहे.

शिक्षण हे लोकशाहीचे पाचवे आधारभूत मूल्य आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या मताशी सहमत आहे की, अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी सुसंस्कृत समाजात महत्त्वाची भूमिका पार पाडेल. म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदव्युत्तर वर्गासाठी मानवाधिकार शिक्षणाअंतर्गत शोध प्रकल्पांची सुरूवात केली. त्याचबरोबर मुख्य उद्देश असा की, मानवाधिकाराची प्रगती व त्यासंदर्भातील पुढील वाटचाल केली जाईल, तसेच कर्तव्यदक्ष समाज कोणत्याही इतर लाभाव्यतिरीक्त पुढे येईल. इथे दिलेली छायाचित्रे विविध संयुक्त राष्ट्रांच्या

संकेतस्थळावरून उपलब्ध केली आहेत. तसेच त्यांचे घटक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, अशासकीय संघटना, संदर्भशोध यंत्रणा व इतर संकेतस्थळावरून घेतले आहेत. मानवाधिकाराचा संदेश सोप्या व सुलभतेच्या दृष्टीने दिला आहे. या संदर्भात स्वतः लेखक इतर लेखकांच्या संदर्भांचा व साधनांचा तसेच शोध घेतलेल्या संकेत स्थळांबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माननीय कुलपती आणि महाराष्ट्र राज्याचे राज्यापाल महामहीम सी. विद्यासागर राव व तसेच महाराष्ट्र राज्य यांनी पुणे विद्यापीठाअंतर्गत या उपक्रमास दिलेल्या सहकार्याबद्दल मी आभार व्यक्त करतो व मानवाधिकार उपक्रमाद्वारे मला सांस्कृतिक व अलौकिक महाराष्ट्रात सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल तसेच मी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर, यांनी विश्वास दाखवून विद्यापीठाच्या मानवाधिकार शिक्षण कार्यक्रमाचा समन्वयक म्हणून काम करण्यास परवानगी दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माजी कुलगुरू डॉ. आर. के. शेवगावकर, डॉ. वासुदेव गाडे आणि डॉ. संजय चहांदे यांनी दिलेल्या प्रोत्साहन आणि कार्यक्रम राबवण्यासाठीची दृष्टी दिल्याबद्दल शतश: ऋणी आहे. तसेच मानवाधिकार अभ्यासक्रमाचे समन्वयक, वरीष्ठ संशोधक सहकारी व इतर सर्व सदस्यांचे मी आभार मानतो. तसेच, विद्यापीठाच्या मुद्रणलयाचे अधिकारी श्री. दत्तात्रय कुटे व त्यांच्या सहकारी वर्गाचे पुस्तक प्रकाशनाबद्दल आभार मानतो.

काही त्रुटी माझ्या लिखाणातून राहिल्या असतील तर ती जबाबदारी मी स्विकारू इच्छितो. या कामी अजून प्रगतीसाठी व दर्जेदारपणासाठी तुमच्या काही मौलिक सुचना, संकल्पना असतील तर त्याचे स्वागत आहेच.

**दिनांक : १२.२.२०१९**

**प्रा. डॉ. टी. एस. एन. सास्त्री**
**कुलगुरू तामिळनाडू डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ चेन्नई**
माजी समन्वयक,
मानव अधिकार शिक्षण अभ्यासक्रम,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे



मानवाधिकार अभ्यासक्रम हा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या महत्वाच्या उपक्रमांपैकी एक उपक्रम आहे. मावाधिकार पाठ्य–पुस्तके ही सर्वप्रथम इंग्रजी भाषेत प्रकाशित झाली, वाढत्या प्रतिसादामुळे ती मराठी भाषेत प्रकाशित करण्याचे निश्चित झाले आहे. ह्या अभ्यासक्रमाद्वारे मानवधिकारांचे संरक्षण व मानवी मूल्यांची जपवणूक व जतन करून त्यांचा समाजासाठी सदुपयोग कसा होईल याची मार्मिक चर्चा केली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मा. कुलगुरू, प्रा. डॉ. नितीन करमळकर, मा. प्र–कुलगुरू, प्रा. डॉ. उमराणी, मानवविज्ञान विद्याशाखा अधीष्टाते डॉ. विजय खरे व विधी विभाग प्रमुख प्रा. डॉ. दुर्गाम्बेनी पटेल यांनी दर्शविलेला विश्वास आणि अभ्यासक्रमाची सोपविलेल्या जबाबदारी बद्दल मी शतशः आभारी आहे. तसेच प्रा. डॉ. दिलीप उके व प्रा. डॉ. मनोहर जाधव (मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांच्या सहकार्याचे आभार मानतो.

माजी मानवाधिकार अभ्यासक्रमाचे समन्वयक व सध्याचे तामिळनाडू डॉ. आंबेडकर विधीविद्यापीठ चेन्नई येथे कुलगुरू म्हणुन कार्यरत असलेले मा. प्रा. डॉ. टी एस एन सास्त्री यांनी केलेल्या मार्गदर्शनासाठी मी आभारी आहे. तसेच मानवाधिकार अभ्यासक्रमात सतत कार्यरत असणारे, शैक्षणिक सहयोगी सायली मु. चांदेकर, अजिंक्य वाघमारे व वरिष्ठ संशोधक सहकारी कश्मिरा लोणकर यांचेही आभार मानतो.



**दिनांक : १२.२.२०१९**

**प्रा. डॉ. नरेश वाघमारे**
**समन्वयक मानवाधिकार अभ्यासक्रम**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

# घटक १

## भारतीय संदर्भात मानवाधिकार

ह्या घटकामध्ये भारतीय संदर्भात मानवाधिकारांचा विकास कसा झाला, याबाबत विद्यार्थ्यांना परिचय करून देण्यात येईल. अनेक राज्यकर्त्यांनी सुस्थापित केलेल्या सामाजिक सिद्धांत व न्यायाच्या संकल्पनेला भारतीय दृष्टीकोनातून परिचय करून देते. भारतामधील मानवाधिकारांच्या चळवळीच्या विकासात सर्वोदय ह्या संकल्पनेचे योगदान व महत्व तसेच आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याच्या धर्तीवर घटनाकारांनी उत्क्रांत केलेल्या राज्यघटनेतील मुलभूत अधिकार व अधिकार, राज्यकारभाराची मार्गदर्शक तत्वे, ह्या संबंधातील घटनात्मक तरतुदी याची मार्मिक चर्चा ह्या घटकात केली जाईल.

### १. परिचय




मानवाधिकारांची संकल्पना भारतात नवीन नाही. भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक जीवनाचा तो अविभाज्य भाग आहे. प्राचीन ते अर्वाचीन काळापर्यंत आमच्या अनेक धार्मिक, सामाजिक व तत्वज्ञानी दर्शनांनी पाश्चात्य तत्वज्ञानाने पुरस्कृत केलेल्या अधिकारांच्या संस्कृतीच्या विपरीत, सतत कर्तव्याचा पुरस्कार केला. स्वांतत्र्य मिळाल्यानंतर आमच्या घटनाकारांनी पौर्वात्य व पाश्चात्य तत्वज्ञानाचा विचार करून आधुनिक भारताच्या राज्यव्यवस्थेच्या गरजांना पोषक अशा मानवाधिकार संकल्पना विकसित केल्या.

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार जाहीरनाम्याच्या तुलनेत भारतीय राज्यघटना ही नागरी, राजकीय, आर्थिक, व सामाजिक व सांस्कृतिक अशा अधिकारांचे स्वतंत्र घटक म्हणून तयार करण्यात यशस्वी झाली. एका अर्थाने भारतीय राज्यघटनेने पुरस्कृत केलेल्या अधिकारांच्या दोन गटांमुळे, संयुक्त राष्ट्रसंघाला भारतीय दृष्टीकोनाचा अवलंब करून नागरी अधिकारांचे विभाजन करून १९६६ मध्ये आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार व नागरी व राजकीय अधिकारांचे असे दोन स्वतंत्र जाहीरनामे घोषित करण्याचे काम सुकर झाले.

### २. भारतीय अधिकारांची सनद

प्राचीन व मध्ययुगीन भारतीय न्याय व इतर दर्शनांनी धर्माच्या विधीमान्य तत्वाद्वारे व्यक्तींच्या अधिकारांच्या वर्धनासाठी कर्तव्य ह्या मुलभूत संकल्पनेचा पुरस्कार केला. पण अर्वाचीन

काळात परकीय राज्यकर्त्यांच्या फोडा आणि झोडा नीतीमुळे व्यक्तीच्या अधिकारांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे गंभीर दुष्परिणाम झाले.

वसाहतवादी राज्यकर्त्यांच्या ह्या नीतीचा मुकाबला करण्यासाठी व त्यांना देशातून घालवून देण्यासाठी १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात आली. वसाहतवादी राज्यकर्त्यांच्या जोखडातून जनतेला मुक्त करण्यासाठी व प्रत्येक पातळीवर त्यांच्या अधिकारांची पुनर्स्थापना करण्यासाठी काँग्रेसच्या ह्या झेंड्याखाली अनेक चळवळी करण्यात आल्या. ह्या विविध चळवळीपैकी पूर्ण स्वराज्य व होमरूल चळवळीचे भारतीय अधिकारांची सनद तयार करण्यात महत्वाचे योगदान होते. ह्या संदर्भामध्ये ब्रिटीश वसाहतवादी राज्यकर्त्यांनी भारतीय जनतेला कोणते अधिकार बहाल करावेत ह्याबद्दल मोतीलाल नेहरू यांनी १९२८ मध्ये एक अहवाल सादर केला होता. नेहरूंच्या ह्या अहवालात अनुगणित केलेल्या अधिकारांना भारतीय अधिकारांची सनद असे संबोधले जाते. एका अर्थाने घटना समितीने राज्यघटनेचा मसुदा तयार करताना ह्या सनदेचा व्यापक प्रमाणावर आधार घेतला. सनदेमध्ये पुरस्कृत केलेले अधिकार खालीलप्रमाणे आहेत –

➢ शासनाचे सर्व वैधानिक, कार्यकारी व न्यायिक अधिकार व प्राधिकार हे जनतेपासून व्युत्पन्न झाले पाहिजेत व ते ह्या राज्यघटने नुसार अथवा अन्वये विधिवत स्थापित संस्थांच्या द्वारे भारतीय राष्ट्रकुटुंबामध्ये वापरले गेले पाहिजेत. (लोकशाहीचा अधिकार)

➢ विधीनुसार असलेली प्रक्रिया वगळून, कोणत्याही व्यक्तीस त्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित करता कामा नये किंवा त्याचे निवासस्थान किंवा संपत्ती मध्ये प्रवेश किंवा जप्त करता कामा नये. राष्ट्रकुटुंबाची स्थापना करताना विधिवत अधिग्रहित केलेल्या खासगी व वैयक्तिक संपत्तीचा मालकी अधिकार अबाधित राखण्याची ह्याद्वारे हमी देण्यात येत आहे.(कलम १९ नुसारची विविध स्वातंत्र्ये व कलम २१ नुसारचे स्वातंत्र्य यांच्याशी तुलना करता येईल.)

➢ सार्वजनिक सुव्यवस्था किंवा नैतिकतेच्या अधीन राहून प्रत्येक व्यक्तीच्या सद्सद्विवेकबुद्धीच्या तसेच व्यवसायाच्या व धर्माच्या स्वातंत्र्याची हमी हयाद्वारे देण्यात येत आहे. (कलम १९ व २५ नुसारचे स्वातंत्र्य यांच्याशी तुलना करता येईल.)

➢ सार्वजनिक सुव्यवस्था किंवा नैतिकतेच्या विरोधात नसलेल्या कारणा प्रीत्यर्थ असणारी मत व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्याचे तसेच निशस्त्र व शांततापूर्ण जमावाचे तसेच संघटना किंवा संस्था गठित करण्याच्या स्वातंत्र्याची हमी देण्यात येत आहे. (कलम १९ नुसारचे स्वातंत्र्य यांच्याशी तुलना करता येईल.)

➢ ६ ते १४ वर्षे वयाचा सर्व बालकांसाठी कोणताही प्रकारचा भेदभाव न करता राज्याने मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद केली आहे. (कलम २१ क शी तुलना करता येईल)

➢ नागरिक म्हणून प्रत्येक स्त्री व पुरुषास समान अधिकार असतील. (कलम १४ शी तुलना करता येईल)

➢ एखादे कृत्य करण्याच्या वेळेस कोणत्याही कायद्यान्वये ते शिक्षापात्र नसल्यास त्या कृत्याबाबत कोणत्याही व्यक्तीला शिक्षा करता येणार नाही. (कलम २० शी तुलना करता येईल)

➢ भेदभाव करणारा कोणताही मुलभूत किंवा प्रक्रियात्मक कायदा नसावा (कलम २० शी तुलनीय)

➢ सेवा कराराचा भंग करणे किंवा त्यास प्रोत्साहन देणे हा फौजदारी गुन्हा असता कामा नये. (कलम २१ शी तुलना करता येईल)

➢ प्रत्येक नागरिकाला हेबियस कॉर्पस अन्वये रिट अर्ज दाखल करण्याचा अधिकार असेल. युद्ध किंवा सशस्त्र बंडाळीच्या कालावधीत केंद्रीय विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असल्यास किंवा विधिमंडळाचे अधिवेशन सुरू नसल्यास महाराज्यपाल यांच्या द्वारे सदर अधिकार निलंबित केला जाऊ शकेल, तसेच असे केल्यास महाराज्यपालांनी अधिकारांच्या सदर निलंबनाच्या माहितीचा अहवाल लवकरात लवकर विधिमंडळला कळविला पाहिजे. (कलम ३२ आणि २२६ शी तुलनीय)

➢ भारतीय राष्ट्राकुलाचा किंवा त्या राष्ट्रकुलातील कोणत्याही राज्याचा कोणताही अधिकृत धर्म असणार नाही किंवा राज्य प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षवणे कोणताही धर्म बहाल करणार नाही किंवा त्यास प्राधान्य देणार नाही किंवा एखाद्या धार्मिक श्रध्दा किंवा दर्जामुळे कोणतीही अक्षमता लादणार नाही. (प्रास्ताविकेत प्रतिपादित केलेली धर्मनिरपेक्षता)

➢ राज्याने मान्यता दिलेल्या किंवा राज्याच्या निधीतून मिळत असणाऱ्या सर्व संस्थेशी संलग्न असलेल्या कोणत्याही जागेत जी काही धार्मिक उपासना चालवली जाईल त्या उपसनेस उपस्थित राहण्यास अशा कोणत्याही व्यक्तीने किंवा अज्ञान व्यक्तीच्या पालकाने अपली संमती दिल्याशिवाय आवश्यक केले जाणार नाही. (कलम २८ शी तुलनीय)

➢ कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास या किंवा यांपैकी कोणत्याही कारणांवरून राज्याच्या नियंत्रणाखाली कोणतेही सेवायोजन किंवा पद यांच्याकरिता अपात्र असणार नाही. (कलम १६ शी तुलनीय)

➢ सर्व सार्वजनिक रस्तेख विहिरी व सार्वजनिक वापराच्या सर्व ठिकाणी सर्व नागरिकांना समान अभिगम असेल व समान वापर करता येईल. (कलम १५ शी तुलनीय)

➢ कामगार व आर्थिक स्थिती यांच्यात सुधारणा करण्यासाठी व ती कायमस्वरूपी होण्यासाठी एकत्र येण्याचे व संघटना करण्याचे स्वातंत्र्य हे प्रत्येकाला व प्रत्येक व्यवसायाला असण्याची हमी देण्यात येत आहे. अशा स्वातंत्र्याचा संकोच किंवा बंधित करणारा कुठलाही करार किंवा उपाययोजना ह्या बेकायदेशीर असतील. (राज्यकारभाराच्या अनेक मार्गदर्शक तत्वांशी तुलना करता येईल)

➢ सेवा कराराचा भंग करणे किंवा त्यास प्रोत्साहन देणे हा फौजदारी गुन्हा असता कामा नये. (कलम २१ शी तुलना करता येईल)

➢ नागरिकांचे आरोग्य व तंदुरुस्ती कायम राखण्यासाठी, प्रत्येक कामगाराला जीवनमान वेतन प्राप्त होण्यासाठी, मातृत्व, बाल कल्याणाचे रक्षण होण्यासाठी, वृध्द वय, अपंगत्व व बेरोजगारीमुळे होणाऱ्या आर्थिक परिणाम थांबविण्यासाठी संसदेने कायदे केले पाहिजेत. शेतीच्या कुळांचे कालावधीचे कायमीकरण व भाडे वाजवी राहण्यासाठी सुद्धा संसदेने कायदे केले पाहिजेत. (राज्यकारभाराच्या अनेक मार्गदर्शक तत्वांशी तुलना करता येईल)

➢ शस्त्र बाळगण्याच्या व ठेवण्याच्या बाबत असणाऱ्या नियमांच्या नुसार प्रत्येक नागरिकाला शस्त्र बाळगण्याचा व धारण करण्याचा अधिकार असेल. (शस्त्रांचा अधिकार राज्यघटनेत समाविष्ट नाही)

➢ नागरिक म्हणून प्रत्येक स्त्री व पुरूषास समान अधिकार असतील. (कलम १४ शी तुलना करता येईल.)

## ३. सर्वोदयाची संकल्पना व अर्थ

सर्वोदयाच्या संकल्पनेचा उगम हा एतद्देशीय आहे. सर्व व उदय ह्या दोन शब्दांपासून त्याची व्युत्पत्ती आहे. सर्व म्हणजे सगळे व उदय म्हणजे विकास. थोडक्यात सर्वोदय म्हणजे सर्वांचा विकास. जॉन रस्किनच्या राजकीय अर्थशास्त्रावरील unto this last ह्या पुस्तकाचा अनुवाद करताना महात्मा गांधीजींनी १९०८ मध्ये ही संकल्पना सर्वप्रथम वापरली.




सर्वधर्मसमानत्व किंवा सर्वाभूतहित ह्या प्राचीन भारतीय तत्वज्ञानातील संकल्पनांना आधुनिक रूप देण्यासाठी महात्मा गांधींनी ह्या संकल्पनेचा वापर केला. सर्वोदय ही सामाजिक व वैधानिक संस्थांच्या मदतीने समाजाच्या सर्व थरातील लोकांचे कल्याण

शांततेने साधण्याची संकल्पना आहे. गांधीजींनी याचे थोडक्यात अहिंसा असे वर्णन केले. गांधीजींचे हे तत्व अतिशय लोकप्रिय झाले व जगभरातील व देशातील अनेक नेत्यांनी तिचा अंगीकार करून तिचा प्रसार केला. जगभरातील समकालीन मानवाधिकार चळवळीचा ही संकल्पना एक आधारस्तंभ ठरली.


Acharya Vinoba Bhave

गांधीजींनी सत्य, अहिंसा व प्रेम ह्या सार्वकालिक मुल्य असलेल्या तत्वांवर सर्वोदय चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. सर्वोदयाची संकल्पना ही भारतीय स्वातंत्र्यलढ्याची एक मुलभूत तत्व बनली. अनेक नेत्यांपैकी आचार्य विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, दादासाहेब धर्माधिकारी, धीरेंद्र मजुमदार, शंकरराव देव, के. जी. मश्रुवाला इत्यादींनी स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर सुद्धा सर्वोदयाच्या पथावरील आपली वाटचाल सुरूच ठेवली. आचार्य विनोबा भाव्यांनी शेतकरी व भूमिहीन लोकांच्या कल्याणासाठी पुरस्कृत केलेल्या ग्रामदान व भूदान चळवळीच्या संकल्पनेला लोकप्रियता लाभून त्यांना कायदेशीर कोंदण सुद्धा प्राप्त झाले.


Jayaprakash Narayan

आचार्य विनोबा भावे यांचे निधन झाल्यावर जयप्रकाश नारायण यांनी सर्वोदय ह्या संकल्पनेची धुरा आपल्या खांद्यांवर घेतली. त्यांनी एक पाउल पुढे टाकून देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दीर्घ पल्ल्याच्या शाश्वततेच्या दृष्टीने भूदान चळवळीशिवाय देशातील गावे ही स्वयंपूर्ण कशी होतील ह्यासाठी राज्याने झटण्याची गरज व्यक्त केली.

सर्वोदयाचा हा सर्वात महत्वाचा पैलू आहे असे त्यांना वाटत होते व अर्थव्यवस्था व जनतेची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी देशाने सर्व बाबतीत स्वावलंबी होण्याचे स्वप्न महात्मा गांधींनी पाहिले होते, ज्यायोगे राज्याकडून जास्त हस्तक्षेप न होता प्रत्येकाचे मानवाधिकार जपले जातील.

सर्वोदय ह्या संकल्पनेने स्वतंत्र भारतामध्ये अनेक पाउलखुणा मागे सोडल्या आहेत. शासनाने राष्ट्रीय व राज्य पातळीवर हाती घेतलेल्या विविध पंचवार्षिक योजना, अनेक योजना व कार्यक्रम त्या संकल्पनेभोवतीच फिरतात. ग्राम स्वराज्याचे सक्षमीकरण करणाऱ्या ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती हे सर्वोदयाचे मुलभूत तत्व आहे. मात्र खऱ्या अर्थाने ती संकल्पना राबविण्याच्या बांधिलकीच्या अभावामुळे समकालीन कालखंडात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. भारत

ही स्वयंपूर्ण ,चैतन्यमय राजीकीय व्यवस्था आहे त्यामुळे सर्वोदय तत्वाचे कसोशीने पालन करणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. सर्वोदयाचा अंगीकार केल्यास आपल्या आपल्या राजकीय व्यवस्थेला ग्रासत असलेल्या सद्य समस्या दूर होतीलच, पण भारतीय राज्यघटनेच्या प्रास्तविकात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी पुरस्कार केलेल्या सामाजिक न्यायाची संकल्पना साध्य करणे सुद्धा शक्य होईल.

## ४. भारतीय राज्यघटनेची थोडक्यात ओळख

संविधान सभेच्या देखरेखीखाली भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यात आला. मुळात संविधान सभेचे ३८९ सदस्य होते. मात्र ३ जून १९४७ रोजीच्या माउंटबॅटन योजनेनुसार फाळणी झाल्यामुळे पाकिस्तानसाठी एका वेगळ्या संविधान सभेची निर्मिती करण्यात आली. परिणामी भारताच्या संविधान सभेच्या सदस्यांची संख्या २९९ पर्यंत घटली. डॉ राजेंद्र प्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष होते व नंतर ते भारताचे पहिले राष्ट्रपती झाले. राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. त्यांच्या सोबत सहा अन्य सदस्यांची राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी निवड करण्यात आली. मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. पंडित गोविंद वल्लभ पंत, के. मा. मुन्शी, अल्लादी कृष्णास्वामी अय्यर, एन गोपालस्वामी अय्यंगार, बी एल मित्तर, एम डी सादुल्ला , डी पी खैतान हे अन्य सदस्य होते. पुढे १९५२ मध्ये आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश होणारे पहिले भारतीय सर बेतगल नरसिंह राव यांची संविधान सभेचे व मसुदा समितीला साहाय्य करण्यासाठी संवैधानिक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. मसुदा समितीने २ वर्षे, ११ महिने व १७ दिवसांमध्ये राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याचे आपले काम पूर्ण केले. मसुदा समितीने तयार केलेला मसुदा दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने मंजूर केला व संविधान २६ जानेवारी १९५० रोजी अस्तित्वात आले.

संरचनेत संघराज्यीय व एकात्म वैशिष्ट्यांमुळे प्राध्यापक के सी व्हीयर या अमेरिकी घटनातज्ञांनी आपल्या संविधानाचे निम्नसंघराज्यीय असे वर्णन केले आहे. तर भारताचे ख्यातनाम घटनात्मक कायदेपंडित, ग्रेंव्हील यांच्या शब्दात सांगायचे तर शांततेच्या काळात संघराज्यीय व युद्ध काळात एकात्म असे आपले संविधान आहे. मात्र काटेकोरपणे आपल्या संविधानाचे वर्णन करायचे तर हे सहकारी संघराज्यीय संविधान आहे. राज्यघटनेत ३९५ कलमे व १२ परिशिष्टे आहेत.

## ५. प्रस्तावना



PREAMBLE

WE THE PEOPLE OF INDIA having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all it's citizen

JUSTICE, social, economic and political
LIBERTY of thought, expression,belief, faith and worship
EQUALITY of status and of opportunity
and to promote among them all.
FRATERNITY assuring the dignity of individual and the unity and integrity of the nation.

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY the twenty-sixth day of November, 1949, do, HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION

प्रस्तावना म्हणजे संविधानाची ओळख करून देणारे, त्याच्या मुळाशी असलेली तथ्ये व अनुमा ने तपशील कथन करणारे, व त्यांचा उद्देश व ध्येये विषद करणारे विधान. अस्पष्टता किंवा मतभेद निर्माण झाल्यास संहितेच्या अर्थाची किंवा उद्देशाची उकल करणारे स्पष्टीकरण करण्याचा उद्देश आहे. प्रस्तावनेनुसार सार्वभौमत्वाचा संपूर्ण अधिकार कोणत्याही विधिवत अथवा संवैधानिक शासकीय संस्थेकडे नसून, केवळ फक्त भारतीय लोकांकडे आहे. त्यामुळे भारतीय संसदेसकट संविधानाद्वारे निर्माण करण्यात आलेली कोणतीही संस्था सार्वभौम नाही. मूळ संविधानानुसार भारताचे सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक असे वर्णन करण्यात आले आहे. सार्वभौमत्व फक्त लोकांकडेच असून कोणतीही पिढीजात राजेशाही किंवा व्यक्ती त्यावर अधिकार सांगू शकत नाही. याचा अर्थ असा की ह्या देशातील लोक राज्याघटनेने विहित केल्यानुसार ठराविक कालावधी नंतर त्यांच्या प्रतीनिधींच्या द्वारे ह्या देशाच्या राष्ट्रपतींसहित आपले सरकार निवडतात असे ही राज्यघटना ध्वनित करते.

समाजवादी व धर्मनिरपेक्ष हे शब्द प्रस्तावनेत बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीद्वारे १९७६ वर्षी समाविष्ट करण्यात आले. तसेच देशाची एकता ही शब्दांच्या ऐवजी देशाची एकता व अखंडता अशी शब्द योजना दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे चित्रात दर्शविल्यानुसारची प्रस्तावना आपल्याला दिसते .

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील, मानवी हकासंबंधीचे वैश्विक घोषणापत्रातील आदर्श व देशातील एतद्देशीय सामाजिक राजकीय - आर्थिक, कायदेशीर व सांस्कृतिक प्रतिबिंबाचा राज्यघटनेत समाविष्ट करणारी ही जगातील पहिली राज्यघटना आहे. वैश्विक मानवी अधिकार जाहीरनाम्यात सुद्धा न करण्यात आलेले हर्तनीय अशा नागरी व राजकीय अधिकारांचे मुलभूत अधिकार म्हणून व गैरहर्तनियअरप सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अधिकारांचे राज्यघटनेची मार्गदर्शक तत्वे म्हणून विभाजन करणारी ही जगातील पहिली राज्यघटना ठरली आहे. मानवी अधिकारासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्वांशी सुसंगती राखून राज्यघटनेने कलम ३८ द्वारे गैरहर्तनिय अधिकारांच्या अंमलबजावणीची जबाबदारी राष्ट्रावर सोपविली आहे. हे विभाजन आणि गैरहर्तनिय अधिकारांचा राज्यघटनेत समावेश ही राज्यघटनेच्या प्रस्तावनेशी सुसंगत असा कोणतेही भेदभाव न करता सर्वांना सामाजिक- आर्थिक न्याय मिळणारी उत्तम जीवनपद्धती

सर्वांसाठी उपलब्ध होईल ह्या आपल्या घटना परिषदेच्या दृष्टीची परिणीती आहे. नागरिकांना बहाल केलेली स्वातंत्र्ये हे फुकाचे आश्वासन नसून खऱ्या अर्थाने सदासर्वदा पूर्तता करावयाची बाब असल्याचे घटना परिषदेने पुरस्कृत केलेल्या मुलभूत अधिकारांच्या मागील तत्व आहे. ह्या आश्वासनामुळेच घटनाकारांनी निश्चित केलेल्या उद्दिष्टाचे कोणत्याही विचलनाशिवाय पालन होणे सुनिश्चित करण्यासाठी सुद्धा न्यायपालिकेला योग्य त्या जबाबदारीचे काटेकोरपणे निर्वाहन करावे लागले. त्यामुळेच थोडक्यात सांगावयाचे तर प्रस्तावना भारतीय लोकांच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व तर करतेच पण आंतरीराष्ट्र्य मानवाधिकार कायद्यांच्या न्यायशास्त्रीय अनुक्रियेशी सुसंगत उद्दिष्टे साध्य होतील याची सुनिश्चिती करते.

अधिक माहितीसाठी http://parliamentofindia.nic.in/ls/debates/facts.htm

## ६. मुलभूत अधिकार

न्यायशास्त्रानुसार अधिकारांचा इतिहास हा नैसर्गिक न्यायचाच एक भाग असून मानवाच्या उत्पत्तीपाशी जाऊन भिडतो. मात्र तत्वज्ञानातील तफावत व जगभरातील राज्यकर्त्यांकडून वैयक्तिक अधिकारांच्या होत असलेल्या हननामुळे सन १२१५ मध्ये मॅग्ना कार्टाच्या स्वीकारासोबत मानवाधिकारांच्या आधुनिक संकल्पनांचा जन्म झाला. तिथपासून राष्ट्रीय कायद्यामध्ये अनेक जाहीरनामे, करार व घटनात्मक दस्तैवजांनी मानवाधिकारांच्या विकासासाठी हातभार लावला. मात्र त्याला आंतरराष्ट्रीय समुदायाचे पाठबळ नसल्यामुळे युद्धामध्ये व्यक्तींच्या अधिकारासोबत शांतता व सुरक्षा सुद्धा अस्थिर होऊन धोक्यात आल्या. आंतरराष्ट्रीय कायद्याची आधारभूत संकल्पना असलेल्या सुरक्षा व शांतता साध्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सनदेच्या रचनाकारांनी नैसर्गिक अधिकारांना मानवाधिकार संबोधून त्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. व्यक्तीच्या अधिकाराचा आदर करण्याच्या आपल्या आश्वासनाचा पुनरुच्चार करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी सन १९४८ मध्ये मानवी अधिकारांचा वैश्विक जाहीरनामा स्वीकृत केला. शांतता व सुरक्षितता बहरण्यासाठी जगभरातील लोकांना नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांची हमी देण्याबाबत राष्ट्रराज्यांवर जबाबदारी सोपविण्याचा वैश्विक मानवाधिकार जाहीरनाम्याचा आदेश आहे. मानवी अधिकारांच्या वैश्विक जाहीरनाम्याच्या कलम २९ अन्वये अधिकारांचा उपभोग घेत असतानाच आपल्या कर्तव्यांचे पालन सुद्धा कोणत्याही विचलनाशिवाय करण्याची जबाबदारी व्यक्तींवर टाकली आहे.



भारताची व आंतरराष्ट्रीय समुदायाची वैचारिक व तत्वज्ञानात्मक बैठक लक्षात घेऊन संविधान सभेने मानवाधिकार तत्वांचा समावेश मुलभूत अधिकार व राज्यकारभाराच्या मार्गदर्शक तत्वांच्या स्वरुपात राज्यघटनेत केला. कर्तव्यांची संकल्पना राज्यघटनेच्या मूळ मसुद्यात नव्हती. मात्र ४२व्या घटनात्मक दुरुस्तीद्वारे त्यांचा समावेश करण्यात आला. नागरी व राजकीय अधिकार असे वर्णन केलेल्या मुलभूत अधिकारांशी संबंधित तरतुदी राज्यघटनेच्या कलम १२, ते ३५, २२६, ३५८ व ३५९ मध्ये दिसून येतात. सदर मुलभूत अधिकार म्हणजे संयुक्त राष्ट्रांच्या मानवी अधिकार विषयक वैश्विक जाहीरनामा, व भारतीय राज्यसंस्थेच्या एतद्देशीय तत्वज्ञानाचे मिश्रण आहे. भारतीय राज्यघटनेत विषद करण्यात आलेल्या विविध अधिकारांपैकी काही अधिकार हे आंतरराष्ट्रीय जाहीरनामे व करारांशी समतुल्य आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवरील नागरी व राजकीय अधिकारांशी समतुल्य असलेल्या मुलभूत अधिकारांचा एक तुलनात्मक तक्ता सर्वांच्या समजुतीसाठी खाली प्रस्तुत केला आहे.

| मुलभूत अधिकाराचे नाव व भारतीय राज्य घटनेतील कलम | वैश्विक मानवाधिकार जाहीरनामा १९४८ मधील समतुल्य / जवळपास तुलना करता येईल असे कलम | अंतरराष्ट्रीय नागरी व राजकीय अधिकार करारनाम्यातील समतुल्य / जवळपास तुलना करता येईल असे कलम |
|---|---|---|
| कलम १४ भारताच्या भौगोलिक हद्दीत सरकार कोणत्याही व्यक्तीला कायद्यापुढे समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही | कलम ७ – सर्वजण कायद्यापुढे समान आहेत व कोणताही भेदभाव न होता कायद्याचे समान संरक्षण मिळण्यास अधिकार पात्र आहेत. सदर जाहीरनाम्याचे उल्लंघन करून कोणत्याही प्रकारे भेदभाव होण्यापासून किंवा कोणत्याही प्रकारे अशा भेद्भावास प्रोत्साहन मिळण्यापासून संरक्षण मिळण्यास प्रत्येकजण अधिकारपात्र आहे . | कलम १४(१) – न्यायालये व न्यायाधिकरणे यांच्या समक्ष सर्व व्यक्ती समान आहेत. त्या व्यक्ती विरुद्ध कुठलाही फौजदारी आरोप किंवा कायद्यानुसार खटल्यामधील त्याचे अधिकार व दायीत्वे निर्धारित करताना कायद्याने स्थापित सक्षम, स्वतंत्र व निष्पक्षपाती न्यायाधीकरणाकडून वाजवी व सार्वजनिक सुनावणीचा प्रत्येकाला अधिकार आहे. नैतिकता, सार्वजनिक सुव्यवस्था किंवा राष्ट्रीय सुरक्षिततेच्या कारणास्तव किंवा पक्षकारांच्या खासगी जीवनातील हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी आवश्यक असल्यास किंवा न्यायालयाच्या अभिप्रायानुसार विशेष परिस्थितीमध्ये सार्वजनिक सुनावणीचा न्यायदानावर विपरीत परिणाम होणार असल्यास, लोकशाही समाजामध्ये माध्यमे व नागरिकांना कामकाजातून वगळण्यात यावे. परंतु बालगुन्हेगारांचे अन्यथा हितरक्षण करण्यासाठी किंवा वैवाहिक विवादाशी संबंधित कामकाज किंवा मुलाच्या पालकत्वाच्या बाबी वगळता मधील अन्य सर्व गुन्हेगारी प्रकरणे किंवा कायदेशीर खटल्यांमधील न्यायनिर्णय हे सार्वजनिक करण्यात आले पाहिजेत |

| | | |
|---|---|---|
| कलम १५ (१) - सरकारने कोणत्याही व्यक्तीविरुद्ध फक्त धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान किंवा ह्यापैकी कोणत्याही मुद्द्यावर भेदभाव करता कामा नये. | कलम २ - धर्म, वर्ण, लिंग, भाषा, राजकीय किंवा अन्य अभिप्राय, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूळ, संपत्ती, जन्म किंवा अन्य स्थितीवर आधारित भेदभाव न करता प्रत्येक जण सदर जाहीरनाम्यामध्ये नमूद सर्व अधिकार व अधिकार मिळण्यास पात्र असतील | कलम २ - धर्म, वर्ण, लिंग, भाषा, राजकीय किंवा अन्य अभिप्राय, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूळ, संपत्ती, जन्म किंवा अन्य स्थितीवर आधारित भेदभाव न करता प्रत्येक जण सदर जाहीरनाम्यामध्ये नमूद सर्व अधिकार व अधिकार मिळण्यास पात्र असतील |
| कलम १६ (१) शासनाच्या कोणत्याही पदावर नोकरी किंवा नियुक्ती होण्याबाबत सर्व नागरिकांना समान संधी उपलब्ध असेल | कलम २३ (१) प्रत्येकाला कामाच्या रोजगाराची निवड करण्याचा, कामाच्या वाजवी व अनुकूल अटी असण्याचा व बेरोजगारी पासून संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे. | कलम २५ - कलम २ मध्ये नमूद भेदभाव व अवाजवी बंधनाशिवाय प्रत्येक नागरिकाला देशाच्या सार्वजनिक सेवेत समानतेच्या अटीवर अभिगमाच्या बाबतीत अधिकार व संधी असेल. |
| भाषण व अभिव्यक्तीचा अधिकार - कलम १९(१)(अ) सर्व नागरिकांना भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल. | कलम १९- प्रत्येकाला अभिप्राय व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असेल. सदर अधिकारामध्ये कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय अभिप्राय धारण करण्याचा व सरहद्दीच्या निरपेक्ष कोणत्याही माध्यमातून माहिती व कल्पना प्रसूत करण्याचा अधिकार अनुस्यूत आहे | कलम १९- (१) प्रत्येकाला कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय अभिप्राय स्वातंत्र्य असेल. २. प्रत्येकाला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असेल. सदर अधिकारामध्ये कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय अभिप्राय धारण करण्याचा व सरहद्दीच्या निरपेक्ष कोणत्याही माध्यमातून तोंडी, लेखी, किंवा छापील स्वरुपात किंवा कलेच्या स्वरुपात किंवा त्याने निवडलेल्या कोणत्याही इतर माध्यमातून माहिती व कल्पना प्रसूत करण्याचा अधिकार अनुस्यूत आहे |

| | | |
|---|---|---|
| कलम १९ (१) (ब) – सर्व नागरिकांना शांततापूर्ण व निशस्त्र जमाव करण्याचा अधिकार असेल | कलम २० – १. प्रत्येकाला शांततापूर्ण व निशस्त्र जमाव करण्याचा अधिकार असेल २. संघटनेशी संबंधीत होण्याची कोणालाही सक्ती करता येणार नाही. | कलम २१ – शांततापूर्ण जमाव करण्याच्या अधिकारास मान्यता द्यावी लागेल. कायद्यानुसार सुसंगत असणारी बंधने व लोकतांत्रिक समाजामध्ये राष्ट्रीय किंवा सार्वजनिक सुरक्षितता, सार्वजनिक सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य किंवा नितीमत्ता व इतरांचे अधिकार व स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी आवश्यक असलेली बंधने वगळता ह्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यावर कोणतीही बंधने नसावीत. |
| कलम १९ (१) – सर्व नागरिकांना संघटना किंवा संस्था स्थापन करण्याचा अधिकार असेल. | कलम २३(४) – आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाला त्याच्या आवडीप्रमाणे संघटना स्थापन करण्याचा व त्यात सामील होण्याचा अधिकार आहे | कलम २२(१) आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाला त्याच्या आवडीप्रमाणे संघटना स्थापन करण्याचा व त्यात सामील होण्याचा अधिकार आहे |
| कलम १९(१) सर्व नागरिकांना भारताच्या भौगोलिक हद्दीत ड)कुठेही फिरण्याचा. इ) कुठेही राहण्याचा व स्थाईक होण्याचा अधिकार असेल | कलम १३(१) – प्रत्येक राज्याच्या हद्दीमध्ये कुठेही फिरण्याचा व रहिवास करण्याचा प्रत्येकाला अधिकार असेल | कलम १२(१) प्रत्येक राज्याच्या हद्दीमध्ये कुठेही फिरण्याचे व रहिवास निवडण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला असेल |
| कलम १९(१) (ग) प्रत्येक नागरिकाला कोणताही व्यवसाय किंवा व्यापार , धंदा करण्याचा अधिकार असेल. | कलम २३(१) प्रत्येकाला कामाचा, रोजगाराचा मुक्त अधिकार, कामाच्या न्याय्य व अनुकूल शर्तीचा अधिकार व बेरोजगारीपासून संरक्षण असेल | |

| | | |
|---|---|---|
| कलम २० (१) कोणतीही कृती करण्याच्या वेळेस प्रचलित कायद्यानुसार असलेले गुन्हे वगळता कोणत्याही व्यक्तीला त्याच्या कोणत्याही कृत्यासाठी दोषी ठरविता कामा नये किंवा कायद्यानुसार विहित केलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा ठोठावता कामा नये. | कलम ११ (२) कोणतीही कृती करण्याच्या किंवा टाळण्याच्या वेळेस राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार गुन्हा नसलेल्या कोणत्याही कृत्यासाठी कोणालाही दोषी ठरविता कामा नये किंवा त्यावेळेस कायद्यानुसार विहित केलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा ठोठावता कामा नये | कलम १५ (१) कोणतीही कृती करण्याच्या किंवा टाळण्याच्या वेळेस राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार गुन्हा नसलेल्या कोणत्याही कृत्यासाठी कोणालाही दोषी ठरविता कामा नये किंवा त्यावेळेस  कायद्यानुसार विहित केलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा ठोठावता कामा नये. |
| कलम २० (२) - कोणत्याही व्यक्तीला एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा जास्त वेळा अभियोग करून शिक्षा ठोठावता कामा नये | | कलम १४(७) - कायद्यानुसार एखाद्या गुन्ह्यासाठी एकदा अंतिमतः दोषी किंवा निर्दोष ठरल्यानंतर त्याच्यावर पुन्हा त्याच गुन्ह्यासाठी अभियोग चालवून शिक्षा ठोठावता येणार नाही |
| कलम २०-(३) कोणत्याही व्यक्तिला स्वतः विरुद्ध साक्ष देण्यास भाग पाडता कामा नये. | | कलम १४(३) कोणताही फौजदारी आरोप निर्धारित करताना प्रत्येक व्यक्तीला पूर्ण समानतेने खालील हमीचा अधिकार असेल<br>अ) त्याला समजणाऱ्या भाषेत त्याच्याविरुद्ध असणाऱ्या आरोपांचे स्वरूप व कारण त्वरित विषद करून सांगितले गेले पाहिजे. |

| | | |
|---|---|---|
| कलम २१ – कायद्याने विहित केलेली प्रक्रिया वगळता कोणत्याही व्यक्तीला त्याचे जीवन किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्या-पासून वंचित करता कामा नये | कलम ३ – प्रत्येकाला जीवन, स्वातंत्र्य व व्यक्तिगत सुरक्षिततेचा अधिकार असेल. | कलम ६(१) – प्रत्येक व्यक्तीला जीवनाचा अंतर्हित अधिकार आहे. हा अधिकार कायद्याने संरक्षित असला पाहिजे. कोणाचेही जीवन अनियंत्रित पद्धतीने हिरावून घेता येणार नाही.<br>कलम ९ (१) प्रत्येकाला स्वातंत्र्य व व्यक्तिगत सुरक्षिततेचा अधिकार असेल. कोणालाही अनियंत्रित पद्धतीने अटक किंवा स्थानबद्ध करता येणार नाही. कायद्याने विहित केलेली प्रक्रिया व कारणे वगळता कोणालाही त्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित ठेवता येणार नाही |
| कलम २१ क – शासनाने विहित केलेल्या कायद्यातील पद्धतीनुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात येईल | कलम २६ – प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार असेल. किमान प्राथमिक व मुलभूत शिक्षण मोफत असले पाहिजे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असले पाहिजे. | |
| कलम २२ (१) कोणत्याही व्यक्तीला अटकेची कारणे लवकरात लवकर कळविल्याशिवाय कोठडीत अटक करता कामा नये किंवा | कलम ९ – कोणालाही अनियंत्रित पद्धतीने अटक, स्थानबद्ध किंवा अज्ञातवासात पाठवता येणार नाही | कलम ९ (२) अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीस त्याच्या अटकेची कारणे व त्याच्याविरुद्ध असणाऱ्या आरोपांची माहिती दिली पाहिजे.<br>(३) अटक किंवा स्थानबद्ध केलेल्या कोणत्याही व्यक्तीस न्यायाधीश किंवा न्यायालयीन अधिकार वापरण्यास |

| | | |
|---|---|---|
| त्यांच्या पसंतीच्या विधी व्यवसायीचा विचार घेण्याचा व त्यांच्या मार्फत बाजू मांडण्याचा अधिकार नाकरता कामा नये.<br>(२) अटक केलेली जागा ते न्यायालयात दंडाधिकाऱ्यासमक्ष हजर करण्यासाठी लागणारा कालावधी वगळून अटक केलेल्या व कोठडीत ठेवलेल्या प्रत्येक व्यक्तीस चोवीस तासांच्या कालावधीत हजर केले पाहिजे व अशा व्यक्तीला दंडाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय कोठडीत ठेवता कामा नये. | | कायद्याने प्राधिकृत असलेल्या अधिकाऱ्यासमक्ष हजर केले पाहिजे व रास्त कालावधीत खटला चालविण्यास किंवा सुटका होण्यास त्याचा अधिकार असेल.<br>(४) ज्या व्यक्तीला अटक किंवा स्थानबद्ध करून स्वातंत्र्यापासून वंचित केले असेल त्याच्या स्थानबद्धतेची कायदेशीरता तपासण्यासाठी त्याला विनाविलंब न्यायालयाचे साहाय्य घेता येईल व सदरप्रमाणे तपासणी होऊन स्थानबद्धता बेकायदेशीर असल्यास न्यायालय त्याची सुटका करण्याचे आदेश देईल. |
| कलम २३(१) मानवी व्यापार व भिक व अन्य स्वरुपाच्या बेठ्बिगारी कामावर बंदी असून सदर तरतुदीचे उल्लंघन झाल्यास कायद्यानुसार तो शिक्षेस पात्र गुन्हा असेल. | | कलम ८ (३)(अ) कोणालाही सक्तीचे किंवा अनिवार्य श्रम करण्यास बाध्य करता येणार नाही |

| | | |
|---|---|---|
| कलम २५ – (१) सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता व आरोग्य व ह्या भागातील अन्य तरतुदींच्या अधीन राहून सर्व व्यक्तींना सद्सद्विवेकबुद्धीचा अधिकार असेल व आपला धर्म आचरण करण्याचा, व त्याचा प्रसार करण्याचा अधिकार असेल. | कलम १८ – प्रत्येकाला विचार, सदसद्विवेकबुद्धी व धर्माच्या स्वातंत्र्याचा अधिकार असेल ; सदर अधिकारात स्वतः किंवा इतरांच्या सोबत धर्म किंवा श्रद्धा यांचे शिक्षण, अंगीकार, पालन करण्याचा किंवा पुजापद्धती अनुसरण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार समाविष्ट असेल | कलम १८ – (१) प्रत्येकाला विचार, सदसद्विवेकबुद्धी व धर्माच्या स्वातंत्र्याचा अधिकार असेल ; सदर अधिकारात स्वतः किंवा इतरांच्या सोबत धर्म किंवा श्रद्धा यांचे शिक्षण, अंगीकार, पालन करण्याचा किंवा पुजापद्धती अनुसरण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार समाविष्ट असेल.<br>२. आपल्या आवडीचा धर्म किंवा श्रद्धा अनुसरण्याच्या अधिकारावर अतिक्रमण होईल अशा प्रकारची कोणावरही जबरदस्ती होता कामा नये. |
| कलम ३२ – सदर खंडामध्ये हमी देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात योग्य ते कामकाज होण्यासाठी अर्ज सादर करण्याचा अधिकार | कलम ८ – राज्यघटनेने किंवा कायद्याने बहाल केलेल्या मुलभूत अधिकार उल्लंघन होत असल्यास सक्षम राष्ट्रीय न्यायाधिकरणाकडून परिणामकारक उपाययोजना करवून घेण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. | कलम २(३) – अ) सदरमध्ये अतंर्हित अधिकार किंवा अधिकारांचे कोणत्याही प्राधिकृत क्षमतेत कार्यरत असलेल्या व्यक्तीकडून उल्लंघन होत असल्यास, त्यावर योग्य अशी उपाययोजना सुनिश्चित करण्याची व<br>ब) अशी उपाययोजना दावित करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला सक्षम न्यायालयीन, प्रशासकीय किंवा वैधानिक प्राधिकरणाकडून किंवा शासनाच्या कायदा प्रणालीने तरतूद केलेल्या इतर कोणत्याही सक्षम प्राधिकरणाकडून आपला अधिकार शाबित करून घेण्याचा व न्यायालयीन उपाययोजनाच्या शक्यता विकसित करण्यास,सदर करारनाम्यावर स्वाक्षरी करणारा राष्ट्रपक्ष कटिबद्ध आहे. |

राज्यघटनेच्या तरतुदीनुसार मुलभूत अधिकार हे आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्यांच्या नागरी व राजकीय अधिकारांच्या समतुल्य असल्यामुळे दावित अधिकार आहेत. शासन व त्यांच्या विविध अभिकरणाच्या विरुद्ध दावित करता येऊ शकतात. व्यक्ती व वैधानिक व्यक्ती (कायद्याद्वारे निर्माण केलेल्या संस्था किंवा अभिकरणे) असे दावे करू शकता. मात्र वैधानिक व्यक्तींना कायद्याने बहाल केलेले अधिकार मर्यादित आहेत.

अजय हसीजा विरुद्ध खालिद मुजीब सुर्हावर्दी प्रकरणी AIR 1981 SC 487 सर्वोच्च न्यायालयाने निर्वचन केल्यानुसार राज्यघटनेने हमी दिलेल्या सदर अधिकारांच्या बाबत दावे करण्यासाठी शासन म्हणजे संघराज्याचे व राज्यांचे सरकार किंवा राज्यघटनेच्या कलम १२ नुसार शासनाकडून निधी स्वीकारणाऱ्या कोणत्याही संस्था किंवा अभिकरणे.

कलम १३ हे सर्व मुलभूत अधिकारांच्या पायाभरणीचा दगड समजला पाहिजे. मुलभूत अधिकारांचा उल्लंघन होणारे कोणतेही कायदे अमलात न आणण्याची जबाबदारी हे कलम शासनावर टाकते. मुलभूत अधिकारांच्या मुक्त उपयोगावर अवाजवी बंधने आणणारा शासन व त्याच्या अभिकरणाचा कोणताही कायदा खारीज करण्याचा अधिकार हे कलम न्यायसंस्थेला देते.

## समानतेचे कलम



मुलभूत अधिकारांचा मुक्त वापर करण्यासाठी समानता हा महत्वाचा घटक आहे. कायद्याच्या नजरेत सर्व लोक समान आहेत व त्यांना कायद्याचे समान संरक्षण उपलब्ध आहे असा याचा अर्थ होतो. डायसी ह्यांच्यानुसार न्यायोचित कारणांसाठी लोकांचा एखाद्या समूहाला प्राधान्याची वागणूक मिळत असली,तरी समानतेची संकल्पना भेदभावाची असल्याचे ध्वनित होत नाही.

कायद्याचे समान संरक्षण म्हणजे समान परिस्थितीत असणाऱ्या सर्व व्यक्तींचा कायदा अमलात आणणाऱ्या उद्देशाशी संबंध असेल. त्यानुसार समान कायदे समान पातळीवरील सर्वच व्यक्तींना लागू होईल अशा कायद्याचे सर्वांना समान संरक्षण अशा संकल्पनेचा अर्थ होत नाही. कलम १४ अंतर्गत समानतेची संकल्पना नागरिक तसेच विदेशीयांना सुद्धा लागू होतो.

समानतेच्या अधिकाराच्या संकल्पनेचा विचार राज्यघटनेच्या कलम १४ ते १८ मध्ये केलेला आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक पार्श्वभूमीचा विचार करून सदर कलमांमध्ये लोकांच्या विविध गटांना काही सवलती देण्यात आलेल्या आहेत. त्या गटांना लागू

करण्यात आलेल्या सवलती फक्त त्यांनाच लागू आहेत. वंचित गटांची उन्नती साधून त्यांना समाजातील इतर विकसित गटांच्या बरोबरीस आणणे हा ह्यामागील विचार आहे. समानतेच्या संकल्पनेनुसार विविध गटांना लागू करण्यात आलेल्या विविध सवलती पूर्णपणे न्यायोचित आहेत. समानता ही कायद्याची विस्तारित संकल्पना असल्यामुळे कायदे समान पातळीवरील समानांना लागू करता येतात, पण समान व असमानांमध्ये लागू करता येत नाहीत.




## कलम १५ नुसार भेदभावावर बंदी

वरील कलम, कलम १४ नुसार कायद्यापुढे समानता या बोधाचे संवेदनशीलपणे समर्थन करते. त्याचवेळेस कायद्यासमोर सर्व समान व कायद्याचे समान संरक्षण ह्यामधील अस्सल हेतू साध्य करण्यासाठी त्यांच्यामधील असमानता नष्ट करण्यासाठी महिला, बालके, नागरिकांचे शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास गट, व अनुसूचित जाती व जमाती यांना देण्यात आलेल्या सवलती न्यायोचित असल्याचे समर्थनही हे कलम करते. त्यामुळे लोकांच्या विविध गटांना लागू करण्यात आलेल्या विविध सवलती कोणत्याही प्रकारे भेदभाव करणाऱ्या नाहीत.



## कलम १६ नुसार सार्वजनिक रोजगारामध्ये संधीची समानता

हे कलम, कलत १४ च्या समानअधिकाराची विस्ताररुपी संकल्पना आहे. सदर कलमानुसार नागरिकांना सार्वजनिक सेवेमध्ये कोणताही भेदभाव न करता समान संधी देण्यात आली पाहिजे. मात्र सदर कलमानुसार विविध गटांना शासनाने लागू केलेल्या विविध सवलतींमुळे नागरिकांमधील सर्वसामान्य समानतेच्या तत्वाला भेदभावाची बाधा होत नाही. त्याचवेळी सदर कलम कोणत्याही नागरिकाला रोजगार प्राप्त करण्याच्या अधिकाराची कोणत्याही प्रकारे हमी देत नाही हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.



## कलम १७ नुसार अस्पृश्यतेचे निर्मुलन

कलम १४ अन्वये हमी देण्यात आलेल्या समानतेच्या संकल्पनेचा हे कलम म्हणजे विस्तार आहे. अस्पृश्यतेची व्याख्या राज्याघटनेत व नागरी अधिकार संरक्षण अधिनियम १९५५ मध्ये कुठेही केलेली नसली तरीही लोकांच्या एका वर्गाकडून समाजातील वंचित लोकांच्या बाबतीत अवलंबिल्या गेलेल्या कोणत्याही प्रकारच्या भेदभावाच्या प्रथा असा अर्थ ध्वनित होतो. गुलामगिरीचे उच्चाटन करणाऱ्या अमेरिकन राज्यघटनेच्या १३व्या दुरुस्तीशी साधर्म्य असलेले हे कलम असून ते मानवाधिकारांच्या आंतरराष्ट्रीय कायद्यामधील भावनेशी सुसंगत आहे.



## कलम १८ नुसार किताब नष्ट करणे

सदर कलमानुसार देशाच्या कोणत्याही नागरिकाला कोणत्याही विदेशाकडून कोणतीही पदवी स्वीकारता येणार नाही. मात्र संरक्षण सेवासहित विविध क्षेत्रांमध्ये नागरिकांनी बजावलेल्या कामगिरीवर आधारित विविध पदव्या व सन्मान बहाल करण्यास भारत सरकारवर कोणतीही बंधने नाहीत. तसेच शासनाच्या सेवेत असताना शासनाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला भारताच्या राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीशिवाय विदेशी शासनाकडून कोणतेही वेतन किंवा नोकरी स्वीकारता येणार नाही.

## कलम १९ अंतर्गत विविध प्रकारच्या स्वातंत्र्याचा अधिकार

सर्वोच्च न्यायालयानुसार कलम १९ अन्वये हमी देण्यात आलेले अधिकार हे मानवी व्यक्तिमत्वाशी अतर्हित असल्यामुळे व लोकतांत्रिक राजकीय व्यवस्थेत नागरिकाचे मुक्त व्यक्तिमत्व व्यक्त करणारे असल्यामुळे नैसर्गिक अधिकार आहेत (पश्चिम बंगाल राज्य विरुद्ध सुबोध गोपाल बोस (AIR 1954 SC 92) सदर कलम सर्व नागरिकांना



अ) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य

ब) निशस्त्र जमाव करण्याचे स्वातंत्र्य

क) भारताच्या हद्दीत कुठेही मुक्त वावरण्याचे स्वातंत्र्य

ड) देशाच्या कोणत्याही भागात निवास करण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य व

इ) कोणताही व्यवसाय किंवा व्यापार, उदीम, करण्याचे स्वातंत्र्य बहाल करते.

मूळ राज्यघटनेत मालमत्तेच्या अधिकाराचा सुद्धा मुलभूत अधिकारांमध्ये समावेश होता. मात्र १९७८ मध्ये पारित करण्यात आलेल्या ४४व्या घटनादुरुस्ती विधेयकामुळे सदर अधिकाराचे कलम ३०० अ नुसार मुलभूत अधिकारातून कायदेशीर अधिकारामध्ये रुपांतर झाले. मुलभूत अधिकार व कायदेशीर अधिकार यामधील फरक असा की कायद्याचा पेहराव करून मुलभूत अधिकार हिरावून घेता येत नाही. मात्र कायद्याच्या प्राधिकृततेने वंचिततेबद्दल योग्य तो मोबदला देऊन शासन कायदेशीर अधिकार हिरावून घेऊ शकते. मात्र अशी वंचितता कायदेशीर आहे किंवा कसे, याची परीक्षा करण्याचा अधिकार न्यायपालिकेला आहे.

सदर स्वातंत्र्य उपभोगताना इतरांच्या स्वातंत्र्याचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेण्याची अवघड जबाबदारी नागरिकांवर आहे आणि अन्य अधिकार धारकांच्या हितरक्षणासाठी किंवा राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी आवश्यक वाटल्यास वाजवी बंधने घालण्याचे अधिकार शासनाला आहेत.

## व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा अधिकार

कलम २० ते २४ म्हणजे व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या अधिकाराची कलमे आहेत. राज्यघटनेच्या कलम १४ मधील अनुस्यूत समानतेची वागणूक व कायद्यासमोर सर्वांना समान संरक्षण प्राप्त करण्यासाठी विविध कलमान्वये मुलभूत अधिकारांची तरतूद करण्यात आली आहे. व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे अधिकार हे सर्व व्यक्तींना उपलब्ध असून फक्त भारताच्या नागरिकांपुरतेच मर्यादित नाहीत. सदर कलमांचे सूक्ष्मतेने परीक्षण केले जाईल.



## अ) कलम २० नुसार गुन्ह्यांमध्ये दोषी ठरणाऱ्या स्वातंत्र्याचे संरक्षण

कलम २० नुसार कायद्याने विहित केलेल्या प्रक्रियेचा अवलंब न करता शासन कोणालाही शिक्षा करू शकत नाही. सदर कलमानुसारचे संरक्षण हे सर्व व्यक्ती म्हणजेच नैसर्गिक व वैधानिक व्यक्तींना लागू आहे. सदर कलमानुसारचे संरक्षण हे गुन्हेगारी कायद्याशी संबंधित बाबींशी संबंधित आहे. सदर कलमानुसार जोपर्यंत एखाद्या व्यक्तीचे कोणतेही कृत्य हे देशाच्या विविध कायद्यांच्या नुसार

गुन्हेगारी कृत्य होत नाही, तोवर त्याला शिक्षा करता येत नाही. कोणतेही न्यायालय एखाद्या व्यक्तीला त्याच गुन्ह्यासाठी दोन वेळा शिक्षा करू शकत नाही याची हे कलम हमी देते. कायद्याच्या भाषेत याला दुहेरी संकट असे संबोधले जाते. तसेच कोण्याही आरोपित व्यक्तीला स्वत: बाबतीत साक्षीदार होण्यास बाध्य करता येत नाही अशीही तरतूद सदर कलमात आहे.

## ल) कलम २१ नुसार जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण



सर्व मुलभूत अधिकारामध्ये हे कलम म्हणजे पायाभरणीचा दगड आहे. सदर कलम शासनाच्या अनधिकृत कायदेशीर कृतींपासून संरक्षण देतेच, पण किमान सभ्यता व मर्यादशिलतेने नैसर्गिक व्यक्तीला आपले जीवन व्यतीत करता येण्यासाठी विविध प्रकारचे अधिकार सुद्धा प्रदान करते. सदर कलम नैसर्गिक व्यक्तीला आपले जीवन प्रतिष्ठितपणे व्यतीत करण्यासाठी मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वांनी विविध तरतुदींच्या अन्वये हमी दिलेल्याव शासनाने आदर व सन्मान केल कलम १५ (१) सदर कराराचे पक्षकार असलेली राष्ट्रे सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा प्रत्येकाचा अधिकार पाहिजेत अशा अनेक अधिकारांची हमी देते.

राज्यघटनेचे ४४ वी घटनादुरुस्ती विधेयक व सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निर्णय ह्यामुळे भारतीय संसदेला अगदी अंतर्गत किंवा बाह्य आणीबाणीच्या कालावधीत सुद्धा राज्यघटनेच्या विविध तरतुदीनुसार हमी देण्यात आलेल्या विविध सुसंत अधिकार व सदर अधिकार हिरावून घेणे अशक्य झाले आहे.

सदर कलमातील तरतुदीचा राज्यघटनेच्या प्रस्तावनेच्या भावनेशी व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्यांच्या तत्वांशी सुसंगत अशी अर्थउकल करत न्यायपालिकेने अनेक अधिकार कलम २१ अंतर्गत समाविष्ट केले आहेत. परस्परसंबंधित प्रकरणामध्ये न्यायपालिकेने दिलेल्या निर्णयांमुळे शासनाला आरोग्याचा अधिकार, निवाऱ्याचा अधिकार, प्रदूषणमुक्त वातावरणाचा अधिकार, उपजीविकेचा अधिकार, खासगीपणाचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, माहितीचा अधिकार इत्यादी विविध मुलभूत अधिकारांची हमी देणारे संबंधित कायदे व नीतीची अंमलबजावणी करावी लागली व गुन्हेगारी न्यायशास्त्रामध्ये द्रुतगतीने सुधारणा कराव्या लागल्या.

उन्नीकृष्णन विरुद्ध आंध्रप्रदेश राज्य (1993 SCC 1645) प्रकरणी शिक्षणाचा अधिकार हा मुलभूत अधिकार असल्याची हमी देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर त्याचा कलम २१ मध्ये समावेश करण्यासाठी संसदेला प्रदीर्घ कालावधी लागला. सन २००२ मध्ये ८६ व्या

घटनादुरुस्ती विधेयकाद्वारे कलम २१ मध्ये उपकलम (क) समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार आर्थिक क्षमतेनुसार देशातील ६-१४ वयोगटातील बालकांना कोणताही भेदभाव न करता सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचे दायित्व शासनावर टाकण्यात आले आहे.

## क ) कलम २२ नुसार अटक व स्थानबध्दता ह्यापासून संरक्षण

शासनाच्या शत्रुवत कृतींपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी हे एक महत्वाचे कलम आहे. जर पोलिसांना एखाद्या व्यक्तीला एखाद्या गुन्हेगारी आरोपाखाली अटक करावयाची असल्यास अटक होण्याची कारणे जाणून घेण्याचा अधिकार सदर व्यक्तीला आहे. तसेच वकिलांशी सल्लामसलत करण्याची व निर्दोशित्वाबाबत बाजू मांडण्याचा अधिकार व अटक झाल्यापासून २४ तासांच्या आत दंडाधिकारी न्यायालयासमक्ष हजर केले जाण्याचा अधिकार त्या व्यक्तीला प्राप्त होतो. मात्र परकीय शत्रूच्या बाबतीत प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेची खबरदारी म्हणून त्यांना अटकेची कारणे समजण्याचा अधिकार बहाल केलेला नाही. दहशतवादाच्या आरोपावरून एखाद्या व्यक्तीस अटक झाल्यास त्या व्यक्तीला पोलीस कोठडीत तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत स्थानबद्ध करून ठेवता येते. कोठडीची मुदत वाढवावयाची असल्यास अशा कायद्यान्वये गठीत सल्लागार मंडळाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली वाढवता येईल. सदर अधिकाराचा घटनेतील अन्य अधिकारांशी संयोग करून विचार केला पाहिजे.



अनेक न्यायनिर्णयावर आधारून असे म्हणता येते की दहशतवाद किंवा खंडणी उकळण्याच्या आरोपांमध्ये सुद्धा स्थानबद्ध व्यक्तीला स्थानबद्धतेच्या कालावधीत मुलभूत अधिकार नाकारता येत नाहीत व कलम २१ द्वारे हमी दिलेल्या जीवनाच्या व स्वातंत्र्याच्या अधिकाराशी संयोग करून वाजवी सुविधा दिल्या पाहिजेत. पोलिसांनी अटक केलेल्या कारणांच्या विरुद्ध स्वतःची बाजू मांडण्याचा अधिकार जरी त्या व्यक्तीला बहाल केलेला नसला तरीही कायद्याच्या परीभाषेत अटकेची व्याख्या ना घटनेमध्ये आहे ना भारतातील फौजदारी कायद्यांमध्ये आहे.

## ड ) कलम २३ व २४ नुसार शोषणाविरुद्ध अधिकार

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याच्या न्यायशास्त्राच्या मानचित्रावर आधारून घटना परिषदेने सदर महत्वाच्या अधिकाराचा अंगीकार केला. सदर अधिकारानुसार एखाद्या व्यक्तीच्या जीवनाच्या व स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन करणाऱ्या व त्याची अप्रतिष्ठा करणारे कोणतेही

काम करण्याची सक्ती करता येणार नाही. उदाहरणार्थ बेठ्बिगारी, मानवी विष्ठा हाताने उचलणे, वेश्या व्यवसाय, तस्करी इत्यादी कामे. सदर कलम चौदा वर्षाखालील कोवळ्या वयाच्या बालकांना सुद्धा कामावर न ठेवण्याची हमी देते. सदर अधिकाराचे सदैव संरक्षण करणे आवश्यक आहे व सदर कलमाचे उल्लंघन होणार नाही याची डोळ्यात तेल घालून खबरदारी घेण्याचे दायित्व शासनावर व लोकांवर सोपविणारे प्रतिपादन अनेक संविदा, करार, राष्ट्रीय कायदे, शासनाच्या नीती व न्याय्पालीकेचे न्यायनिर्णय स्पष्टपणे करतात. त्याचवेळेला राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी किंवा महत्वाची आपत्ती कोसळल्यास कोणताही भेदभाव न करता सार्वजनिक उद्दिष्टांसाठी सक्तीची सेवा करून घेण्याचा अधिकार शासनाला बहाल करण्यात आला आहे.

## कलम २५ ते ३० नुसार अल्पसंख्यांकांच्या धार्मिकसांस्कृतिक व सांस्कृतिक अधिकार धर्म



इथे अनेक धर्म नांदत असल्यामुळे राज्यघटनेच्या प्रस्तावनेच्या धर्मनिरपेक्ष राष्ट्र ह्या तत्वाला अनुसरून शासनाला कोणताही धर्म नाही व कायद्याच्या नजरेत सर्व धर्म समान आहेत. अन्य धर्मांच्या धार्मिक चालीरीती व भावनांना न दुखावता आपल्या धर्माचे पालन व प्रसार करू शकतात. देशाच्या विविध कायद्यांमधील तरतुदीनुसार धार्मिक व धर्मादाय उद्देशाच्या प्रीत्यर्थ प्रत्येक धर्माचे लोक कोणतीही संस्था सुरु करू शकतात. शासनाची कोणतीही संस्था किंवा शासनाकडून पूर्णतः किंवा अंशतः प्राप्त होणाऱ्या निधीद्वारे व्यवस्थापित कोणतीही शिक्षणसंस्था कधीही धार्मिक उपक्रम हाती घेणार नाही. मात्र कलम २९ व ३० अन्वये किंवा वेळोवेळी लागू करण्यात आलेल्या कायद्यानुसार अल्पसंख्यांकांचे अधिकार व अधिकारांच्या रक्षणासाठी स्थापित संस्था सांस्कृतिक संचिताचे संरक्षण करण्यासाठी योग्य असे शिक्षण देऊ शकतात.

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायदा व भारतीय राज्यघटनेने अल्पसंख्यांकांच्या अधिकारांना मान्यता देऊनसुद्धा अल्पसंख्यांक ही संकल्पना फक्त धार्मिक दृष्टीकोनापुरतीच मर्यादित राहावी व अल्पसंख्यांक म्हणजे काय याची कुठेही व्याख्या नसणे ही एक आश्चर्याचीच बाब आहे.

## कलम ३२ व २२६ नुसार घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार

न्यायशास्त्राच्या दृष्टिकोनानुसार कायद्याने हमी दिलेल्या प्रत्येक अधिकारावर उपाययोजना आवश्यक आहे. त्यानुसार अधिकारांचे उल्लंघन किंवा संकोच होऊ नये म्हणून घटनाकारांनी कलम ३२ व २२६ नुसार रिटच्या (प्राधिलेखाच्या) स्वरुपात विविध दिशानिर्देश जारी करण्याचे



अधिकार न्यायपालिकेला (विशेषत: उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाला) बहाल केले आहेत. सन १९७८ मध्ये पारित ४४ व्या घटना दुरुस्ती विधेयक व न्यायपालिकेच्या अनेक न्यायनिर्णयावरून, अगदी आणीबाणीच्या कालावधीत सुद्धा शासन किंवा त्याच्या कोणत्याही अभिकरणाकडून अधिकाराचे उल्लंघन झाल्यास त्यावर उपाययोजना करण्यासाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावयाचा अधिकार ज्ञेपत्याही परिस्थितीत निलंबित करता येणार नाही कारण कलम २१ नुसार व्यक्तीच्या जीवन व स्वातंत्र्याच्या अधिकाराचे ते उल्लंघन ठरेल.

रिट (प्राधिलेख) म्हणजे ज्या पक्षाला ती संबोधित केलेली आहे, त्यांनी एखादी विनिर्दिष्ट कृती करण्याचे किंवा ती करणे थांबवण्याचे देण्यात आलेले न्यायिक आदेश. त्यानुसार आपल्या राज्यघटनेने ५ प्रकारच्या रिटना मान्यता दिली आहे.

## हेबियस कॉर्पस (देहोपहस्थिती प्राधिलेख)

शरीर न्यायालयापुढे हजर करा किंवा न्यायालयाला उत्तर द्या असा हेबियस कॉर्पस अॅड सब्जीसियेनडीयम याचा शब्दश: अर्थ आहे . एखाद्या व्यक्तीला चुकीच्या पद्धतीने अटक केली असल्यास व विहित २४ तासांच्या कालावधीत न्यायालयासमक्ष हजर न केल्यास, स्थानबद्ध करण्यात आलेली व्यक्ती, किंवा त्यांचा मित्र किंवा नातेवाईक न्यायालयामध्ये हेबियस कॉर्पसच्या रिटचे निर्देश देण्याची विनंती अर्जाद्वारे करू शकतात. अर्जात कथन केलेल्या स्थितीबाबत न्यायालयाची खात्री पटल्यास, सदर न्यायालय पोलीस व शासनाला न्यायालयासमोर हजर करण्याचे निर्देश देऊ शकते. जर एखाद्या व्यक्तीला प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेमध्ये अटक केली असेल, तर अशी स्थानबद्धता सकृतदर्शनी कायदेशीर आहे अथवा नाही याच्या उत्तराची अपेक्षा न्यायालय संबंधित प्राधिकाऱ्याकडून करू शकते.

न्यायालयाकडून प्राधिकृत करून एखाद्या व्यक्तीस ताब्यात घेतले असल्यास हेबियस कॉर्पसचे रिट दाखल करता येत नाही. एखाद्या न्यायालयाने हेबियस कॉर्पसचे रिट फेटाळलयास त्या व्यक्तीला त्याच न्यायालयात परत अर्ज दाखल करता येत नाही.

## मॅनडॅमस (महादेश प्राधिलेख)

कोणत्याही व्यक्तीस, महानगरपालिकेस किंवा आपल्या अधिपत्याखालील कनिष्ठ न्यायालयास किंवा प्राधिकरणास एखादी कृती करण्याचा किंवा न करण्याचा न्यायालयाने दिलेला

निर्देश असा ह्याचा शब्दश... अर्थ आहे. ज्या पक्षकारांचे मुलभूत अधिकार थेटपणे व मोठ्या प्रमाणावर उल्लंघित झाले आहेत किंवा होण्याची शक्यता आहे, अशांच्या बाबतीतच मॅनडॅमस हे रिट जारी केले जाते. ज्या पक्षकाराविरुद्ध मॅनडॅमस रिटची मागणी केली जाते, त्याचे कर्तव्य हे सार्वजनिक स्वरूपाचे असले पाहिजे व सदर कायदेशीर कर्तव्य करण्याचा कायदेशीर अधिकार त्याला असल्याचे अर्जदाराला दाखवून देता आले पाहिजे.

### प्रोहीबीशन (प्राधिलेख)

प्रतिषेध हे न्यायालयीन रिट असून न्यायिक कर्तव्ये सोपविलेल्या न्यायालयांना त्यांच्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादेत राहण्यासाठी बाध्य करणारे हे रिट आहे. सदर रिट हे कनिष्ठ न्यायालयाने त्याला नसलेल्या अधिकार्क्षेत्रातील आपले अधिकार वापरू नयेत ह्या उद्देशाने प्रकरणाच्या सुनावणीच्या सुरवातीला जारी करण्यात येते, जर न्यायालयाने प्रकरणी निर्णय दिला असल्यास सदर रिट दाखल करता येत नाही.

### कोवो वॉरंटो

सार्वजनिक कार्यालयात काम करणाऱ्या व्यक्तीला अधिकार आहे की नाही याची चौकशी करण्यासाठी सदर रिट जारी करण्यात येते. घटनात्मक कार्यरतांच्या विरुद्ध सदर रिट जारी करता येत नाही.

### सरशिओरा (उत्प्रेषण प्राधिलेख) प्रमाणपत्र

सदर रिट जारी करणारे न्यायालय पर्यवेक्षकीय अधिकारक्षेत्रात भूमिका निभावत असते. कनिष्ठ न्यायालयासमक्ष सुरु असलेल्या कामकाजाशी व न्यायालयाने कायद्याचे पालन केले आहे किंवा नाही एवढ्यापुरताच त्याचा संबंध असतो. त्यामुळे जेव्हा सकृतदर्शनी कायदेशीर गफलत झाली असेल व तथ्यांसंबंधाने कोणतीही गफलत झाली नसल्यास सरशिओरा प्रमाणपत्र रिट जारी करता येते असे म्हणता येईल .

## ७. राज्यघटनेची मार्गदर्शक तत्वे

**माझ्या मतानुसार मार्गदर्शक तत्वांचे मूल्य खूप मोठे आहे ; कारण आर्थिक लोकशाही हे आपले उद्दिष्ट असल्याचे ते विषद करतात. कारण आपल्या समाजाची आर्थिक घडी कशी असावी ह्यावर कोणतेच दिशादिग्दर्शन न करता राज्यघटनेतील विविध तरतुदींच्या द्वारे फक्त संसदीय स्वरूपाचे सरकार आम्हाला नको असल्यामुळेच आमच्या राज्यघटनेत आम्ही जाणीवपूर्वक मार्गदर्शक तत्वांचा समावेश केला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर**

राज्यकारभाराची मार्गदर्शक तत्वे ही मुलभूत अधिकारांच्या इतकीच महत्वाची आहेत. सदर तत्वे ही आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्यांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांशी तुलनीय आहेत. भारतीय न्यायव्यवस्थेने सदर तत्वांचे वर्णन संयुक्त राष्ट्रांच्या विकासाच्या अधिकारांबाबतच्या जाहीरनाम्याचे पूर्वसुरी म्हणून वर्णन केले आहे. (एयर इंडिया वैधानिक निगम विरुद्ध युनायटेड लेबर युनियन AIR 1997 SC 645.) आंतरराष्ट्रीय तत्वज्ञानाशी समकक्ष असल्यामुळे नागरिकांना त्यांचे मुलभूत अधिकार समानतेने उपभोगता येण्यासाठी राजकीय व्यवस्थेच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक दृष्टीकोनांचा अदमास घेऊन कायदे करण्यासाठी शासनाला संबोधित केलेले ते अधिकार आहेत. कायदेशीर वर्तुळात सदर तत्वे ही गैरहर्तनीय असून शासनाने त्याचे उलंघन केल्यास न्यायालयात आव्हान देता येत नाही. मात्र सदर तत्वांची अंमलबजावणी न केल्यामुळे मुलभूत अधिकार मुक्तपणे उपभोगण्यात अडथळे येत असतील तर त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी न्यायव्यवस्था त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाला निर्देश देऊ शकते कारण सदर तत्वांना प्रभावी करण्यासाठी कायदे बनविण्याचे दायित्व शासनावर असल्याचे न्यायमूर्ती भगवती यांनी मिनर्व्हा मल्स प्रकरणी स्पष्ट केले आहे. (1989) 3 SCC 625, परंतु मुलभूत अधिकारांच्या प्रमाणे शासनाने पालन न केल्यास न्यायालयाच्या सदर परिभाषेचा उपयोग करून उठसूट न्यायालयात त्यास आव्हान देता येणार नाही. सदर तत्वे राज्यघटनेच्या चौथ्या खंडात कलम ३६ ते ५१ मध्ये संस्थापित करण्यात आली आहेत. सदर तत्वे ही आयरिश राज्यघटनेपासून स्फूर्ती घेऊन तयार करण्यात आली आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवरील सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक अधिकारांच्या समक्ष असलेल्या राज्यकारभाराच्या मार्गदर्शक तत्वे समजण्यास सुगम होण्यासाठी दोन्हींचे तौलनिक सादरीकरण पुढील तक्तयात केले आहे.

| राज्याकारभराच्या मार्गदर्शक तत्वांशी निगडीत राज्यघटनेतील तरतुदी | १९४८ च्या मानवी अधिकारांच्या वैश्विक जाहीरनाम्यातील समकक्ष तरतूद | १९६६ च्या वैश्विक आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार करारातील समकक्ष तरतूद |
|---|---|---|
| **कलम ३९ (अ)** – सर्व पुरुष व महिला नागरिकांना समानत्वाने उपजीविकेचे पर्याप्त साधन असण्याच्या दिशेने शासनाने आपल्या धोरणांची दिशा ठरविली पाहिजे. | **कलम २५** – (१) स्वतः व स्वतःच्या कुटुंबाच्या पर्याप्त जीवनमानासाठी व आरोग्य व कल्याणासाठी प्रत्येकाला अन्न, वस्त्र, घर, वैद्यकीय सेवा व आवश्यक त्या सामाजिक सेवा मिळण्याचा व त्याच्या नियंत्रणाच्या पलीकडील परिस्थितीमुळे बेरोजगारी, आजारपण, अपंगत्व, वैधव्य वृद्ध वय, किंवा अन्य दैन्य उद्भवल्यास सुरक्षिततेचा अधिकार आहे. | **कलम ११** – प्रत्येकाच्या व त्याच्या कुटुंबाच्या पर्याप्त जीवनमानासाठी व आरोग्य व कल्याणासाठी प्रत्येकाला अन्न, वस्त्र, घर, ह्यासाहित त्यामध्ये सतत सुधारणा करण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार सद्य करारातील सदस्य देश मान्य करतात. |
| **कलम ३९ ड** – सर्व पुरुष व स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन प्राप्त होण्याच्या दिशेने शासनाने आपल्या धोरणांची दिशा ठरविली पाहिजे | **कलम २३ (२)** – कोणत्याही भेद्भावाशिवाय समान कामासाठी समान वेतन प्राप्त करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे | **कलम ७** – कामाच्या ठिकाणी वाजवी व अनुकूल परिस्थिती विशेषतः अ) कोणत्याही प्रकारचा विशेषतः महिलांना कोणत्याही भेदभाव न करता व पुरुषांच्या बरोबरीनेच समान कामासाठी समान वेतनाची हमी असण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार सदर कराराचे पक्षकार देश मान्य करीत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| **कलम ३९ फ –** बालकांना आरोग्याला पोषक पद्धतीने व स्वातंत्र्य व प्रतिष्ठेने विकसित होण्यासाठी संधी व सुविधा दिल्या पाहिजेत व बालपणात व यौवनात शोषणापासून व नैतिक व भौतिक विरक्तीपासून संरक्षित केले पाहिजे. | | **कलम १० –** सर्व बालके व तरुण व्यक्तींच्या संरक्षणासाठी व त्यांना मदत करण्यासाठी पालकत्व किंवा अन्य अटी न घालता विशेष उपाययोजना केल्या पाहिजेत सर्व बालके व तरुण व्यक्तींचे आर्थिक व सामाजिक शोषणापासून रक्षण केले पाहिजे. त्यांच्या मनोधैर्य, किंवा आरोग्याला किंवा जीवाला धोकादायक किंवा अपायकारक असणाऱ्या किंवा असू शकल्यामुळे त्यांच्या नेहमीच्या वाढीस अडथळा ठरू शकणाऱ्या कामात रोजगार दिल्यास कायद्याने शिक्षेची तरतूद असली पाहिजे. सदर कराराचे पक्षकार असलेल्या देशांनी बालकामगारांना रोजगार देण्यासाठी किमान वयोमर्यादा विहित करावी व त्या वयाखालील बालकामगारांना प्रदानीत रोजगार देण्यास कायद्याने बंदी व शिक्षा असली पाहिजे. |
| **कलम ४१ –** शासनाने आपल्या आर्थिक क्षमतेच्या व विकासाच्या मर्यादेत कामाचा, शिक्षणाचा अधिकार व बेरोजगारी, वृद्ध वय, आजारपण व अपंगत्व आल्यास सामाजिक सहाय्यासाठी परिणामकारक तरतूद केली पाहिजे. | **कलम २३ –** प्रत्येकाला कामाचा अधिकार, रोजगाराचा मुक्त पर्याय व कामाच्या ठिकाणी पर्याप्त व अनुकूल शर्ती व बेरोजगारी पासून संरक्षणाचा अधिकार आहे. | **कलम ६ –** सदर कराराचे पक्षकार असलेली राष्ट्रे प्रत्येकाचा कामाचा अधिकार व त्याने मुक्तपणे स्वीकारलेल्या व निवडलेल्या कामातून उपजीविका कमावण्याचा व अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी योग्य ती पाउले उचलण्याचा अधिकार मान्य करीत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| **कलम ४२ –** कामाच्या न्याय्य व मानवी प्रसूती अनुतोष प्राप्त होण्यासाठी शासनाने तरतूद केली पाहिजे. | | **कलम ७ –** सदर करारातील पक्षकार देश, प्रत्येकाचा कामाच्या ठिकाणी न्याय्य व मानवी शर्ती विशेषतः (ब) सुरक्षित व आरोग्यपूर्ण कामाच्या शर्ती व (क) विश्रांती, निवांतपणा, व कामाच्या तासांवर वाजवी मर्यादा व नियमित पगारी सुट्ट्या व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी वेतन, अशा अधिकारांना मान्यता देत आहेत. |
| **कलम ४३ –** शेती, औद्योगिक, किंवा अन्य क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व कामगारांना सभ्यतेला धरून जीवनमान व निवांतपणा व सामाजिक व सांस्कृतिक संधींचा पूर्ण उपभोग घेण्यासाठी योग्य असे वेतन प्राप्त होण्यासाठी योग्य त्या कायद्याद्वारे किंवा आर्थिक संघटनेद्वारे किंवा अन्य मार्गाने योग्य ते प्रयत्न शासन करेल | | **कलम ७ (२) –** सदर करारात पक्षकार असलेले देश प्रत्येकाचा कामाच्या ठिकाणी न्याय्य व अनुकूल शर्ती असण्याचा, विशेषतः<br>अ) कोणत्याही प्रकारचा विशेषतः महिलांविषयी कोणताही भेदभाव न करता व पुरुषांच्या बरोबरीनेच समान कामासाठी समान वेतनाची हमी असण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार<br>ब) सद्य करारातील तरतुदीनुसार स्वतःसाठी व कुटुंबियांसाठी प्रतिष्ठित जीवनमान<br>क) विश्रांती, निवांतपणा, व कामाच्या तासांवर वाजवी मर्यादा व नियमित पगारी सुट्ट्या व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी वेतन, अशा अधिकारांना मान्यता देत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| **कलम ४३ क –** कोणत्याही उद्योगातील संघटनेच्या किंवा आस्थापनेच्या किंवा उपक्रमाच्या व्यवस्थापनात कामगारांचे सहभागीत्व असण्यासाठी योग्य अशा कायद्याद्वारे किंवा अन्य मार्गाने शासनाने योग्य अशी पावले उचलावीत. | | **कलम ८ –** सदर कराराची पक्षकार राष्ट्रे हे प्रत्येकाचा संघटना स्थापन करण्याचा किंवा त्या त्या संघटनेच्य नियमांच्या अधीन राहून त्याने निवडलेल्या संघटनेत सामील होण्याचा व आपल्या सामाजिक व आर्थिक हिताचे संरक्षण करण्याचा अधिकार मान्य करतात. कायद्याने विहित केलेली व राष्ट्रीय सुरक्षेच्या किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेच्या दृष्टीने किंवा इतरांच्या अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी लोकशाही समाजासाठी आवश्यक अशी बंधने वगळता सदर अधिकाराच्या उपभोगावर कोणतीही बंधने लादू नयेत |
| **कलम ४५ –** सदर राज्यघटना अमलात आल्यानंतर १० वर्षांच्या कालावधीत १४ वर्षे वयापर्यंतच्या सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा शासन प्रयत्न करेल. | **कलम २६ (१) –** प्रत्येकाला किमान मुलभूत व प्राथमिक टप्प्यावर मोफत शिक्षणाचा अधिकार असेल. | **कलम १३ –** सदर कराराची पक्षकार राष्ट्रे सदर अधिकाराची संपूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत उपलब्ध असल्याचे मान्य करीत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| **कलम ४७ –** आपल्या लोकांची पोषणाची पातळी व जीवनमान उंचावणे व सार्वजनिक आरोग्यात सुधारणा करणे ही शासनाची प्राथमिक कर्तव्ये असतील व शरीराला हानिकारक असणारी व औषधी उपयोग वगळता मादक पेयांच्या सेवनावर बंदी आणण्याचा प्रयत्न शासन करेल | **कलम २५ –** (१) स्वतः व स्वतःच्या कुटुंबाच्या पर्याप्त जीवनमानासाठी व आरोग्य व कल्याणासाठी प्रत्येकाला अन्न, वस्त्र, घर, वैद्यकीय सेवा व आवश्यक त्या सामाजिक सेवा मिळण्याचा व त्याच्या नियंत्रणाच्या पलीकडील परिस्थितीमुळे बेरोजगारी, आजारपण, अपंगत्व, वैधव्य वृद्ध वय, किंवा अन्य दैन्य उद्भवल्यास सुरक्षिततेचा अधिकार आहे. | **कलम ११ –** प्रत्येकाच्या व त्याच्या कुटुंबाच्या पर्याप्त जीवनमानासाठी व आरोग्य व कल्याणासाठी प्रत्येकाला अन्न, वस्त्र, घर, ह्यासाहित त्यामध्ये सतत सुधारणा करण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार सद्य करारातील पक्षकार देश मान्य करतात. |
| **कलम ४९ –** (संसदेने पारित केलेल्या एखाद्या कायद्याद्वारे किंवा जशी बाब असेल त्यानुसार कलेच्या किंवा ऐतिहासिक महत्वाची स्मारके किंवा जागा किंवा वस्तू ही राष्ट्रीय महत्वाची असल्याचे घोषित केल्यास त्याचे खराब होण्यापासून, विरूपण, नाश, विल्हेवाट किंवा निर्यात होण्यापासून रक्षण करणे हे शासनाचे दायित्व असेल. | **कलम २७ (१) –** प्रत्येकाला आपल्या समुहाच्या सांस्कृतिक जीवनामध्ये मुक्तपणे सहभागी होण्याचा व कलेचा आस्वाद घेण्याचा व वैज्ञानिक विकासाचा व त्याच्या लाभाचा फायदा घेण्याचा अधिकार मान्य करीत आहेत. | **कलम १५ (१) –** सदर कराराचे पक्षकार असलेली राष्ट्रे सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा प्रत्येकाचा अधिकार |

## राष्ट्र / शासनाची व्याख्या (कलम ३६ )



राज्यघटनेतील कलम १२ मध्ये व्याख्या केल्यानुसार सदर कलमामध्ये राष्ट्र /शासनाची व्याख्या करावी लागेल. राज्यघटनेची मार्गदर्शक तत्वे अमलात आणण्यासाठी आवश्यकता भासल्यास राष्ट्र / शासन ह्या संकल्पनेची व्याख्या करण्यासाठी राज्यघटनेतील तरतुदींच्या अर्थाची उकल न्यायव्यवस्थेने करणे अपेक्षित आहे.

## तत्वांची लागुता (कलम ३७)

राज्यघटनेतील व आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांच्या आंतरराष्ट्रीय करारातील तरतुदी नुसार कथन केलेली तत्वे हा राष्ट्राला / शासनाला दिलेला निर्देश आहे. तत्वांची अंमलबजावणी अनेक घटकांवर अवलंबून आहे. तसेच जर शासन कोणत्याही निर्देशांचे पालन करीत नसल्यास सदर अधिकार गैरहर्तनीय असल्यामुळे सर्वसामान्यपणे त्यास न्यायालयात आव्हान देता येत नाही.

## लोकांच्या कल्याणाच्या प्रवर्तनासाठी शासनाने सामाजिक व्यवस्था तयार केली पाहिजे व काही तत्वांचे पालन केले पाहिजे (कलम ३८ व ३९ )



राज्यघटनेतील कलम ३८ व ३९ विभागीय न्यायाच्या संकल्पनेचा पुरस्कार करतात. विभागीय न्याय ही जरी न्यायशास्त्रीय संकल्पना असली तरी घटनात्मक व मानवी अधिकारांच्या दृष्टीकोनातून देशातील लोकांमध्ये समानतेची मुलभूत तत्वे साध्य करणे व कोणत्याही प्रकारची असमानता काढून टाकण्यासाठी प्रयत्न करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्यानुसार असमानता दूर करण्यासाठी व असमान घटकांच्या व्यापक उन्नतीसाठी आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी कोणताही विनिर्दिष्ट कायदा पारित करण्यासाठी शासन प्राधिकृत आहे. वरील तरतुदींवर आधारून असमानता दूर करण्यासाठी व त्यांना राज्यव्यवस्थेतील विकसित घटकांच्या बरोबरीने सक्षम करण्यासाठी भारत सरकार व राज्य शासनांनी लोकांच्या अनेक घटकांना अनेक सवलती देणारे कायदे पारित केले आहेत.

जीवन व स्वातंत्र्याच्या अनेक गरजा पूर्ण करण्यासाठी लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विनिर्दिष्ट कायदे पारित करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना अंगीकारण्याचे निर्देश कलम ३९ नुसार शासनाला देण्यात आले आहेत. ह्या संदर्भात समाजातील वंचित गटांची शासनाने

विशेष काळजी घेण्याची व कायदे पारित करण्याची व आर्थिक गरजांवर कोणताही विपरीत परिणाम न होऊ देता त्यांच्या कल्याणासाठी उपाययोजना अंगीकारण्याची आवश्यकता आहे सामान्यतः लोकांच्या अधिकारांच्या वाढीसाठी व विशेषत्वाने वंचित वर्गातील लोकांना संरक्षण देण्यासाठी भारतीय संघराज्याने व राज्य शासनांनी गेल्या सहा दशकांमध्ये अनेक विनिर्दिष्ट कायदे पारित केले आहे. जीवन व स्वातंत्र्य सुनिश्चित करण्यासाठी राज्यघटनेच्या कलम २१ चा भाग म्हणून समान न्यायाच्या व मोफत कायदेशीर सहाय्याच्या अधिकाराची अंमलबजावणी तत्वे करीत आहेत.

## ग्रामपंचायतींचे संघटन ( कलम ४० )

तळागाळापासून शासनाचे विकेंद्रीकरण करण्याच्या धोरणाशी सुसंगतता ठेऊन लोकांचे स्वयंशासन साध्य करण्यासाठी ग्रामपंचायतींना आवश्यक ते अधिकार देण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश कलम ४० नुसार शासनाला देण्यात आले आहेत. सदर कलमाच्या तरतुदीनुसार देशात पंचायत राज्य प्रणालीची रुजवात करण्यात आली आहे. सदर तरतुदींना आकार देण्यासाठी ७३ व्या घटनादुरुस्ती अधिनियम १९९२ नुसार राज्यघटनेच्या खंडामध्ये तळागाळामधील प्रशासनाला सक्षम करण्यासाठी अनेक बदल करण्यात आले आहेत व महिला व अनुसूचित जाती व जमातींसाठी आरक्षण लागू करण्यात आले आहे.

## कामाचा, शिक्षणाचा व विवक्षित लोकसहाय्याचा अधिकार (कलम ४१)




राज्यघटनेच्या कलम ४१ नुसार, आपल्या आर्थिक क्षमतेनुसार व विकासाच्या स्थितीनुसार कामाचा, शिक्षणाचा व काही बाबींमध्ये सार्वजनिक सहाय्याचा अधिकार देण्याचे शासनाचे कर्तव्य आहे. ह्या संदर्भात सन १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने उन्नीकृष्णन विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य प्रकरणी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने सन २००२ मध्ये ८६व्या घटनादुरुस्ती विधेयकाद्वारे त्याला मुलभूत अधिकारात रुपांतर केले आहे. ह्याशिवाय अनेक राज्य व केंद्र शासनांनी बेरोजगारी, वृद्ध वय, आजारपण, अपंगत्व इत्यादी बाबतीत सार्वजनिक सहाय्याची तरतूद करणाऱ्या अनेक योजना अंगीकारल्या आहेत.

## कामाच्या न्याय्य व मानवी शर्ती व मातृत्व अनुतोष (कलम ४२)

राज्यघटनेच्या कलम ४२ मधील तरतुदीनुसार कामाच्या ठिकाणी न्याय्य मानवी शर्ती व मातृत्वाचे अनुतोष देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. डी. भुवन मोहन पटनाईक विरुध्द आंध्र प्रदेश

राज्य (1975) 3 SCC 185 प्रकरणी सदर कलमाची अर्थउकल करताना, कारागृहातील शिक्षा भोगणारे व कच्चे कैदी यांच्या कारागृहातील जीवनमानाबाबत योग्य ती खबरदारी घेण्याची शासनाची जबाबदारी असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे. सदर कलमातील तरतुदींना आकार देण्यासाठी संसदेने सन १९६१ मध्ये प्रसुतिविषयक सहायक अधिनियम पारित केला.

## कामगारांसाठी निर्वाह वेतन (कलम ४३)

कलम ४३ नुसार शहरी व ग्रामीण भागातील कामगारांना किमान दर्जाचे जीवन जगण्यासाठी व सामाजिक व सांस्कृतिक संधींचा लाभ घेण्यासाठी शासनाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. सदर कलमानुसार निर्वाह वेतनामध्ये अन्न, निवारा, कपडा, मुलांच्या शिक्षणाची तरतूद, विमा इत्यादीचा समावेश होतो. सदर कलमाच्या अनुषंगाने विविध व्यवसायामध्ये काम करणाऱ्या कामगारांना विविध सुविधा देण्यासाठी केंद्र व राज्य शासनांनी विविध कायदे पारित केले आहेत.

## नागरिकांसाठी समान नागरी कायदा ( कलम ४४)

सर्व वैयक्तिक कायदे समान पातळीवर येण्यासाठी शासनाने समान नागरी कायदा अंगिकारण्याचा पुरस्कार राज्यघटनेतील कलम ४४ करते. ह्याचीच पुनरुक्ती महिला अत्याचार निर्मुलन करार १९७९ मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व धर्मांच्या वैयक्तिक कायद्यांचे संहितीकरण करण्यासाठी पाउले टाकली. परंतु अनेक कारणाने हे अजूनपर्यंत होऊ शकलेले नाही. त्यांनी आतापर्यंत हिंदू, पारसी, व ख्रिस्चन विवाह व घटस्फोट कायद्यांचे संहितीकरण केले आहे. भेदभाव काढून टाकण्यासाठी काही कायद्यांमध्ये महिलांना संपत्तीच्या वारशात समान अधिकार प्रदान केले आहेत. शाहबानो प्रकरणात (मोहम्मद अहमद खान विरुद्ध शाहबानो बेगम (1985) 2 SCC 556 सर्वोच्च न्यायालयाने मुस्लीम महिलांनी फौजदारी संहितेच्या कलम १२५ नुसार पोटगीचा दावा करण्यासाठी निकष विहित केले होते. समान नागरी कायदा असावा अशी सूचना न्यायपालिकेने अनेक प्रकरणांमध्ये केली आहे. (सरला मुद्गल विरुद्ध भारत सरकार 1995 3 SCC 635).

## बाल्यावस्थेत काळजी घेण्याची व सहा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना शिक्षण (कलम ४५ )

बाल्यावस्थेचे कुपोषण, गरिबी व अन्य संसर्गजन्य रोगांपासून रक्षण केले पाहिजे व सहा वर्ष पेक्षा कमी वयाच्या बालकांना शिक्षित केले जाण्याचा कलम ४५ पुरस्कार करते. शासनाने अनेक कायदे केले असले आणि धोरणसूत्रे अंगिकारली असली तरीही लाखो मुलांना जगण्यासाठी

सुरक्षित व आनंदी वातावरण निर्माण होणे, हे अजूनही स्वप्नवतच आहे. मात्र वर कथन केल्यानुसार १४ वर्ष वयापर्यंतच्या मुलांना सक्तीचे शिक्षण दिले जाण्यासाठी शासनाने सन २००२ मध्ये पाउले उचलली आहेत.

## अनुसूचित जाती व जमाती व इतर दुर्बल वर्गांच्या आर्थिक व शैक्षणिक हितसंबंधांना प्रोत्साहन (कलम ४६)

कमकुवत वर्गांच्या व विशेषतः अनुसूचित जाती व जमातीच्या आर्थिक व शैक्षणिक हितसंबंधांची काळजी घेण्याचे व त्यांचे सामाजिक अन्यायापासून व सर्व पद्धतीच्या शोषणापासून रक्षण करण्याचे शासनाचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन कलम ४६ मध्ये केले आहे. सदर कलमांच्या तरतुदींना अनुसरून ह्या घटकातील लोकांचं अधिकारांचे वर्धन करण्यासाठी केंद्र व राज्य शासनांनी अनेक धोरणी अंगिकारली असून योग्य ते कायदे पारित केले आहेत.

## पोषण व जीवनमानाची पातळी वाढवणे व सार्वजनिक आरोग्य सुधारण्याचे शासनाचे कर्तव्य (कलम ४७)

कलम ४७ नुसार लोकांची पोषण व जीवनमानाची पातळी सुधारण्यासाठी धोरणसूत्रे विकसित करण्याचे शासनाचे कर्तव्य आहे. तसेच नागरिकांचे सार्वजनिक आरोग्य सुधारून मादक पेये व आरोग्याला घातक असलेल्या औषधांवर बंदी आणण्याचे सुद्धा शासनाचे कर्तव्य आहे. विधमंडळाने मादक पेये व औषधांच्या विक्रीवर घातलेली बंदी न्यायपालिकेने अनेक प्रकरणांमध्ये उचलून धरली आहे. मात्र मद्य हा महसूल व्युत्पन्न करणारा उपक्रम असल्यामुळे पुष्कळ वेळा शासन मद्याच्या विक्रीवर संपूर्णपणे बंदी आणण्यास चालढकल करते.

## गाय आणि वासराच्या हत्येवर प्रतिबंध लावणे (कलम ४८)

कलम ४८ नुसार आधुनिक तंत्रज्ञान व वैज्ञानिक पद्धती वापरून शेती व पशुसंवर्धनाला प्रोत्साहन देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. तसेच वाणाचे संवर्धन करून गायी, वासरे व दुभती जनावरे यांचे हत्या होण्यापासून संरक्षण करण्याचे शासनाचे कर्तव्य आहे. केंद्र व राज्य शासनाने सदर संदर्भात केलेले अनेक कायदे न्यायपालिकेने अनेक प्रकरणांमध्ये उचलून धरले आहेत.

## पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे आणि जीवसृष्टी यांचे रक्षण करणे (कलम ४८ क)

कलम ४८ क द्वारे पर्यावरणाचे व सभोवतालाचे व वन व वन्य जीवांचे रक्षण करण्याचे दायित्व शासनावर ठेवण्यात आलेले आहे. ह्या संदर्भात केंद्र व राज्य शासनांनी अनेक कायदे

पारित केले आहेत. पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ हा संसदेने पारित केलेला महत्वाचा कायदा. शासनाने कायदे पारित करून सुद्धा कार्यापालिकेची कार्यवाही करण्याची गती अतिशय संथ आहे.



पर्यावरण, वने व वन्यजीवांचे रक्षण करण्यासाठी शासनाला सहकार्य करणे हे देशातील लोकांचे कर्तव्य आहे. एवढे स्पष्ट जनादेश प्राप्त होऊन सुद्धा शासनाच्या चलता है दृष्टिकोनामुळे गेल्या ६० वर्षात अनेक गंभीर आपत्ती निर्माण होऊन लोकांच्या मानवी अधिकाराना जबरदस्त क्षति झाली आहे.

## राष्ट्रीय महत्वाच्या स्मारकांचे, जागांचे व वस्तूंचे रक्षण (कलम ४९)



कलम ४९ नुसार, कलात्मक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाच्या अशा प्रत्येक स्मारकाचे, जागांचे व वस्तूंचे रक्षण करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. सदर संदर्भात अशी स्मारके व वस्तू ह्या शासनाने राष्ट्रीय संपत्ती म्हणून देशाच्या मालकीचे असल्याचे घोषित करावे लागते व खराब होण्यापासून, विरूपण, नाश, विल्हेवाट किंवा निर्यात होण्यापासून रक्षण करता येते. संसदेने १९५१ मध्ये पुरातन व ऐतिहासिक स्मारके व पुरातत्वीय स्थाने व अवशेष अधिनियम पारित करून अशी ठिकाणे राष्ट्रीय महत्वाची व राष्ट्राची संपत्ती असल्याचे घोषित केले

## उच्च व सर्वोच्च न्यायालयातील नेमणुका (कलम ५०)

स्वतंत्र न्यायपालिका हे कोणत्याही लोकशाहीचे महत्वाचे वैशिष्ट्य असते. विधिमंडळ व कार्यपालिकेच्या हस्तक्षेपाशिवाय राज्यघटनेने नागरिकांना हमी दिलेल्या मुलभूत अधिकारांचे संरक्षण एक स्वतंत्र असलेली न्यायपालिकाच करू शकते. लोकशाही राज्यघटनेचे हे महत्वाचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सदर विलगीकारणाचा १८८६ मध्येच पुरस्कार केला होता आणि आपल्या घटनाकारांनी त्यानुसारच राज्यघटनेची रचना केली. राज्यघटनेतील अन्य तरतुदीसोबतच कलम ५० शासनाला न्यायपालिका कार्यपालिकेपासून विलग करण्याचे निर्देश देते. मात्र न्यायपालिकेच्या कनिष्ठ स्तरावर जिल्हा दंडाधिकाऱ्याना कार्यकारी व न्यायिक असे दोन्ही अधिकार होते. मात्र फौजदारी संहिता १९७३ द्वारे जिल्हा प्रशासनाचे न्यायिक अधिकार न्यायपालिकेकडे अंतरित करून शासनाने न्यायपालिकेचे संपूर्ण स्वातंत्र्य साध्य केले. मात्र

न्यायपालिका आर्थिक दृष्ट्या अजूनही संपूर्णपणे स्वतंत्र झालेली नाही. अशा स्वातंत्र्यामुळेच न्यायपालिका कार्यपालिकेपासून स्वतंत्र होऊन स्वयंपूर्णता साध्य करेल व म्हणून आर्थिकदृष्ट्या सुद्धा न्यायपालिकेला स्वयंपूर्ण करण्याचा पुरस्कार राज्यघटनेच्या कामकाजाचा आढावा घेणाऱ्या आयोगाने केला आहे.

## आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांच्या संवर्धन (कलम ५१)



कलम ५१ नुसार भारत अंतरराष्ट्रीय समुदायाचा सभासद असल्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधांचा व कायद्याच्या तत्वांचा व करारातील दायीत्वांचा आदर करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. इतर देशांच्या सोबत असलेले वादविवाद शांततेच्या मार्गाने सोडविले पाहिजेत. मात्र राज्यघटनेच्या कलम २५३ नुसार भारतीय संसदेने कोणत्याही कराराला किंवा समझौत्याला कायद्याचे अधिष्ठान दिल्याशिवाय शासनाने केलेला कोणताही करार किंवा समझौता आपोआप अमलात येणार नाही. मात्र मानवी अधिकार विषयक करारांमधील तरतुदींची न्यायपालिकेने अर्थउकल केला आहे व कायद्याचे पाठबळ नसले तरीसुद्धा असा करार किंवा समझौता देशाच्या कायद्यांच्या विरुद्ध नसेल नागरिकांचे अधिकार उचलून धरण्यासाठी त्यांची अंमलबजावणी करण्यास हरकत नसल्याचा निर्वाळा दिला आहे. (विशाखा विरुद्ध राजस्थान राज्य 1997 (6) SCC 241.

नागरिकांच्या मानवी अधिकारांना प्रोत्साहन देताना लोकशाहीचे आदर्श व सामाजिक तत्वज्ञान यामध्ये समतोल साधण्याचा राज्यघटनेचा प्रयत्न असल्याचे आतापर्यंतच्या मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वांवरील थोडक्यातील चर्चेवरून पुरेसे स्पष्ट झाले आहे. न्यायमूर्ती हेगडे यांनी रास्तपणे प्रतिपादन केल्यानुसार काटेकोर कायदेशीर दृष्टीकोनातून मुलभूत अधिकार म्हणजे मानवी अधिकाराचे उल्लंघन न होण्यासाठी शासनाने चुकीच्या गोष्टी करू नयेत म्हणून असलेली एक नकारात्मक व्यवस्था आहे. तर विविध क्षेत्रामध्ये समाजाचा व देशाचा विकास होण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे निर्देश मार्गदर्शक तत्वे ही शासनाला देत असल्यामुळे ती एक सकारात्मक व्यवस्था आहे. ह्यामुळेच मूळ राज्यघटनेने मुलभूत कर्तव्यांचा सुस्पष्टपणे उल्लेख केला नाही.

## ८. मुलभूत कर्तव्ये (कलम ५१ क)

प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत भारताचा तत्वज्ञानात्मक व वैधानिक दृष्टीकोन कर्तव्याच्या संकल्पनेवर आधारित होता. एवढेच नव्हे, तर मानवी अधिकारांवरील अंतरराष्ट्रीय

जाहिरनाम्याच्या कलम २९ मधील न्यायशास्त्रीय विस्तारामध्ये सुद्धा कर्तव्य पूर्ण केल्यानंतरच नमूद अधिकारांचा उपभोग घेण्याचा पुरस्कार केला आहे अधिकाराची संकल्पना कर्तव्याशी जोडलेली असल्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या रचनाकारांनी राज्यघटनेत कर्तव्यांचा विनिर्दिष्ट उल्लेख केला नाही. मात्र कर्तव्याची संकल्पना हा राज्यघटनेचाच भाग असल्याचा पुरस्कार सर्वोच्च न्यायालयाने चंद्रभवन बोर्डिंग व लोजिंग विरुद्ध म्हैसूर राज्य (AIR 1970 SCC 2042) प्रकरणी केला होता.

सन १९७६ मधील बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीने कलम ५१ अ समाविष्ट करून नागरिकांनी निर्वहन करावयाच्या मुलभूत कर्तव्यांचा पुरस्कार केला. मात्र उल्लंघन झाल्यास न्यायालयात बजावणीयोग्य आहेत किंवा त्यासाठी शिक्षा ह्याबाबत मौन बाळगले आहे. त्यानुसार एम्स स्टुडंट्स युनियन विरूध्द एम्स आणि आंरिस (2002) 1 SCC 428 प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मुलभूत कर्तव्ये ही मुलभूत अधिकाराप्रमाणे रिट द्वारे अंमलबजावणीयोग्य नाहीत. कलम ५१–क मध्ये यादीत केलेली मुलभूत कर्तव्ये पुढीलप्रमाणे –

## अ) राज्यघटनेचे पालन करणे व त्यातील आदर्श व संस्था, राष्ट्रीय ध्वज व राष्ट्रगीताचा आदर करणे.

वरील तरतुदीवरून हे स्पष्ट आहे की घटनेविषयी आदर बाळगून तिचे पालन करणे सर्व नागरिकांचे कर्तव्य आहे. प्रतीके व नामे (अयोग्य वापरावर प्रतिबंध) अधिनियम १९५० व राष्ट्रीय मानचिन्हे अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ मधील तरतुदीनुसार सन १९९५ पर्यंत खासगी व्यक्तींना राष्ट्रध्वज फडकविण्यास बंदी होती. मात्र नवीन जिंदाल विरुद्ध भारत सरकार (60 1995 DLT 516) प्रकरणी राष्ट्रीय ध्वजाचा अवमान न करता तो खासगी जागेत सुद्धा फडकविणे हा प्रत्येक नागरिकाचा मुलभूत अधिकार आहे असा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. तसेच राष्ट्रगीत सामुहिकपणे गायले जात असताना एखादा कोणी त्यात गाण्यात सामील न होता शांतपणे उभा राहिल्यास तो राष्ट्रगीताचा अवमान किंवा अनादर होत नाही असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने बिजोई ईमॅन्युअल व अन्य विरुद्ध केरळ राज्य व अन्य प्रकरणी (AIR 1978 SCC 748) दिला आहे.

## ब) ज्या उदात्त आदर्शांनी आमच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा दिली त्यांची बूज राखून त्यांचे अनुसरण करणे

विविध सामाजिक चळवळींनी कुप्रथांचे निर्मुलन व पापांच्या विरुद्ध लढण्यासाठी व राज्यघटनेतील तत्वज्ञानानुसार सामाजिक सलोखा संस्थापित करण्यासाठी ज्या मूल्य व आदर्शांचा पुरस्कार केला त्याचे पालन करणे सदर तरतुदीद्वारे अपेक्षित आहे.

### क) भारताच्या सार्वभौमत्वाचे, अखंडतेचे व एकात्मतेचे रक्षण करणे



सदर तरतुदीनुसार देशाचा प्रत्येक नागरिक कुठेही राहत असला तरी भारताची एकात्मता व अखंडतेचे रक्षण करण्यासाठी त्याने पूर्ण पाठबळ दिले पाहिजे व कायद्याच्या तत्वांचे पालन केले पाहिजे. सदर तरतुदीनुसार नागरिकांनी देशाविरुद्ध कोणत्याही प्रकारचे विधान किंवा मत व्यक्त न करणे व राष्ट्रीय नकाशा विकृत स्वरुपात न काढणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. स्पष्ट शब्दातच सांगायचे तर देश व त्यांच्या राजकीय सीमांच्या विरुद्ध कोणताही विपरीत प्रचार किंवा मतप्रदर्शन करण्यास परवानगी नाही.

### ड) देशाचे रक्षण करणे व आवश्यकता पडल्यास राष्ट्राच्या सेवेस कटिबद्ध असणे

सदर तरतुदीनुसार युद्ध किंवा राष्ट्रीय आपत्तीच्या वेळेस देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी लोकांचे सहकार्य घेण्याचा शासनाला अधिकार आहे. अशा प्रकारचे आवाहन केल्यास शासनाला जे सहकार्य लागेल ते सदर कामासाठी कायद्याच्या मर्यादेत देण्याचे नागरिकांचे कर्तव्य आहे.

### इ) धार्मिक, भाषिक, प्रादेशिक किंवा जातीय विभिन्नतेच्या पलीकडे भारतातील सर्व लोकांमध्ये सामंजस्य व सामाईक बंधुत्वाची भावना पुरस्कृत करणे



महिलांच्या प्रतिष्ठेस अवमानकारक असलेल्या प्रथांचा त्याग करणे. सदर तरतुदीनुसार भारत एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र असल्यामुळे सामाईक बंधुत्वाच्या आदर्शांचे पालन करणे व लोकांच्या एखाद्या घटकाच्या जीवनावर किंवा स्वातंत्र्यावर विपरीत परिणाम करणारी भाषणे किंवा कृती न करणे हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.सदर तरतुदीचा अन्य अनेक विशेषतः मुलभूत अधिकारासंबंधीच्या तरतुदींच्या सोबत विचार व्हायला हवा. अशा उपक्रमांना प्रतिबंध करण्याचे व लोकांना सामंजस्याने राहण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे शासनाचे कर्तव्य आहे. महिलांची सभ्यता व शालीनतेवर विपरीत परिणाम करणाऱ्या सर्व कृत्यांना प्रतिबंध करण्याचे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे.

### फ) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या संपन्न वारशाचे संवर्धन करणे व मूल्य राखणे

सांस्कृतिक वारशाचा भाग असणाऱ्या कोणत्याही संपत्तीचे किंवा स्मारकाचा किंवा सांस्कृतिक संस्थांचे संरक्षण करण्याचे आपले सर्वांचे कर्तव्य आहे, हे सदर तरतुदीवरून स्पष्ट होते.

### ग) वने, तलाव, नद्या, व वन्यजीवन ह्यासहित स्त्रोतांचे रक्षण नैसर्गिक

पर्यावरणाचे रक्षण व सुधारणा करणे व सजीव प्राण्याच्या प्रती अनुकंपा असणे. पर्यावरण व सर्व सजीव प्राणीमात्रांचे संरक्षण करण्याचे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. हा सामुहिक अधिकारांचा किंवा अंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्यांच्या तत्वज्ञानातील तिसऱ्या प्रकारच्या सर्वसामान्य कायद्यांचा प्रकार आहे.

### ह) विज्ञाननिष्ठा, मानव्य व चौकसपणा व सुधारणांच्या विचारांना विकसित करणे

सदर तरतुदीनुसार विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीचा लाभ नागरिकांना झाला पाहिजे. देशाच्या गरजा वाढविण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाच किंवा कोणत्याही संशोधनाचा वापर किंवा मानवी मूल्यांना वर्धिष्णू करण्यासाठी व्यक्तींना प्रोत्साहन देऊन पुढची प्रगती साधली पाहिजे योग्य ते कायदे करून त्याचा गैरवापर होणार नाही याची सुद्धा शासनाने काळजी घेतली पाहिजे.



### ई ) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण व हिंसेचा शपथपूर्वक त्याग करणे

सदर तरतुदीनुसार देशाच्या संपत्तीचे रक्षण करणे व लोकांच्या सामंजस्यपूर्ण जगण्याच्या विपरीत शांतता व सुरक्षिततेला कोणत्याही प्रकारे व्यत्यय आणणाऱ्या कुठल्याही कृत्यात सहभागी न होणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. सदर तरतुदीनुसार निदर्शने, हरताळ, बंद व संप ह्यामुळे होणाऱ्या राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान करण्यावर किंवा सार्वजनिक वाहनांवर दगडफेक करण्यावर प्रतिबंध आहे.

### ज) वैयक्तिक व सामुहिक उपक्रमाच्या सर्व क्षेत्रात सर्वोत्तमता साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे जेणे करून राष्ट्र सतत परिश्रमाचे व कामगिरीचे सतत नवीन स्तर साध्य करू शकेल

सतत सहकार्याने काम करून प्रत्येकाला मदत करणे हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. सदर तरतूद सामाईक बंधुत्वाच्या भावनेला व व्यक्ती व राष्ट्राला वैभवाप्रत नेण्यातील त्याचे महत्व दुगोच्चर करते.

### ल) जशी बाब असेल त्यानुसार वय वर्ष सहा ते चौदा दरम्यान आपल्या मुलांना किंवा पाल्याला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे आईवडील किंवा पालकांचे कर्तव्य.



सदर तरतुद राज्घटना (८६वी दुरुस्ती) अधिनियम २००२ द्वारे समाविष्ट करण्यात आली. शासनाने देशातील प्रत्येक बालकाला शिक्षण देणे अनिवार्य केल्यावे सदर दुरुस्ती समाविष्ट करण्यात आली. सार्वत्रिक शिक्षण साध्य करण्यासाठी प्रत्येकाला शिक्षित करणे व त्यासाठी आवश्यक त्या सुविधा पुरविणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्याच वेळी पालकांवर सुद्धा बालकांना शाळेत पाठविण्याची जबाबदारी टाकली आहे. सदर तरतुदीचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास शासन व व्यक्ती दोघांचेही हे कर्तव्य असल्याचे स्पष्ट होते. सदर तरतुदींचा समावेश केल्यावर न्यायपालिकेची जबाबदारी वाढली आहे. नागरिकांच्या अधिकरांचे कमाल संरक्षण करण्याचे राज्यघटनेचे तत्व आहे हे सुनिश्चित करण्यासाठी न्यायपालिकेने अनेक प्रकरणांमध्ये मुलभूत अधिकारांची अर्थउकल करताना मार्गदर्शक तत्वे व मुलभूत कर्तव्यांचा विचार केला आहे.

मुलभूत अधिकार, राज्यकारभाराची मार्गदर्शक तत्वे व मुलभूत कर्तव्ये विभाजित करण्याची राज्यघटनेतील ही पद्धत आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याच्या तत्वांशी व आदर्श दृष्टीकोनाशी सुसंगत आहे.

## ९. सारांश

मानवी अधिकाराच्या वैश्विक जाहीरनाम्यातील तत्वे राज्यघटनेत अंगीकारणारा भारत हा जगातील पहिला देश असल्याचे सदर सूक्ष्म चर्चेवरून पुरेसे स्पष्ट आहे. संयुक्त राष्ट्रांनी सन १९६६ मध्ये दोन वेगवेगळे करार करण्यापूर्वीच भारताने नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांचे विभाजन साध्य केले होते. मानवी अधिकारांच्या उत्तेजन व अंमलबजावणीसाठी राज्यघटनेने शासन व त्याची अभिकरणे व व्यक्तींवर समान दायित्व ठेवले आहे. ४२व्य घटनादुरुस्ती विधेयकाद्वारे कर्तव्यांचा समावेश करून प्रत्येकावर असलेल्या कायदेशीर कर्तव्याचे निर्वहन केल्याशिवाय हमी दिलेल्या अधिकारांची अंमलबजावणी होणार नाही हे मानवाधिकारांचे तत्वच अधोरेखित केले आहे. त्यामुळे अधिकारांसाठी आवाज उठविण्यापूर्वी आपल्यापैकी प्रत्येकाने आपले कर्तव्य प्रथम निर्वहन केले पाहिजे.

## नमुना प्रश्न

**१. महात्मा गांधींनी कोणत्या तत्वांवर सर्वोदय चळवळीचा पाया घातला ?**

अ. सत्य

ब. अहिंसा (ड)

क. प्रेम

ड. वरील सर्व

**२.अमेरिकन राज्यघटनातज्ञ प्राध्यापक के सी व्हीयर यांनी राज्यघटनेचे वर्णन ................ असे केले आहे.**

अ. संघराज्यीय (क)

ब. एकात्म

क. अर्धसंघराज्यीय

ड. वरीलपैकी कोणतेही नाही

**३. सन १९७६ मधील बेचाळीसाव्या घटनादुरुस्ती विधेयकाद्वारे राज्यघटनेच्या प्रस्तावनेत .................... असे शब्द समाविष्ट करण्यात आले.**

अ. न्याय व समता

ब. समाजवादी व धर्मनिरपेक्ष (ब)

क. स्वातंत्र्य व समता

ड. बंधुता व आस्था

**४. सन ................. मधील ४४व्य घटनादुरुस्तीने कलम ३०० अ नुसार मालमत्तेच्या अधिकाराचे मुलभूत अधिकारातून कायदेशीरअधिकारात रुपांतर करण्यात आले आहे.**

अ. १९७८

ब. १९८८

क. १९७७ (क)

ड. १९८७

**५. .................चा शब्दशः अर्थ शरीर न्यायालयामध्ये सादर करा किंवा न्यायालयात उत्तर द्या असा आहे.**

अ. हेबियस कॉर्पस ऍड सब्जीसियेन्दम (देहोपस्थिती प्रधिलेख)

ब. मँनडामस (अ)

क. सर्टियोरारी

ड. प्रतिषेध

## घटक २

## मानवाधिकार – अंमलबजावणी यंत्रणा

राज्यघटनेने हमी दिलेले अधिकार कसे साध्य करायचे ह्याचे मार्ग आणि साधने यांची ओळख सदर एककात होईल. तसेच राज्यघटनेने व विधीमंडळाने सूक्ष्म दृष्टीकोनातून हमी दिलेल्या अधिकारांचे उल्लंघन झाल्यास त्यावरील उपाययोजना सुद्धा सदर एककात माहित होतील. राज्यघटना, राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय कायदे व धोरणे ह्यांनी लोकांना हमी दिलेल्या अधिकारांची वाढ करण्यासाठी भारतातील न्यायपालिका व विविध प्राधिकरणे कोणत्या संदर्भाने काम करीत आहेत, हे सुद्धा माहित होईल.

### १. भारतातील मानवाधिकारांच्या विविध बाबींवर एक थोडक्यात दृष्टीक्षेप



प्राचीन ते अर्वाचीन काळापर्यंत भारतीय तत्वज्ञानाने मानवी अधिकारांच्या अंमलबजावणी व परीपुर्तीवर कर्तव्यांच्या द्वारे भर दिला आहे. प्राचीन व मध्ययुगीन ग्रंथांमध्ये, तसेच राज्यघटनेत व कायद्यांमध्ये मानवाधिकारांच्या महत्वाची व प्रवर्तनाची विस्तृत चर्चा करण्यात आली आहे. तसेच देशाची विशालता, मोठी लोकसंख्या, गरिबी, ब्रिटीश शासनाने निरनिराळ्या जमातीं मध्ये रुजवलेला विभाजनवाद, निरक्षरता, कुपोषण व अन्य बाबींमुळे राज्यव्यवस्थेतील लक्षावधी लोकांना राज्यघटनेने हमी दिलेल्या अधिकारांची परिपूर्ती होण्यावर विपरीत परिणाम झाला. संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकारविषयक विविध दस्तऐवजांवर स्वाक्षरी केल्यामुळे व त्याद्वारे घटनात्मक दृष्ट्या वैध मार्गाने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या आदर्शांची परिपूर्ती करण्याचे वचन दिल्यामुळे भारत सरकारने १९९३ मध्ये मानवाधिकार अधिनियम पारित केला. अधिनियम लागू केल्यामुळे नागरिकांच्या अधिकारांची परिपूर्ती झाली व राष्ट्रीय मानवाधिकार आयोग गठीत करून त्याची रचना, अधिकार व कार्य ह्याबाबतीत १९९१ मधील पॅरीस येथील उद्घोषित झालेल्या तत्वांच्या प्रती आपले दायित्व पूर्ण केले. जागतिक मानवाधिकार परिषद १९९३ मधील आव्हनाने भारत सरकारने मानवाधिकार अधिनियम १९९३ पारित करून घेण्यास व त्याद्वारे राष्ट्रीय मानवाधिकार आयोग स्थापनेस चालना मिळाली. ह्याशिवाय वैविध्यपूर्ण संस्कृती व विपरीत सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीमुळे राज्यघटनेने हमी दिलेल्या समाजातील वंचित व असुरक्षित गटांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी अनेक वर्षांपासून अनेक विशेष आयोग नेमण्यात आलेले आहेत.

उपरोक्त वैधानिक अंगांच्या शिवाय, संयुक्त राष्ट्राच्या सनदेचा व अन्य आंतरराष्ट्रीय कायदेशीर दस्तैवजाचा एक पक्षकार म्हणून आपल्या नागरिकांच्या मानवाधिकारांमध्ये वाढ होण्यासाठी शासनाने राज्यघटनेतील तरतुदींचे पालन करण्यावर देखरेख करण्यासाठी न्यायपालिकेला सक्षम करण्यात आले आहे.

## २. राष्ट्रीय मानवाधिकार अधिनियम १९९३

मानावाधिकारावरील अनेक आंतरराष्ट्रीय दस्तैवजांमध्ये भारत एक पक्षकार असल्यामुळे व भारताच्या राज्यघटनेतील कलम ५१ (क) ला आकार देण्यासाठी व मानवाधिकारांचे प्रवर्तन व सत्वर संरक्षण होण्यासाठी एक यंत्रणा स्थापन करण्यासाठी, सन १९९३ मध्ये मानवाधिकार अधिनियम पारित करण्यात आला. केंद्र व राज्य पातळीवर मानवाधिकार आयोग स्थापन करणे हा सदर अधिनियमाचा उद्देश आहे. मानवाधिकारांशी संबंधित बाबींवर सत्वर कार्यावाही होण्याच्या दृष्टीने जिल्हा पातळीवर मानवाधिकार न्यायालये स्थापन करण्याचे सुद्धा सदर अधिनियमात प्रस्तावित आहे. सन २००६ मध्ये अधिनियमात दुरुस्ती करण्यात आली व आयोगाचे कामकाज परिणामकारक होण्यासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या. अधिनियमाची अंमलबजावणी सुरु झाल्यापासून भारत सरकार व राज्य शासनांनी मानवधिकार आयोग स्थापन केले आहेत.

राज्यघटनेने जरी मुलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे व मुलभूत कर्तव्यांमध्ये स्पष्ट सीमारेषा आखली असली तरीही आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्यांच्या नीतीनुसार ह्या सर्वांचे प्रथमच मानवाधिकार म्हणून वर्णन करण्यात आले आहे. अधिनियमाच्या कलम २(ड) नुसार राज्यघटनेने व्यक्तीला हमी दिलेले व आंतरराष्ट्रीय करारांमुळे शासन व त्याच्या विविध अंगांवर बंधनकारक असलेले जीवन, स्वातंत्र्य, समता व प्रतिष्ठा यांचे अधिकार म्हणजे मानवाधिकार. अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वीपासूनच सार्वजनिक हितासाठीच्या याचिकांच्या माध्यमातून राज्यघटनेतील अनेक तरतुदींचा अन्वयार्थ लावताना न्यायपालिकेने अनेक प्रकरणामध्ये मानवाधिकाराच्या संकल्पनांचे प्रवर्तन केले आहे.

## ३. न्यायिक अंगे

स्वतंत्र न्यायिक अंगे हे लोकशाहीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. लोकशाहीच्या तत्वांचे व कायद्याच्या राज्याचे प्रवर्तन करण्यासाठी न्यायपालिका ही महत्वाची व अतिशय आवश्यक शाखा आहेच, पण मानवाधिकारांच्या खऱ्या अर्थाने व भावनेने संरक्षण करण्याची काळजी सुद्धा घेतली आहे. सदर तत्वांना अनुसरूनच कार्यपालिका व विधीमंडळाकडून अधिकारांचा दुरुपयोग होऊ नये म्हणून शासन व नागरिक यांच्यामध्ये स्वतंत्र न्यायपालिका असण्याचा राज्यघटनेने सदैव पुरस्कार केला आहे. त्याचवेळेस राज्यघटनेतील तरतुदी विशेषतः मार्गदर्शक तत्वानुसार अनेक क्षेत्रांमध्ये

मुलभूत अधिकारांबाबत सकारात्मक कार्यवाही होण्याच्या दृष्टीने शासनावर अंतर्निहित दायित्वे आहेत. शासनाने आपले दायित्व निभावले नाही, तर अधिकार परिणामकारक असण्यासाठी त्यांना सकारात्मक कार्यवाही करण्यास बाध्य करेल अशी फक्त न्यायपालिकाच आहे.

त्यानुसार भारतीय राज्यघटनेने न्यायव्यवस्थेचे शीर्षस्थ न्यायालय म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेचा पुरस्कार केला. तसेच भारतीय राज्यघटनेच्या संघराज्यात्मक वैशिष्ट्यांचा विचार करता प्रत्येक राज्यात उच्च न्यायालय हेच शीर्षस्थ न्यायालय असण्याचा प्रत्येक राज्याने पुरस्कार केला. सदर न्यायालयांचा पुरस्कार राज्यघटनेने केलेला असल्यामुळे त्यांना घटनात्मक न्यायालये असे सुद्धा म्हटले जाते. राज्यातील अन्य न्यायालये एका कायद्याने निर्माण करता येतात.

## भारतीय सर्वोच्च न्यायालय

भारतीय सर्वोच्च न्यायालय भारताचे सर्वोच्च न्यायालय हे देशाचे शीर्षस्थ न्यायालय असल्यामुळे नवी दिल्ली येथे स्थित आहे. देशातील शीर्षस्थ न्यायालय असल्यामुळे त्याचे निर्णय सर्व लोक व न्यायिक अंगांवर बंधनकारक असतात. सर्वोच्च न्यायालयाला मूळ, अपिलीय व सल्लामसलतीसंबंधी अधिकारक्षेत्र आहे. शीर्षस्थ न्यायालय असल्यामुळे कायद्याचे राज्य व राज्यघटनेतील तरतुदी उचलून धरण्यासाठी सदर न्यायालयाला अंतर्निहित अधिकार आहेत.



मूळ अधिकारक्षेत्रात राज्यघटनेने नागरिकांना हमी दिलेल्या मुलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी राज्यघटनेच्या कलम ३२ अंतर्गत तसेच केंद्र व राज्य किंवा दोन राज्यांमध्ये एखादा विवाद असल्यास राज्य घटनेच्या कलम १३१ अंतर्गत सर्वोच्च न्यायालय आपले अधिकार वापरते. तसेच दिवाणी व फौजदारी स्वरूपाची प्रकरणे हाताळण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. राज्यघटनेच्या कलम ३२ नुसार मुलभूत अधिकारांच्या अमलबजावणीसाठी कोणत्याही प्राधिकरणाला प्रधिलेख (रिट), निर्देश किंवा आदेश देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याचा अधिकार हा मुलभूत असल्यामुळे राज्यघटनेतील तरतूदीप्रमाणे वगळता, तो निलंबित करता येत नाही. (खत महामंडळ कामगार संघटना विरुद्ध केंद्र सरकार 1981 (1) SCC 568 ) .

राज्यघटनेतील तरतुदीनुसार न्यायालयाने कलम ३२ अन्वये पारित केलेल्या कोणत्याही आदेशाला पुन्हा सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येत नाही. त्याचवेळी न्यायालयाला अंतर्निहित अधिकार असल्यामुळे न्यायप्रक्रियेचा दुरुपयोग टाळण्यासाठी किंवा न्यायदानात गफलत झालेली असल्यास न्यायालय आपल्याच निर्णयाचा फेरविचार करू शकते. मात्र अशी पुनराविलोकन याचिका सादर करणाऱ्याने नैसर्गिक न्यायतत्वांचे उल्लंघन झाले असल्याचे किंवा ज्या न्यायाधीशांनी प्रकरणाची सुनावणी केली, त्यांना प्रकरणी स्वारस्य होते किंवा निर्णय देताना पक्षपाती असल्याचा संशय सिद्ध  केल्यास न्यायालयाला पुनर्विचाराची विनंती करता येते. मात्र न्यायदानात पक्षकरांच्या प्रती कोणतीही गफलत झालेली नाही अशी तपासणीअंती न्यायालयाची खात्री पटल्यास अशी पुनर्विचार याचिका दाखल करून घेण्याचे बंधन न्यायालयावर नाही.

कलम ३२ शिवाय विवादांची तड लावण्यासाठी राज्यघटनेतील विविध तरतुदीनुसार सर्वोच्च न्यायालयाला अधिकार आहेत. पण अधिकारांचे उल्लंघन झाल्यास मुलभूत अधिकारांची अंमलबजावणी करवून घेण्यासाठी कोणतीही व्यक्ती कलम ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयात रिट अर्ज दाखल करू शकते.

गेल्या अनेक वर्षांमध्ये, एखादी  व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीच्या मुलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्यास सार्वजनिक हितार्थ याचिका दाखल करू देण्यास परवानगी दिलेली आहे व त्यानुसार आपले अधिकारक्षेत्र विस्तारले आहे.  दुसऱ्या शब्दात सांगायचे, तर सामान्यपणे ज्या व्यक्तीच्या अधिकारांचे उल्लंघन झाले आहे, तीच त्यावर उपाययोजना करून घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल करू शकते. मात्र शासनाच्या कार्य अप्रवणते सारखी कारणे लक्षात घेऊन न्यायपालिकेने सार्वजनिक हिताची याचिका ही संकल्पना किंवा प्राध्यापक उपेंद्र बक्षी यांच्या शब्दात सांगायचे तर (सामाजिक कार्यवाही याचिका ही संकल्पना कमकुवत, गरीब, परित्यक्ता, व वंचित वर्गासाठी ८० च्या दशकात रुजवली.

सदर संकल्पनेनुसार According Locus Standi (उपस्थिती अधिकार) संकल्पनेचा विस्तार करण्यात आला आहे. सर्वसामान्यपणे Locus Standi च्या संकल्पनेनुसार ज्या व्यक्तीच्या हमी दिलेल्या अधिकारांचे उल्लंघन झाले आहे, अशाच व्यक्तीला आपल्या अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे. सार्वजनिक हितार्थ याचिकांमध्ये मात्र जिथे एखद्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या गटाच्या कायद्याने हमी दिलेल्या घटनात्मक किंवा कायदेशीर अधिकारांचे उल्लंघन झाले आहे, अशा बाबतीत इतर कोणतीही व्यक्ती त्यावरील उपाययोजनेसाठी न्यायालयात अर्ज दाखल करू शकते. (एस पी गुप्त विरुद्ध केंद्र सरकार AIR 1982 SCC 149) मात्र केलेली कृती प्रामाणिक असून फक्त बाधित लोकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी दाखल केलेली आहे एवढेच याचिकाकर्त्याला सिद्ध करावे लागते.

भारतामधील सार्वजनिक हितार्थ याचिका प्रणाली ही अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने पन्नासच्या दशकात न्यायिक क्षेत्रात विकसित केलेल्या संकल्पानेपेक्षा कितीतरी विकसित आहे. (ब्राऊन विरुद्ध शिक्षण मंडळ 347 US 483 1954. सार्वजनिक हितार्थ याचिकांची व्याप्ती व गती वाढविल्यानंतर न्यायालयाने रिटची व्याप्ती सुद्धा वाढविली. सार्वजनिक हितार्थ याचिकांमध्ये एखाद्या व्यक्तीने सर्वोच्च न्यायालयाला संबोधित केलेले पत्रात भरीव कायदेशीर मुद्दे विचारार्थ उपस्थित करण्यात आले असल्याची न्यायालयाची प्रथम दर्शनी खात्री पटल्यास सदर पत्रसुद्धा याचिका म्हणून विचारात घेता येते. तसेच आपल्या अंतर्निहित अधिकारांचा वापर करून व ज्या लाखो लोकांचे अधिकार शासनाने पूर्णपणे अमलात आणलेले नाहीत त्यांचे हित लक्षात घेऊन माध्यमांमधील अहवालांच्या आधारे स्वतःहून (Suo-moto) विविध प्राधिकरणांना रिट किंवा निर्देश जारी करू शकते. न्यायपालिकेचे अधिकारक्षेत्र विस्तारित करण्याचे बहुतांशी श्रेय भारताचे भूतपूर्व सरन्यायाधीश न्यायमूर्ती पी एन भगवती यांच्याकडे जाते.

## उच्च न्यायालये

राज्यांच्या पातळीवर न्यायालय प्रणालीची संकल्पना भारतात नवीन नाही. भारताची राज्यघटना अस्तित्वात येण्याच्या आधी सुद्धा मुंबई, चेन्नई व कोलकाता येथे सन १८६२ मध्ये उच्च न्यायालये स्थापन करण्यात आली होती. त्यांची कार्ये व अधिकार वेळोवेळी पारित कायद्यांच्याद्वारे व्याख्यीत करण्यात आले होते. उच्च न्यायालयांचे महत्व लक्षात घेऊन घटना परिषदेने विविध राज्यांमध्ये उच्च न्यायालये स्थापन करण्यासाठी तरतूद केली. त्यनुसार राज्यघटनेच्या कलम २१४ ते २३५ पर्यंत उच्च न्यायालयांच्या संदर्भात विविध तरतुदी आहेत. राज्यघटनेतील तरतुदीनुसार सर्वसामान्यपणे प्रत्येक राज्याला एक उच्च न्यायालय असेल. मात्र संसदेला कायद्याद्वारे उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र एका पेक्षा अधिक राज्यांसाठी विस्तारण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार देशात सध्या २१ न्यायालये कार्यरत आहेत.

उच्च न्यायालये ही राज्यांमधील शीर्षस्थ न्यायिक प्राधिकरण आहे. त्यांना न्यायिक व प्रशासकीय अधिकार आहेत. त्यानुसार उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय कार्यक्षेत्रात राज्यातील किंवा कायद्याने बहाल केलेल्या अधिकारक्षेत्रातील सर्व कनिष्ठ न्यायालये व न्यायाधीकरणे येतात. अपिलासाठी असणाऱ्या तरतुदीनुसार उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येते. उच्च न्यायालयांना घटनात्मक दर्जा असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाप्रमाणेच उच्च न्यायालयाला सुद्धा नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी अनेक अधिकार आहेत. कलम २२६ नुसार, बाधित लोकांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी विविध प्रकारची रिट जारी करण्याचे अधिकार उच्च न्यायालयाला आहेत. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांवर आधारून

अधिकारांचा वापर करण्याच्या संबंधात स्पष्टता येण्यासाठी कलम २२६ च्या तरतुदीमध्ये अनेक वेळा बदल करण्यात आले आहेत.

लेफ्टनंट कर्नल खजुर सिंह विरुद्ध भारत सरकार (AIR 1961 SCC 532 प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्वोच्च न्यायालय व पंजाब उच्च न्यायालयाचे दिल्लीमधील फिरते खंडपीठ वगळता सर्वसामान्यपणे उच्च न्यायालयाला भारतीय संघराज्याविरुद्ध रिट जारी करण्याचा अधिकार नाही. मात्र अधिकारक्षेत्रामध्ये केंद्र शासनाशी संबंधित प्रकरण असल्यास भारत सरकारला रिट (प्रधिलेख) जारी करण्याबाबत उच्च न्यायालयांवर कोणतेही बंधन नाही. न्यायिक उपाययोजना करण्यासाठी त्या व्यक्तीला पर्यायी न्यायिक उपाययोजना असल्यास उच्च न्यायालय सर्वसामान्यपणे रिट जारी करण्यासाठीची याचिका दाखल करून घेणार नाही. मात्र ए व्ही व्यंकटेशवरन विरुद्ध आर एस वाधवानी (AIR 1961 SCC 1506) प्रकरणी निकाल देताना मुलभूत अधिकारांचे संरक्षण किंवा अमलबजावणी करण्यासाठी व पक्षकाराला उपलब्ध पर्यायी उपाययोजनेचा अवलंब करण्याचे निर्देश देण्यासाठी हा नियम उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रावर कोणतीही बाधा आणत नाही असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यानुसार राज्यघटनेच्या भाग तीन मधील हमी दिलेल्या मुलभूत अधिकारांच्या रक्षणासाठी व प्रवर्तनासाठी रिट जारी करण्याचे उच्च न्यायालयाला व्यापक व दूरगामी अधिकार आहेत. त्याचवेळेला राज्यघटनेतील तरतुदी व सर्वोच्च न्यायालयाचे आदेश ह्यानुसार उच्च न्यायालयांना रिट जारी करण्याचे अधिकार असले तरीही ते जारी करण्यापूर्वी त्यांनी प्रकरणाच्या तथ्यांमधील गांभीर्याचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे.

विविध अंगे व नागरिकांना हमी दिलेल्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण व प्रवर्तन करण्यासाठी न्यायपालिकेने महत्वाची भूमिका बजावली असल्याचे सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांच्या अधिकारांचे थोडक्यात परीक्षण करताना स्पष्टपणे लक्षात येते. केवळ राज्यघटनेने हमी दिलेल्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठीच नव्हे तर आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्यातील तत्वांची चौकट अंतःक्षेपित करण्यासाठी सुद्धा राज्यघटनेची कलम ३२ व २२६ न्यायपालिकेला निरंकुश अधिकार बहाल करतात. न्यायिक अंगांना सदर कलमांच्या अंतर्गत बहाल केलेल्या अधिकारांना कायद्याच्या तत्वज्ञानात न्यायिक पुनरावलोकन असे म्हटले जाते. सन १९५० ते सन १९६३ पर्यंत भारताचे पहिले महाधिवक्ता म्हणून काम करणारे नामवंत कायदेपंडित श्री.एम.सी. सेटलवाड यांच्या शब्दात सांगायचे तर न्यायिक पुनर्विलोकनाचा जो अधिकार इतर देशांमध्ये लढून प्राप्त करावा लागला, तो आपल्याला राज्यघटनेनेच बहाल केला आहे. एका महान कायदेपंडिताचे सदर उद्गार व न्यायपालिकेने घेतलेली सक्रीय भूमिका ह्यामुळे अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधक, राज्यकर्ते व बिगर शासकीय संघटनांनी पुढे केलेल्या मानवाधिकारांच्या तक्रारींच्या

त्रोटक निवारणासाठी असलेल्या उपाययोजनांबाबत केलेल्या उलट सुलट युक्तिवादाला परस्परच उत्तर मिळाले आहे.

## ४. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग




राष्ट्रीय मानवाधिकार अधिनियम १९९३ ला आकार देण्यासाठी भारत सरकारने १९९३ मध्ये राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना केली. आयोगाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. अधिनियमाच्या कलम १२ नुसार मानवाधिकारांचे उल्लंघन झाल्यास स्वत:हून किंवा पिडीत किंवा त्याच्या वतीने दाखल याचिकेच्या आधारावर चौकशी करण्यास सक्षम आहे. मानवाधिकाराच्या उल्लंघनासंबंधीची माहितीबाबत बाजू मांडण्यासाठी किंवा न्यायालयासमक्ष ठेवण्यासाठी ज्या न्यायालयात त्या संबंधाने कामकाज सुरु आहे, त्या न्यायालयाच्या पूर्वपरवानगीने कामकाजात सामील होऊ शकतो. उदाहरणार्थ अरुणाचल प्रदेशातील सुमारे ६५००० चकमा आदिवासी निर्वासितांच्या बाबतीत, त्यांच्या नागरिकत्व अधिकारांच्या बाबतीत एका बिगर शासकीय संघटनेच्या समितीच्या तक्रारीवरून, राज्यघटनेच्या कलम २१ नुसार आदिवासींच्या सदर अधिकारांची अंमलबजावणी होण्यासाठी आयोगाने राज्यघटनेच्या कलम ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयात सार्वजनिक हितार्थ याचिका दाखल केली होती (राष्ट्रीय मानवाधिकार आयोग विरुद्ध अरुणाचल प्रदेश शासन व अन्य 1996 SCC (1) (742). स्थितीचा अंदाज घेण्यासाठी व अशा प्राधिकरणांना निरीक्षणासाजोत शिफारशी व सूचना करण्यासाठी राज्य किंवा केंद्र शासनाचं अखत्यारीतील कारागृहासहित कोणत्याही संस्थेला आयोगातर्फे भेट दिली जाऊ शकते.

दहशतवादाशी संबंधित कोणत्याही कायदा, अधिनियम किंवा घटकाचे आयोग पुनरीक्षण करू शकतात व असे कायदे व नियम बदलण्यासाठी किंवा त्यांचे पुनरीक्षण करण्यासाठी भारत सरकारला शिफारस करू शकतात. बहाल केलेल्या अधिकारांचा वापर करून प्राप्त झालेल्या तक्रारींच्या आधारावर किंवा स्वत:हून आयोगाने वंचित गटांच्या विविध विभागांमध्ये अनेक अभ्यास हाती घेतले होते. मानवाधिकारासंबधीच्या आंतरराष्ट्रीय कायदेशीर दस्तऐवजाची तपासणी करून भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१ (क) नुसार मानवाधिकारांच्या प्रवर्तनासाठी आवश्यक त्या उपाययोजना व सूचना भारत सरकारला करणे, हे आयोगाचे एक कर्तव्य आहे.

मानवाधिकारांच्या प्रवर्तनासाठी परिषदा, परिसंवाद, कार्यशाळा भरवून संशोधनाला चालना देण्याचे सुद्धा आयोगाचे कर्तव्य आहे. ह्या अनुषंगाने राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून नियमितपणे अर्ज मागविण्यात येतात व बिगर शासकीय संघटनांच्या सहकार्याने विविध शैक्षणिक व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामध्ये कार्यशाळा,परिसंवाद व परिषदांचे आयोजन करण्यात येते. मानवाधिकारांच्या प्रवर्तनासाठी आयोग अनेक पुस्तके,टिपणे व अन्य आवश्यक साहित्य प्रसिद्ध करत असते.

अधिनियमाच्या कलम १३ नुसार आयोगाला दिवाणी न्यायालयाचे व मानवाधिकाराशी संबंधित बाबींवर निर्णय घेण्यासाठी चौकशी, नोटीस जारी करणे व कायद्यांचे परीक्षण करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. सन १९९३ मध्ये स्थापना झाल्यापासून आयोगाने गेल्या दोन दशकांमध्ये अनेक लोकांच्या मानवाधिकारांच्या प्रवर्तनावर महत्वाचा ठसा उमटविला आहे. त्यांनी सादर केलेले काही अहवाल व शिफारशी भारत सरकारने मान्य केल्या असून यामुळे विविध कायदे व विनियमांमध्ये अनेक बदल झाले आहेत.

अधिनियमातील तरतुदींचे विशेषतः कलम २ (१)(ड) मध्ये दिलेल्या मानवाधिकारांच्या व्याख्येचे परीक्षण केल्यास सदर अधिकार हे आर्थिक, सामाजिक व संस्कृती अधिकारांच्या पेक्षा नागरी व राजकीय अधिकारांच्या अंमलबजावणीपुरते मर्यादित आहे कारण सदर मानवाधिकार हे न्यायालयात हर्तनशील आहेत. अधिनियम अंगीकारल्यानंतर दोन दशके होऊन सुद्धा केंद्र व राज्य शासनांनी मानवी अधिकारांच्या उल्लंघनावर गतिमान व त्वरित उपाययोजनेसाठी जिल्हा पातळीवर मानवाधिकार न्यायालये स्थापन केलेली नाहीत, हे खचितच दुर्दैवी आहे.

## ५. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग

केंद्रीय अधिनियमाच्या कलम २१-२९ नुसार राज्यांना बहाल करण्यात आलेल्या मानवाधिकार आयोग नेमण्याच्या अधिकाराचा अवलंब करून महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाची स्थापना सन २००१ मध्ये करण्यात आली. आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या धर्तीवर राज्य मानवाधिकार आयोग महारााष्ट्रातील लोकांच्या मानवाधिकारांची अमलबजावणी करतो. मात्र त्यांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यापुरतेच मर्यादित आहे. राज्य आयोगाने विविध पैलूंवर काम केले असून शासनाच्या विचारार्थ अनेक अहवाल सादर केले आहेत. सन २०१० मध्ये त्यांनी घेतलेल्या एका मानवाधिकारांच्या संदर्भातील कार्यशाळेत त्याबाबत प्रशिक्षण देण्यासाठी विविध विमानके विकसित होऊन पुणे विद्यापीठाने मा. राज्यपाल व महाराष्ट्र शासनाच्या आशीर्वादाने मानवाधिकार शिक्षण कार्यक्रमाची रुजवात केली.

राष्ट्रीय व राज्य मानवाधिकार आयोग विद्यार्थ्यांना मानवाधिकारांचे महत्व समजण्यासाठी व त्याचा प्रसार करण्यासाठी चार आठवड्यांची अंतरवासितावृत्ती देते. त्याबाबतचे तपशील दोन्ही आयोगाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्यायावत करण्यात येतात.

## ६. महिला, बालके, अल्पसंख्यांक व अनुसूचित जाती व जमातींसाठी असलेले आयोग

विविध संस्था व राष्ट्रांशी झालेल्या चर्चांवर व सल्लामसलतीवर आधारून संयुक्त राष्ट्रांनी सर्वसामान्य माणसाच्या मानवाधिकारांच्या शिवाय जगातील वंचित घटकांच्या अधिकारांचे वर्धन होण्यासाठी अनेक ठराव व करार पारित केले आहेत. अशा वंचित घटकांना समाजातील विकसित व पुढारलेल्या वर्गांच्या बरोबरीने आणण्यासाठी वंचित वर्गाला सवलती देणारे विनिर्दिष्ट कायदे सर्व राष्ट्रांनी पारित करण्याचे आवाहन केले आहे. अशी धोरणात्मक उपाययोजना किंवा कायदे पारित करताना राष्ट्रांनी सदर अधिकार उपभोगण्यापासून त्यांना वंचित करणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक पैलूंचा विचार विचार करावा व कोणत्याही विचलनाशिवाय त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर हमी दिलेले मानवाधिकार मुक्तपणे उपभोगता येतील यासाठी योग्य ती यंत्रणा उभारावी याची पुनरुक्ती केली आहे. तसेच अशा लोकांना त्यांनी स्वावलंबी होण्यासाठी व समत्वाने राजकीय व्यवस्थेत सहभागी होण्यासाठी राष्ट्रांनी आवश्यक त्या सवलती दिल्या पाहिजेत.




भारतामध्ये लिंग, सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व जातीय आधारावर अनेक बाबतीत मागास असणाऱ्या महिला, बालके, अल्पसंख्यांक, अनुसूचित जाती व जमाती यांना वंचित लोकांचे गट म्हणून संबोधण्यात येते. त्यांच्या अधिकारांचे वर्धन होण्यासाठी घटना परिषदेने राज्यघटनेच्या विविध तरतुदींच्या द्वारे अनेक सवलती दिल्या आहेत. भारत सरकारने आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय दायित्व म्हणून वंचित गटांना समाजातील पुढारलेल्या वर्गांच्या बरोबरीने आणण्यासाठी अनेक धोरणे अंगिकारली आहेत व विशेष कायदे करून अनेक प्रकारच्या सवलती देऊ केल्या आहेत. मात्र गरिबी, निरक्षरता, व अन्य सामाजिक- आर्थिक पैलूंमुळे विविध आघाड्यांवर त्यांच्याबाबत भेदभाव केला जातो व त्यांनी मुक्तपणे आपले अधिकार उपभोगू नयेत म्हणून त्यांना लक्ष्य केले जाते. सदर लोकांना राजकीय व्यवस्थेतील पुढारलेल्या गटांच्या बरोबरीने एकीकृत करण्यासाठी व त्यांना सत्वर न्याय मिळवून देऊन त्यांच्या अधिकारांचे संरक्षण

करण्यासाठी व कल्याणासाठी व आपल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायदेशीर दायित्वांचे निर्वाहन करण्यासाठी व मानवाधिकारांच्या सामाजिक न्यायाची तत्वे साध्य करण्यासठी भारत सरकारने स्वतंत्र आयोग स्थापन केले आहेत.

## ७. राष्ट्रीय महिला आयोग

स्वतः नेमलेल्या अनेक आयोगांच्या अहवालांचा व संयुक्त राष्ट्र महिला आयोगाच्या शिफारशींचा विचार करून भारत सरकारने राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम १९९० मधील तरतुदीनुसार १९९२ मध्ये नवी दिल्ली येथे राष्ट्रीय महिला आयोग स्थापन केला. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार आयोगाला महिलांशी संबंधित सर्व बाबींवर तपास करून राज्यघटनेतील व अन्य अधिनियमांमधील तरतुदीनुसार परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारशींसह अहवाल सादर करण्याचे आयोगाला अधिकार आहेत. महिलांच्या अधिकारांशी संबंधित कोणत्याही प्रकारचे उल्लंघन झाले असल्यास स्वतः होऊन किंवा पक्षकाराच्या नोटीसीद्वारे तक्रार स्वीकारण्याचा आयोगाला अधिकार आहे. महिलांच्या अधिकारांचे प्रवर्तन होण्यासाठी व त्याच्या विरुद्ध असण्याऱ्या भेदभावाच्या चालीरीतींचे उच्चाटन करण्यासाठी आयोग संशोधन व अन्य शैक्षणिक उपक्रम राबवू शकतो व महिलांना सर्व क्षेत्रात योग्य ते प्रतिनिधित्व मिळण्यासाठी उपाययोजना सुचवू शकतो. महिलांशी संबंधित बाबींची चौकशी करताना आयोगाला दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील.

स्थापना झाल्यापासून गेल्या दोन दशकांमध्ये कायद्याने हमी दिलेल्या महिलांच्या अधिकारांचे प्रवर्तन होण्यासाठी आयोगाने अनेक अहवाल व शिफारशी सादर केल्या आहेत. आयोगाच्या सततच्या प्रयत्नांमुळे घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अमलात आला. भारताच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक वाटचालीत महिलांचा लक्षणीय सहभाग असण्यासाठी आयोगाने अनेक कार्यशाळा, परिसंवाद, परिषदा व अन्य विविध उपक्रम हाती घेतले आहेत. जात व जमातीच्या अभिमानासाठी तरुण युगलांची हत्या व महिलांवरील ॲसीड हल्ले प्रतिबंधित कण्यासाठी विशेष कायदा पारित करण्यासाठी एक मसुदा टिपण सादर केले आहे.

## ८. महाराष्ट्र राज्य महिला आयोग

भारत सरकारचं अधिनियामामध्ये राज्य पातळीवर महिला आयोग स्थापन करण्यासाठी विनिर्दिष्ट तरतूद नसली तरीही महाराष्ट्र शासनाने राज्य विधीमंडळाच्या १९९३ मधील एका अधिनियमान्वये राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर राज्य आयोग स्थापन केला. राज्यातील महिलांच्या अधिकारांना प्रवर्तित करण्यासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांना, व त्यांच्यासोबत भेदभाव करणाऱ्या चालीरीतींना व प्रतिष्ठेला धक्का देणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठीच्या धोरणाची सुसंगती म्हणून आयोगाची स्थापना झाली. आयोग महिलांना व पिडीत महिलांना विविध कायदेशीर पैलूंच्या बाबत सल्ला देतो. महिलांशी संबंधित अनेक पैलूंवर संशोधन अभ्यास प्रवर्तित करतो व महिलांच्या अधिकारांचे प्रवर्तन करण्यासाठी अनेक परिसंवाद, परिषदा, व अन्य आवश्यक उपक्रम आयोजित करते.

महिलांवरील विविध अत्याचार व गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी शासनाने राज्यामध्ये १२ विशेष न्यायालये स्थापन केली आहेत. विशेष न्यायालयांच्या व्यतिरिक्त ज्या शहरांची लोकसंख्या दहा लाखांपेक्षा जास्त आहे, तिथे विवाह, संपत्ती, पोटगी, व अज्ञान मुलांचे पालकत्व इत्यादी बाबी ठरविण्यासाठी शासनाने कुटुंब न्यायालये गठीत केली आहेत. आयोग व विशेष न्यायालये स्थापन करण्याच्या व्यतिरिक्त शासनाने महिलांच्या अधिकारांच्या प्रवर्तनासाठी अनेक सकारात्मक उपाययोजना केल्या असून महिलांशी संबंधित बाबींचा विशेष अभ्यास व संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येते.

## ९. राष्ट्रीय बालअधिकार संरक्षण आयोग

अज्ञान, किंवा गरिबी, हळुवारपण, त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यास मुले पुरेशी प्रगल्भ नसतात असा सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीकोन ह्यामुळे बालकांच्या अधिकारांचे सरसह उल्लंघन होत असते. त्यांच्या अधिकारांचे वर्धन करण्यासाठी श्रीमती इगलताईन जेब्ज यांच्या प्रयत्नांमुळे राष्ट्रांना काही धोरणे आखावी लागली व त्यातूनच संयुक्त राष्ट्र बाल निधीची स्थापना झाली. संयुक्त राष्ट्रे व अन्य आंतरराष्ट्रीय व बिगर शासकीयसंघटनांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे बालकांच्या अधिकारांबाबतचा करार १९८९ मध्ये आकाराला आला. आपली राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दायित्वे निर्वाहन करण्यासाठी भारत सरकारने सन २००५ मध्ये राष्ट्रीय

बालअधिकार संरक्षण आयोग अधिनियम लागू केला. राष्ट्रीय बालअधिकार संरक्षण आयोगाची स्थापना सन २००७ मध्ये करण्यात आली. तळागाळातून प्राप्त अभिप्रयांवर आधारून विविध धोरणे, कायदे यांचे पुनरावलोकन करण्याचा व अधिकार देशाच्या प्रत्येक विभागाची व घटनात्मक व आंतरराष्ट्रीय दायित्वांचे निर्वाहन करण्याची शासनाला आवश्यक ती यंत्रणा सुचविण्याचे अधिकार आयोगाला आहेत. बालकांच्या अधिकारांचे उल्लंघन झाल्यास, एखाद्या नीती किंवा कायद्याची अंमलबजावणी न झाल्यास स्वतः होऊन किंवा पिडीत व्यक्ती किंवा त्याच्या तर्फे कोणत्याही व्यक्तीकडून प्राप्त तक्रारीच्या आधारावर आयोग बालअधिकाराच्या उल्लंघनाशी संबंधित कोणत्याही बाबीची चौकशी करू शकतो. बालकांच्या अधिकारांचं वर्धनासाठी योग्य तो आदेश किंवा उपाययोजना करण्यासाठी आयोगाला कोणत्याही उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे. बालकांच्या अधिकारांच्या उल्लंघन किंवा संरक्षणाशी संबंधित कोणत्याही बाबीवर चौकशी करण्याच्या बाबतीत आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्राप्त आहेत. विविध कायद्यांमध्ये वय वर्ष १४ ते १८ वयोगटातील बालकांना वर्णीत करण्यामध्ये फरक असला तरीही सदर अधिनियमानुसार १८ वर्षे वयाखालील कोणतीही व्यक्ती बालक असल्याचे व्याख्यीत करण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्येक प्राधिकरण व कायदेशीर तरतुदीत बालक म्हणजे १८ वर्षाखालील व्यक्ती असा विचार करण्याची गरज निहित आहे .

## १०. महाराष्ट्र राज्य बालअधिकार संरक्षण आयोग

अधिनियमातील तरतुदींना अनुसरून देशातील सुमारे १८ राज्यांनी राज्य पातळीवर बाल अधिकार आयोग स्थापन केला आहे. राज्यातील बालकांच्या कल्याणावर देखरेख ठेवणे व कोवळ्या वयात प्रत्येक बाबतीत फुलण्यासाठी बालकांच्या अधिकारांचे वर्धन होण्यासाठी आवश्यक ती पाउले उचलण्याचा सल्ला शासनाला देणे हे राज्य आयोगाचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय बालअधिकार संरक्षण आयोगाच्या धर्तीवर राज्य शासनाने सन २००७ मध्ये राज्य पातळीवरील आयोगाचे गठन केले. राज्याने बालकांबाबतचे धोरण सन १९७५ मध्येच अंगिकारले आहे.

बालकांच्या अधिकारांचे वर्धन होण्याच्या विविध पैलूंचा विचार होण्याच्या दृष्टीने झोपडपट्टी, दुर्लक्षित, परित्यक्त, व रस्त्यावरील बालकांवर विशेष भर देऊन आयोगाने आपल्या स्थापनेपासून अनेक अहवाल शासनाला सादर केले आहेत. सन २०१२ मध्ये धारावी ह्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीतील बालकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी आयोगाने राष्ट्रीय पातळीवरील एक परिसंवाद आयोजित केला होता.

ह्या विविध उपक्रमांच्या शिवाय, यशदा ह्या शासकीय प्रशिक्षण संस्थेच्या सहकार्याने आयोगाने बालकांच्या अधिकारांचे वर्धन करण्याच्या उद्देशाने धोरणाचा मसुदा तयार करून त्याचा

स्वीकार होण्यासाठी राज्य शासनाला सादर केला आहे. आपल्या दायित्वाचे निर्वहन करण्याच्या दृष्टीने शासनाने सदर धोरण मंजूर करण्यासाठी महिला व बालकल्याण मंत्री श्रीमती वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली आहे.

## ११. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग

संयुक्त राष्ट्रांच्या अल्पसंख्यांक विरोधी भेदभाव प्रतिबंध व संरक्षण उपायोगाचे विशेष प्रतिनिधी श्री फ्रान्सिस्को कपोतोर्ती ह्यांच्या म्हणण्यानुसार राष्ट्रांच्या लोकसंख्येमध्ये इतर संख्यात्मक दृष्टीने अल्प असणाऱ्या, अप्रभावी स्थितीत असणाऱ्या, त्या देशाचे राष्ट्रीक असणारे नागरिक अन्य लोकसंख्येपेक्षा वेगळी अशी वांशिक, धार्मिक किंवा भाषिक वैशिष्ट्ये व त्यांची संस्कृती, परंपरा, धर्म किंवा भाषा संवर्धन करण्यासाठी एकजूट दाखविणाऱ्या गटाला अल्पसंख्यांक असे संबोधित करण्यात येते. मात्र व्यक्तीनिष्ठ (व्यक्तींनी स्वतःला अल्पसंख्य गटाचे असल्याची ओळख पटविली पाहिजे ) व वस्तुनिष्ठ (सामाजिक वांशिकता, भाषा किंवा धर्म) घटकांबाबत सदस्य राष्ट्रांमध्ये एकवाक्यता नसल्यामुळे अल्पसंख्यांकांना व्याख्यीत करणारा कोणताही आंतरराष्ट्रीय कायदा अस्तित्वात नाही. मात्र संयुक्त राष्ट्रांनी १९९२ मध्ये अंगिकारलेल्या राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांक व्यक्तींचे अधिकार घोषणापत्रामध्ये राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक व भाषिक ओळख असलेल्या अल्पसंख्यांकांकडे निर्देश केला असून त्यांची ओळख वर्धित व मानवाधिकार संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती पाउले उचलण्याचे कर्तव्य राष्ट्रावर सोपविण्यात आले आहे.

राज्यघटनेत किंवा कोणत्याही कायद्यात अल्पसंख्यांक म्हणजे कोण याची नेमकी व्याख्या कुठेही दिलेली नाही. सामान्यपणे राज्यघटनेची कलम २५–३० ही अल्पसंख्यांकांचे विविध अधिकार व्याख्यीत करणारी कलमे म्हणून ओळखली जातात. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग अधिनियम १९९२ द्वारे कोणताही समूह अल्पसंख्यांक म्हणून अधिसूचित करण्यासाठी भारतीय संघराज्याला मुभा देण्यात आली आहे. त्यानुसार भारत सरकारने मुस्लीम, ख्रिस्चन, शीख, बौद्ध, पारसी समुदायांना अल्पसंख्यांक म्हणून अधिसूचित केले आहे. त्यांच्या अधिकारांचे संरक्षण व गरजा पूर्ण करण्यासाठी एक राष्ट्रीय आयोग १९९२ मध्येच स्थापन करण्यात आला होता. आयोग

प्रचलित धोरणे व कायद्यांचे मुल्यांकन करेल व अल्पसंख्यांकांच्या अधिकारांचे वर्धन होण्यासाठी अवलंब करण्याच्या उपायांची शिफारस करेल. शासनाने अंगीकारण्याच्या आवश्यक त्या सुरक्षात्मक उपाययोजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी आयोग विनिर्दिष्ट शिफारशी करू शकतो. अल्पसंख्यांकांच्या अधिकारांचे प्रवर्तन होणाऱ्या कोणत्याही संशोधनाला व अभ्यासाला आयोग प्रोत्साहन देईल. कोणत्याही समूहाकडून अधिकारांचे उल्लंघन झाल्याच्या तक्रारीच्या आधारावर चौकशी करताना आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतात. विविध उपक्रम, कामगिरी, व शासनाला केलेल्या शिफारशी यांची माहिती देणारा वार्षिक अहवाल आयोगातर्फे प्रसिद्ध होतो. आयोगाच्या शिफारशींवर आधारित व स्वतःहोऊन शासनाने अल्पसंख्यांकांचे अधिकार वर्धन करण्यासाठी अनेक कल्याण योजना हाती घेतल्या आहेत.

केंद्र शासनासोबत भारतातील १५ राज्यांनी त्यांच्या राज्यांमध्ये अल्पसंख्यांक आयोग स्थापन केले आहेत. महाराष्ट्र राज्याने राज्य अल्पसंख्यांक आयोग अधिनियम २००४ मध्ये पारित करून सदर आयोगाची सन २००५ मध्ये स्थापना केली. राष्ट्रीय आयोगाच्या धर्तीवर सदर आयोग महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्यांकांचे अधिकार वर्धित करण्यासाठी आपले अधिकार वापरेल व कर्तव्ये पार पाडेल.

## १२. अनुसूचित जाती व जमाती राष्ट्रीय आयोग

मानवाधिकारांच्या प्रवर्तनात व अंमलबजावणीत लोकांच्या विकासावर व वाढीवर परिणाम करणाऱ्या विविध बाबीपैकी भारतीय समाजात जात महत्वाची भूमिका बजावते. स्वतःला उच्च जातीतील म्हणवणाऱ्या लोकांच्या स्वार्थी हितसंबंधांमुळे अस्पृश्यतेच्या संकल्पनेचा जन्म झाला व लोकांच्या एका घटकाला निम्न जाती संबोधून बहिष्कृत करण्यात आले. सदर निम्न जातीतील लोकांचे अनुसूचित जाती व जमाती असे वर्णन केले गेले. पिढ्यानुपिढ्या त्यांना मुलभूत अधिकार नाकारण्यात आले व हमी दिलेल्या अधिकारांच्या किमान उपभोगासहित राजकीय व्यवस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांना प्रतिबंध करण्यात आला. त्यांच्या अशा अवस्थेमुळे त्यांची कणव येऊन अनेक राज्यकर्त्यांनी, लोकोपकारी व्यक्तींनी व मानवाधिकार कार्यकर्त्यांनी उलथापालथीविरुद्ध लढा देऊन समानतेची व समाजाच्या अन्य गटांबरोबर त्यांना अधिकार उपभोगणे शक्य होण्यासाठी घटनात्मक सोयीसवलती देण्याची मागणी केली. घटना समितीने त्याला सकारात्मक प्रतिसाद देत समाजातील सदर वर्गाला त्यांची मानवी प्रतिष्ठा बहाल करण्यासाठी व पिढ्यानुपिढ्या त्यांच्यावर झालेला

अन्याय दूर करण्यासाठी व त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, व सांस्कृतिक अधिकारांचे रक्षण करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या.




राज्यघटनेतील कलम ३३८ मधील तरतुदीनुसार भारत सरकारने अनुसूचित जाती व जमातींसाठी एक आयुक्त नेमले. सदर समूहांच्या प्रवर्तनासाठी राज्यघटनेत तरतूद करण्यात आलेल्या विविध सुरक्षितता उपाययोजनांच्या बाबतीतील सर्व बाबींकडे लक्ष देण्याचे व सदर सुरक्षितता उपाययोजनांच्या कार्याबाबत राष्ट्रपतींना अहवाल सादर करण्याचे सदर आयुक्तांचे कर्तव्य होते. विविध राज्ये व तळागाळातील प्रशासकीय एकके समाविष्ट करण्यासाठी टप्प्याटप्प्याने आयुक्तांच्या कार्यालयाचा विस्तार करण्यात आला.

अनेक संसद सदस्यांनी वेळोवेळी कलम ३३८ च्या तरतुदींमध्ये दुरुस्ती करून सदर गटांच्या विकासासाठी एक सदस्यीय ऐवजी बहुसदस्सीय आयोगाची नेमणूक करण्याची मागणी केली. त्यानुसार राज्यघटनेत दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. मात्र सदर दुरुस्ती आकार घेण्यापूर्वीच भारत सरकारने गृह मंत्रालयाच्या अधिसूचनेद्वारे ऑगस्ट १९७८ मध्ये अनुसूचित जाती व जमाती आयोग म्हणून बहुसदस्सीय आयोगाची नेमणूक केली. सदर गटांच्या अधिकारांचे प्रवार्तान होण्यासाठी विविध मुद्द्यांवर शासनाला सल्ला देण्यासाठी एक राष्ट्रींय सल्लागार मंडळाच्या स्वरुपात आयोग गठीत करण्यात आला होता. सदर गटांच्या अधिकारांचे प्रवर्तन होण्यासाठी विविध बाबींवर आयोगाने शासनाला जवळपास ३० अहवाल सादर केले होते.

सन १९९० मधील पासष्टाव्या घटनादुरुस्तीद्वारे कलम ३५८ मध्ये करण्यात आलेल्या बदलामुळे भारत सरकारने अनुसूचित जाती व जमाती आयोगाला वैधानिक दर्जा दिला. अस्पृश्यता निर्मुलनाचा पुरस्कार करणाऱ्या नागरी अधिकार संरक्षण अधिनियम १९५५ व अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९९० अमलात आणण्यासाठी आयोग कटिबद्ध आहे. केंद्र किंवा राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेशाला आयोग मार्गदर्शन करेलच पण अनुसूचित जाती व जमातींच्या सामाजिक आर्थिक विकास पैलूंच्या नियोजनाच्या प्रक्रियेत सामील होण्याचा आयोगाला अधिकार आहे. सदर गटांच्या अधिकारांच्या वर्धनाबाबत उपाययोजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी आयोग नियमित कालावधीने भारताच्या राष्ट्रपतींना अहवाल सादर करेल व राष्ट्रपती सदर अहवाल भारतीय संसदेला सादर करतील. आयोगासमक्ष आलेल्या उल्लंघनाच्या किंवा अत्याचाराच्या कोणत्याही तक्रारीची चौकशी करण्याचा आयोगाला अधिकार असून सदर चौकशी करताना आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत.

सन २००३ मधील ८९व्या घटनादुरुस्ती विधेयकाने कलाम ३३८ मध्ये उपकलम अ समाविष्ट करून राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोगाचे विभाजन पुरस्कृत करण्यात येऊन

राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग व राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग नामे दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आले. घटनादुरुस्तीनुसार सन २००४ मध्ये शासनाने राष्ट्रीय आयोगाचे वरीलप्रमाणे दोन स्वतंत्र आयोगांमध्ये विभाजन केले. सन २००४ मध्ये गठीत झाल्यापासून दोन्ही आयोग वर उल्लेख केलेले अधिकार स्वतंत्रपणे वापरत आहेत व त्यांचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. राष्ट्रीय आयोगाशिवाय अनेक राज्यांनी सुद्धा सदर गटांच्या कल्याणासाठी व राज्याघटनेत पुरस्कृत अधिकार मुक्तपणे उपभोगणे शक्य होण्यासाठी व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याच्या तत्वांची परिपूर्ती करण्यासाठी त्याच धर्तीवर राज्य आयोगाची स्थापना केली आहे.

वरील आयोगाशिवाय सर्वोच्च न्यायालयाने इंद्र सहानी विरुद्ध केंद्र सरकार (AIR 1993 SCC 417) म्हणजेच मंडळ आयोग प्रकरणी दिलेल्या निर्देशानुसार भारत सरकारने सन १९९३ मध्ये राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची एक वैधानिक संस्था म्हणून स्थापना केली. भारत सरकारने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या मागासवर्गीयांच्या विविध गटांच्या कल्याणासाठी सदर आयोग काम करेल. आयोग कल्याणाच्या कामावर देखरेख ठेवेल व मागासवर्गीय समूहाच्या लोकांच्या कल्याणाला प्रवर्तित करण्यासाठीच्या धोरणात्मक पैलूंबाबत शासनाला सल्ला देईल. आयोगाला कळविण्यात आलेल्या कोणत्याही बाबीची चौकशी करण्याचा आयोगाला अधिकार आहे व तशी चौकशी करताना आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार बहाल करण्यात आले आहेत. आयोगाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. बहुतेक सर्व राज्यांनी राष्ट्रीय आयोगाच्या धर्तीवर राज्य पातळीवरील आयोग स्थापन केले आहेत.

## १३. अंतरराष्ट्रीय यंत्रणेचे सर्वेक्षण

मानवाधिकार हा आंतरराष्ट्रीय कायद्यातील विशेष विभाग आहे. सुरवातीला आंतरराष्ट्रीय न्यायालय किंवा आयोग अस्तित्वात नव्हते. राष्ट्रे सार्वभौम असल्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार त्यांनाच विविध न्यायालये किंवा आयोगाकडे जाता येत होते. मात्र संयुक्त राष्ट्रांकडून मानवाधिकारांना मिळालेली मान्यता, जागतिक मानवाधिकार सनदेचा स्वीकार व मानवाधिकारांच्या विविध पैलूंवर असलेले अनेक आंतरराष्ट्रीय करार व सहमतीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यक्तींसाठी एखादी यंत्रणा असणे निकडीचे झाले. त्यानुसार सत्तरच्या दशकामध्ये राष्ट्रांनी खालील निर्देशित कळीच्या करारान्वये व्यक्तींच्या तक्रारी प्राप्त करण्यासाठी आंतरराष्ट्रीय तक्रार यंत्रणा स्थापन केली .



(कंसातील नावे करारानुसार तक्रार करण्याच्या विभागाचे नाव ध्वनित करते) विनिर्दिष्ट यंत्रणांच्या व्यतिरिक्त व्यक्तींना संयुक्त राष्ट्राच्या अन्य न्यायिक, अर्धन्यायिक किंवा उच्चस्तरीय विभागांकडे पोहोचता येणार नाही.

- नागरी व राजकीय अधिकारांचा आंतरराष्ट्रीय करार (मानवाधिकार समिती)
- आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांचा आंतरराष्ट्रीय करार (आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार समिती)
- छळवणूक व अन्य क्रूर, अमानवी किंवा मानहानीकारक वर्तणूक किंवा शिक्षा (छळवणूक समिती)
- सर्व प्रकारच्या वांशिक भेदभावाचे निर्मुलन करण्याचा अंतरराष्ट्रीय करार (वांशिक भेदभाव निर्मुलन समिती)
- महिलांविरुद्धच्या सर्व भेद्भावांचे निर्मुलन करण्याचा करार (महिलांविरुद्धचे सर्व भेदभाव निर्मुलन समिती)
- भिन्नपणे सक्षम व्यक्तींच्या अधिकारांबाबतचा करार (भिन्नपणे सक्षम व्यक्तींच्या अधिकारांबाबतची समिती)
- जबरदस्तीच्या नाहीसे होण्यापासून सर्व व्यक्तींचे रक्षण करणारा आंतरराष्ट्रीय करार (जबरदस्तीच्या नाहीसे होण्याबाबतची समिती)
- सर्व स्थलांतरित कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय करार (स्थलांतरित कामगारांबाबतची समिती)
- बालअधिकार व त्याचे ऐच्छिक शिष्टाचाराबाबतचा करार (बालअधिकार समिती)

वरील सर्व कळीच्या करारान्वये सर्व राष्ट्रांनी कराराच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी समिती स्थापन करण्यास व राष्ट्र अशा करारामध्ये पक्षकार असल्यास व्यक्तींकडून तक्रारी स्वीकारण्यास व कराराचे किंवा अतिरिक्त शिष्टाचारांना मंजुरी देऊन समितीच्या अखत्यारीत सादर होण्यास मान्यता दिली आहे. (सदर यादी खूप मोठी अस्यामुळे संयुक्त राष्ट्रांचे निर्वासितांसाठीचे उच्चायुक्त कार्यालय किंवा संयुक्त राष्ट्रांच्या अन्य कोणत्याही संकेतस्थळावर मिळू शकेल) वरीलपैकी स्थलांतरित कामगार व बालअधिकारवरील समितीची अद्याप नियुक्ती झालेली नाही. उपरोक्त कळीच्या सामित्यांशिवाय व्यक्तींनी संयुक्त राष्ट्रांकडे तक्रारी करण्यासाठी अनेकविध मार्ग आहेत. मानवधिकार परिषद, त्यांचे विविध प्रतिनिधी, कार्यगट, महिलांच्या

स्थितीबाबतचा आयोग व संयुक्त राष्ट्रांच्या अन्य संस्थांकडे तक्रार करता येईल. उपरोल्लेखित करारानुसार सदर विविध संस्थांकडे तक्रार करण्यासाठी वेगवेगळी प्रक्रिया असून त्यायोगे व्यक्तींना अर्धन्यायिक यंत्रणे कडून थोडाफार दिलासा मिळू शकतो.

मानवाधिकारांचे उल्लंघन होत असल्यास उपरोक्त करारांच्या समित्यांकडे तक्रार करण्यासाठी तीन मार्ग उपलब्ध आहेत.

## १. वैयक्तिक पत्रव्यवहार

मानवाधिकारांचे उल्लंघन होत असल्यास वरील करारांच्या अंतर्गत विनिर्दिष्ट समित्यांच्याकडे खालील अटींच्या अधीन राहून व्यक्ती राष्ट्राविरुद्ध तक्रार दाखल करू शकते.

त्या राष्ट्राने कराराच्या प्रक्रियेनुसार तो मान्य व मंजूर केलेला सदस्य असला पाहिजे. जर दिलेली मान्यता एखाद्या तरतुदीबाबत सशर्त असल्यास सदर तरतुदीविरुद्ध तक्रार करता येणार नाही.

एखाद्या करारामध्ये किंवा राजशिष्टाचारामध्ये एखादे राष्ट्र जरी पक्षकार असले तरीही व्यक्तिगत तक्रारींची तपासणी करण्यासाठी समिती सक्षम असल्याबाबत त्या राष्ट्राने मान्य केलेली असली पाहिजे.

पिडीत व्यक्तीची लेखी पूर्वसंमती घेऊन त्याच्या वतीने त्रयस्थ पक्षकार किंवा व्यक्ती किंवा कोणतीही व्यक्ती सुद्धा समितीकडे तक्रार करू शकते. मात्र ज्या पिडीत व्यक्तीला स्थानबद्ध असल्यामुळे किंवा जबरदस्तीने नाहीसे केले असल्यामुळे त्याच्यापर्यंत बाह्य व्यक्तीला पोहोचता येत नाही अशा व्यक्तींच्या बाबतीत पिडीत व्यक्तीची संमती न घेता सदर संमती न घेता येण्याची कारणे विषद करून तक्रार दाखल करता येईल. तक्रार विहित नमुन्यात असणे आवश्यक नाही. मात्र मानवाधिकार उच्च्युक्तांच्या कार्यालयाने तक्रार करण्यासाठीचा विहित नमुना तयार केला असून तो त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून डाऊनलोड करता येतो. तक्रार ही संयुक्त राष्ट्रांच्या सहा अधिकृत भाषा म्हणजे अरेबिक, चीनी, इंग्लिश, फ्रेंच, रशियन किंवा स्पॅनिश मध्ये असणे आवश्यक आहे. तक्रार जर अन्य कोणत्या भाषेत असेल तर संयुक्त राष्ट्रांच्या अधिकृत भाषेमधील भाषांतर तक्रारीबाबत जोडलेले असणे आवश्यक आहे.

ज्या करारान्वये तक्रार करावयाची आहे, त्यामधील तरतुदीनुसार सर्व माहिती घटनाक्रमानुसार संबंधित तपशिलासहित सादर करणे आवश्यक आहे. देशामध्ये उपलब्ध कायदेशीर व अन्य उपाययोजना पूर्णपणे संपुष्टात आल्याबाबतचा संपूर्ण तपशील तक्रारीमध्ये असणे आवश्यक आहे. समितीकडे तक्रार करण्यापूर्वी पिडीत व्यक्तीने त्याच्या देशात उपलब्ध असलेले

सर्व कायदेशीर उपाय वापरून संपुष्टात आणणे आवश्यक आहे. सर्व संबंधित दस्तऐवज विशेषतः न्यायिक व प्रशासकीय निर्णयांच्या प्रती ताक्रारीसोबत जोडणे आवश्यक आहे. पक्षकाराने वरील दस्तऐवज सादर न केल्यास माहिती किंवा अतिरिक्त माहिती देण्यासाठी किंवा त्यांचे समाधान न झाल्यास तपशील पुन्हा सादर करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्तांच्या कार्यालयातील सचिवालय तक्रारकर्त्याशी संपर्क साधू शकतात. एकदा समितीने तक्रार स्वीकारल्यानंतर ती संबंधित राष्ट्राकडे त्यांच्या उत्तरासाठी पाठविण्यात येईल. राष्ट्राकडून उत्तर प्राप्त झाल्यावर समिती त्याबाबत अंतिम निर्णय घेईल व तो तक्रारदार व संबंधित राष्ट्राला कळविण्यात येईल. कराराचे उल्लंघन झाले असल्याचा निष्कर्ष समितीने काढल्यास संबंधित राष्ट्राला १८० दिवसात तपशील सादर करण्यास सांगितले जाईल. समितीच्या शिफारशीवर राष्ट्राचा प्रतिसाद व कार्यवाही करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती सादर करण्यास संबंधित राष्ट्राला सांगण्यात येते. अंतिम निर्णयामध्ये विहित उपाययोजना राष्ट्राने अंगीकारणे अपेक्षित असले तरी ते न केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद नाही. समितीचे सर्व अंतिम निर्णय सार्वजनिकरित्या उद्घोषित केले जातात.

### (ब) आंतर– राष्ट्रीय तक्रारी

एखाद्या विशिष्ट करारातील तरतुदींचे उल्लंघन केल्याबाबत एखादे राष्ट्र त्या करारात पक्षकार असलेल्या दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध कुठल्याही समितीकडे तक्रार करू शकते. राष्ट्रांनी अवलंबायची प्रक्रीया प्रत्येक करारात निर्देशित करण्यात आली आहे. मात्र कोणत्याही राष्ट्राने सदर प्रक्रिया अद्याप अवलंबलेली नाही.

### (क) चौकशी

कोणत्याही समितीकडे आरोपित उल्लंघन झाल्याबाबत एळाद्या राष्ट्राविरुध्द तक्रार आल्यास अशी समिती चौकशी सुरु करू शकेल. एखाद्या कराराला किंवा तहनाम्याला अनुसरून एखाद्या देशाने समितीच्या अधिकारक्षेत्राला मान्यता दिली असल्याची विचारपूस करण्यात येतील. सर्वसामान्यपणे खालीलप्रमाणेच्या दृष्टीकोनातून चौकशी प्रक्रिया अनुसरली जाते.

१. ज्या कराराचे संनियंत्रण करतात त्या करारातील अधिकारांचे एखाद्या राष्ट्राकडून पद्धतशीर उल्लंघन होत असल्याची खात्रीलायक माहिती समितीला प्राप्त झाल्यास प्रक्रिया सुरु करण्यात यावी.

२. आपली निरीक्षणे सादर करून राष्ट्राने तपासणीमध्ये सहकार्य करण्यासाठी समिती त्या राष्ट्राला बोलाविते.

३. राष्ट्राच्या निरीक्षणावर व अन्य संबंधित माहितीवर आधारून चौकशी करण्यासाठी समिती एक किंवा अधिक सदस्यांना नियुक्त करू शकते व तातडीने अहवाल सादर करण्यास सांगू शकते. आवश्यक वाटल्यास राष्ट्राच्या संमतीने चौकशी दरम्यान त्या प्रदेशाला भेट सुद्धा दिली जाऊ शकते.

४. सदस्यांच्या निष्कर्षांची तपासणी करून समिती ते शेरे व शिफारशीसहित संबंधित राष्ट्राकडे अग्रेषित करण्यात येते.

५. समितीच्या निष्कर्ष, शेरे व शिफारशींवर संबंधित राष्ट्राने विहित कालावधीमध्ये (सामान्यपणे सहा महिने) निरीक्षणे सादर करण्यासाठी विनंती केली जाते व जिथे आवश्यक असेल तिथे शिफारशींवर केलेल्या उपाययोजनांची माहिती देण्यास सांगितले जाते.

६. चौकशी प्रक्रिया गोपनीय असते व कामकाजाच्या प्रत्येक टप्प्यावर संबंधित राष्ट्राचे सहकार्य मागितले जाते. वरील सर्वसामान्य प्रक्रियेशिवाय विविध करारामधील सर्व पक्षकार राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रांच्या संबंधित संस्थांनी गठीत केलेल्या विविध किंवा विशेष समित्यांना वार्षिक अहवाल सादर करण्याचे मान्य केले त्याची तपासणी केल्यावर समितीचे समाधान झाल्यास राष्ट्रांनी मानवाधिकारांच्या साध्य केलेल्या अंमलबजावणीबाबतची निरीक्षणे किंवा शिफारशी पाठविल्या जातात. समितीचे समाधान न झाल्यास समिती राष्ट्राला ताजे पुरावे किंवा अहवाल सादर करण्यास सांगू शकते. राष्ट्रांच्या व्यतिरिक्त व्यक्ती व बिगर शासकीय संस्था सुद्धा राष्ट्रे पक्षकार असलेल्या मानवाधिकार करारांच्या पद्धतशीर उल्लंघनाबाबत किंवा अंमलबजावणीच्या कोणत्याही पैलूबाबत स्वतंत्र अहवाल सादर करू शकतात. राष्ट्रांकडून अहवाल प्राप्त करण्याच्या सदर पद्धतीमुळे संयुक्त राष्ट्र व त्यांच्या विविध संस्थांना शिफारशीद्वारे किंवा विविध प्रदेशांमध्ये मानवाधिकारांच्या प्रवर्तन व अंमलबजावणीसाठी अतिरिक्त उपाययोजना करण्याची महासभेला विनंती करणे शक्य होते.

## १४ . सारांश

थोडक्यात केलेल्या वरील चर्चेवरून हे स्पष्ट होते की उल्लंघनाच्या दुरुस्तीसाठीच्या उपाययोजनांशिवाय कोणत्याही अधिकारांच्या उद्घोषणेचा काहीही उपयोग नाही. विविध आंतरराष्ट्रीय संस्थांकडे तक्रार करण्याचा व्यक्तींचा अधिकार आंतरराष्ट्रीय समुदायाने मान्य केला असला तरीसुद्धा राष्ट्रांनी मंजुरी न दिल्यामुळे व पूर्ततेसाठी कोणतीही काटेकोर यंत्रणा नसल्यामुळे त्या दात नसलेल्या अवस्थेत आहेत. राष्ट्रांनी स्वतःच्या साध्यतांची ग्वाही देण्याची गरज असून मानवाधिकारांच्या वर्धनासाठी त्यांनी गांभीर्याने अंगिकारलेल्या राष्ट्रीय यंत्रणेप्रमाणे आंतरराष्ट्रीय यंत्रणा सशक्त करण्यासाठी सुद्धा उपाययोजना केल्या पाहिजेत.

## नमुना प्रश्न

**१. सर्वोच्च न्यायालय हे देशाचे शीर्षस्थ न्यायालय असल्यामुळे पुढील पैकी कोणत्या ठिकाणी स्थित आहे ?**

अ. गुजरात

आ. नवी दिल्ली (आ)

इ. महाराष्ट्र

ई. केरळ

**२. कलम .............. नुसार बाधित लोकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी उच्च न्यायालयांना विविध रिट (प्राधिलेख) जारी करण्याचा अधिकार आहे.**

अ. कलाम २२६

आ. कलम ३२ (अ)

इ. कलम १४३

ई. कलम १२६

**३. राज्यांमध्ये ..................................सर्वोच्च न्यायिक प्राधिकरणे आहेत.**

अ. उच्च न्यायालये

आ. जिल्हा न्यायालये (अ)

इ. अ व ब दोन्ही

ई. वरील पैकी कोणतेच नाही

**४. राष्ट्रीय बालअधिकार संरक्षण आयोगाची स्थापना ............ ह्या वर्षी करण्यात आली.**

अ. २००१

आ. २००२ (इ)

इ. २००५

ई. २००७

**५. महाराष्ट्र राज्याने राज्य अल्पसंख्यांक आयोग अधिनियम ............... मध्ये अमलात आणून ................. मध्ये आयोगाची स्थापना केली.**

अ. २००४ व २००५.

आ. २००२ व २००३ (अ)

इ. २०११ व २०१२

ई. २००० व २००५६

## घटक ३

## मानवाधिकार व भारतीय राज्यसंस्थेतील अडथळे

सदर एककामध्ये मानवाधिकारांच्या वर्धन व अंमलबजावणीत अडथळे आणणाऱ्या विविध घटकांची थोडक्यात ओळख करून देण्यात आली आहे. कायदेशीर दृष्टीकोनातून ते सर्व बाबतीत समान असले तरीही आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिप्रेक्ष्यामध्ये आपल्या अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी लोकांच्या विशिष्ट गटांसमोर किंवा घटकांसमोर असलेल्या अडथळ्यांची सदर प्रकरणात थोडक्यात ओळख करून देण्यात येईल. तसेच भारतीय संदर्भात सुशासनाच्या संकल्पनेचे महत्व व मानवाधिकारांच्या अंमलबजावणीत त्याच्या योगदानाचे महत्व ह्याबाबत सुद्धा सदर प्रकरणात माहिती दिली आहे.

### १) समाजातील असमानता व मानवाधिकार



मानवाधिकार कोणत्याही आधारावरील भेदभावाशिवाय लागू होतात. मात्र समाजातील असमानता अनेक लोकांना मानवाधिकारांचा उपभोग घेण्यापासून वंचित करते. सामाजिक असमानतेमुळे असमान संधी, पुरस्कार, सामाजिक स्थान, व संसाधने व संधींचे समाजातील लोक किंवा गटांमध्ये असमान वाटप होते. असमानतेमुळे समाजामध्ये विशेषाधिकार असलेले व नसलेले संवर्ग तयार होतात. त्यामुळे कायद्याने हमी दिलेल्या अधिकारांच्या समान उपभोगामध्ये अडथळे निर्माण करतात. अधिकारांची समान पातळीवर अंमलबजावणी न झाल्यामुळे सामाजिकदृष्ट्या पुढारलेले गट विविध मार्गांनी व साधनांनी वंचित गटांच्या अधिकारांच्या जोरावर संपन्न होतात किंवा इतरांच्या संधी हिरावून घेतात. सामाजिकदृष्ट्या पुढारलेल्या गटांच्या अयोग्य संपन्नतेने पुष्कळवेळा वस्तुनिष्ठ मांडणी स्थिती, वैचारिक पाठबळ व सामाजिक सुधारणा अशा तीन मितींमध्ये समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून समस्या निर्माण करून सामाजिकदृष्ट्या वंचित गटांचे शोषण करण्याचा प्रयत्न करतात.

वस्तुनिष्ठ मांडणी स्थितीमुळे शिक्षण, गरिबी, निरक्षरता, आरोग्य व अन्य सामाजिक स्थित्या बाबत समाजातील असमानतेचे मोजमाप करण्यात मदत होते. वैचारिक दृष्टीकोनामुळे समाजातील कायदे, सार्वजनिक नीतीमुल्ये, व सांस्कृतिक तफावतीतील फरक ह्यांची तपासणी करण्यास पाठबळ मिळते. असमानतेमुळे सामाजिक सुधारणांना गटांकडून विरोध होतो व वंचित

गटांकडून मानवाधिकारांच्या अमलबजावणीसाठी सामाजिक चळवळी होतात.

मानवी अधिकारांच्या परिपूर्तीसाठीच्या संघर्षामध्ये पुढारलेल्या व वंचित गटांकडून परस्परविरोधी स्थिती निर्माण होते व त्यामुळे दोन्ही घटकांच्या अधिकारांचे उल्लंघन होते. मात्र पुढारलेल्या घटकांपेक्षा वंचित घटकांना ह्याचे जास्त सामाजिक परिणाम भोगावे लागतात. आंतरराष्ट्रीय मानवाधिकारांच्या कायद्याच्या भाषेत सदर उल्लंघने ही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय हमी असलेल्या मानवाधिकारांचेच उल्लंघन असते. मानवाधिकारांच्या प्रवर्तनासाठी व त्यांच्या उपभोगत अडथळा आणणाऱ्या बाबींची काळजी घेण्यासाठी न्यायव्यवस्थेत व विशेषतः संक्रमणकालीन न्यायाव्यवस्था मजबूत करणे हे राष्ट्रांचे कर्तव्य आहे. मानवाधिकारांच्या परिपूर्तीसाठी अडथळे ठरणाऱ्या विविध पैलूंपैकी काही पैलूंची चर्चा खाली केली आहे.

## अ) लोकसंख्या



लोकसंख्या आणि मानवाधिकार हे स्वतंत्र विषय आहेत. मात्र दुसरे महायुद्ध व निर्वसाहतीकरणानंतर निर्देशित सीमांमध्ये राजकीय वर्चस्व व अनेक सार्वभौम राष्ट्रांच्या उद्भवामुळे त्यांचा एकमेकांशी जवळून संबंध आहे. जनसंख्याशास्त्रातील कल व राष्ट्रांनी वेळोवेळी विकसित केलेल्या लोकसंख्या विषयक नीतीमुळे मानवाधिकारांच्या परिणामकारक अंमलबजावणीबाबत आव्हाने निर्माण झाली आहेत. अनेक राष्ट्रांनी पन्नास आणि साठच्या दशकात लोकसंख्या विषयक धोरण स्वीकारेपर्यंत मानवधिकार व लोकसंख्या यामधील आंतरिक संबंध ज्ञात झाले नव्हते. सुरवातीला नागरी व राजकीय अधिकारांपेक्षा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांवरच लोकसंख्येचा अधिक भर होता. राष्ट्र राज्यांनी अंगिकारलेल्या लोकसंख्या विषयक धोरणांमुळे जननाधिकार, जगण्याचा पर्याप्त दर्जा, कामाचा, आरोग्याचा, सामाजिक सुरक्षिततेच, पाण्याचा, सुरक्षित व सभ्य वातावरणाचा, शिक्षणाचा, स्त्रोतांचा व अन्य सांस्कृतिक दृष्टीकोन ठेवण्याचा अधिकार ह्यावर थेट परिणाम होऊ लागला. मात्र गरिबी, सौदेबाजी करण्याच्या क्षमतेचा अभाव, व बहुसंख्य लोकसंख्येचा राष्ट्राच्या धोरणाबाबत दृष्टिकोनाचा अभाव ह्यामुळे लोकसंख्येतील वाढीचा नागरी व राजकीय अधिकारांवर थेट परिणाम दिसून येतो.



विविध मानवाधिकारांपैकी जननाधिकाराच्या निवडीचे थेट लक्ष्य हा लोकसंख्येवर थेट परिणाम करत असतो. लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक देशांनी सक्तीच्या कुटुंब नियोजन पद्धतींचा अवलंब केल्याने त्याचा महिलांचे व कुटुंबाचे अधिकार व विशेषत्वाने गरीब व निराधारांच्या अधिकारात अडथळे निर्माण झाले. एका अर्थाने अशी धोरणे एका देशातून दुसऱ्या देशात बेकायदेशीर स्थलांतर होण्यास कारणीभूत ठरतात व त्यामुळे जीवन व स्वातंत्र्य, आश्रय मागणे, उच्चार व अभियव्यक्ती, व एकांताच्या अधिकारापासून वंचित होतात.

संयुक्त राष्ट्रांनी आपल्या २०१२ च्या लोकसंख्या अहवालामध्ये लोकसंख्या नियंत्रणाचे महत्व विषद करून लोकांना कुटुंब नियोजनाचे महत्व पटण्यास मदत होईल व महिलांना त्यांचे जननाधिकार मुक्तपणे निवडता येतील व अन्य मानवाधिकारांच्या परीपुर्तीचे फायदे समजतील अशी धोरणे स्वीकारण्याची राष्ट्रांना विनंती केली आहे. त्यानुसार कुटुंब नियोजनाचे प्रवर्तन व मानवाधिकारांचे फायदे मिळण्यासाठी राष्ट्रांना खालील उपाययोजना करण्याची विनंती करण्यात आली आहे –

ज्यांना जेव्हा पाहिजे आहे त्यांना अधिकारावर आधारित कुटुंब नियोजन उपलब्ध असले पाहिजे व त्यांना आर्थिक पाठबळ व राजकीय बांधिलकीत मूलतः बदल करून उत्तम गुणवत्तेच्या सेवा व पुरवठा उपलब्ध असण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

- ज्याच्या उपयोगामुळे अन्य अधिकारांची एक अखखी श्रेणी प्राप्त होणे शक्य होते अशा कुटुंब नियोजनाचा एक अधिकार म्हणून प्रवर्तन झाले पाहिजे,
- स्वेच्छापूर्वक कुटुंब नियोजनाचे व्यापक आर्थिक व सामाजिक विकासाशी एकत्रीकरण करणे कारण कुटुंब नियोजनामुळे दोन्हीमध्ये वृद्धी होते.
- स्वेच्छापूर्वक कुटुंब नियोजनातील आर्थिक, सामाजिक, तार्किक, व वित्तीय अडथळे दूर करावेत, जेणेकरून त्याची निवड करणाऱ्या प्रत्येकाला तो अधिकार निवडण्याचे स्वातंत्र्य असेल.
- कुटुंब नियोजन साधनांचा पुरवठा व सेवेची उपलब्धता, विश्वासार्हता, व गुणवत्ता वाढवून अनपेक्षित गर्भावस्था व गर्भापातांची संख्या घटवा.

- ज्यांना गरज आहे अशा पौंगडावास्थेतील व अविवाहित लोकांसहित सर्व स्तरातील लोकांना कुटुंब नियोजन कार्यक्रम उपलब्ध करून द्या.
- कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमांद्वारे उपलब्ध पुरवठ्याच्या श्रेणीत तातडीचे संतती नियमन समाविष्ट करा.
- महिला व मुलींच्या संतती नियमनाच्या अधिकाराला पाठबळ देण्यासाठी व पुरुष व मुलांना त्यांच्या फायद्यासाठी कुटुंब नियोजनात समाविष्ट करा.

एक अब्ज लोकसंख्या असलेला भारत हा लोकसंख्येने जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे मुलभूत अधिकार व राज्यकारभाराची मार्गदर्शक तत्वे ह्या मानवाधिकारांची परिपूर्ती होण्यात अनेक धोके दिसून येत आहेत. सदर गोष्टीचा जीवनाची गुणवत्ता, राज्यासंस्थेच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पैलूंमध्ये सक्रीय सहभागावर थेट परिणाम होत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारी, निरक्षरता, वाढता बालमृत्यू दर, बालकामगार, कमी वेतन, प्रदूषण, आरोग्य, सामजिक सुरक्षितता, पर्यावरणाच्या अधिकाराच्या दर्जात घट, संसाधनांवर कमालीचा ताण येत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे ७०% लोक घटनेने हमी दिलेल्या अधिकारांचा उपभोग घेऊ शकत नाहीत.

कुटुंब नियोजनाच्या पद्धतींच्या प्रवर्तनासाठी भारत सरकारने अब्जावधी डॉलर खर्च करून अनेक योजना आखल्या आहेत. चिकित्सक पद्धतीने १९५२ मध्ये प्रथम पंचवार्षिक योजनेत लोकसंख्या नियंत्रण योजणारा भारत हा प्रथम देश होता. साठ आणि सत्तरच्या दशकामध्ये वैद्यकीय निगराणी खाली गर्भपात करण्याच्या परवानगीसह अनेक योजना अवलंबिण्यात आल्या होत्या. एक कुटुंब एक मुल हा निकष स्वीकारण्यात आला होता. मात्र लोकतांत्रिक समाज असल्यामुळे चीन सारखी ह्याबाबतीत एकाधिकारशाही इथे करता आली नाही. शासनाच्या शिथिल धोरणामुळे लोकसंख्या वाढत गेली आणि २०३० पर्यत भारताची लोकसंख्या चीन पेक्षाही जास्त होईल असे भाकीत वर्तविण्यात आले आहे. असे झाल्यास, मानवाधिकारांची परिपूर्ती होण्यातील धोक्यांच्या प्रमाणात अनेकपटींनी वाढ होईल व लोकांना त्यांच्या किमान अधिकारांची परिपूर्ती सुद्धा करताना अवघड परिस्थिती उद्भवेल. गर्भधारणे बाबत समाजातील पूर्वापार अपसमजांचा मुकाबला करण्यासाठी, लोकांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी, महिलांचा कुटुंबातील दर्जा सुधारण्यासाठी व वाढत्या लोकसंख्येच्या दराबाबत लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी शासनाने मान्य होण्यासारखे आक्रमक लोकसंख्या नियंत्रण मोहीम सुरु करण्याची गरज आहे. लोकसंख्या दरावर नियंत्रण असल्यास भारताला मानव विकास निर्देशांकातील आपले स्थान १०० पेक्षा कमी आणून सुधारता येईल व भविष्यातील वैश्विकरण होणाऱ्या जगामध्ये एक आर्थिक महासत्ता म्हणून स्थान प्राप्त करू शकेल.

## ब) दारिद्र्य




कोणत्याही समाजात आर्थिक क्षमता आणि जीवनमानाशी गरिबी/दारिद्र्य निगडीत असते. मात्र मानवाधिकारांच्या भाषेत गरिबी एक बहुमितीय व्यापक संकल्पना आहे. संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमानुसार गरिबीला अनेक चेहरे असतात. कमी उत्पन्नापेक्षा ती खूप काही आहे. त्यामधून असमाधानकारक आरोग्य व शिक्षण, ज्ञान व संपर्कापासून वंचितता, मानवी व राजकीय अधिकारांची परिपूर्ती करण्यास अक्षम, व प्रतिष्ठा, आत्मविश्वास व स्वाभिमानाचा अभाव दिसून येतो. जिथे सन्मानाने जीवन जगणे व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याच्या विविध दस्तैवजांनी हमी दिलेल्या अधिकारांची परिपूर्ती करण्यात महत्वाची भूमिका निभावणाऱ्या मानवाधिकारांमध्ये गरिबीकडे व्यापक दृष्टीकोनातून पाहण्यास ही व्याख्या ध्वनित करते. मात्र जगभरात अमर्त्य सेन यांच्या क्षमता सिद्धांतावर आधारित तुलनेने संकुचित व्याख्या अस्तित्वात आहे. सदर व्याख्येनुसार भूक, रोग, निरक्षरता इत्यादी विशिष्ट मुलभूत स्वातंत्र्य व अधिकारांची परिपूर्ती होण्यासाठी गरिबी हे एक कारण आहे. सकारात्मक व नकारात्मक स्वातंत्र्ये समाविष्ट करण्यासाठी इथे स्वातंत्र्य व्यापक अर्थाने वापरले आहे. त्यामुळेच आरोग्यपूर्ण जीवन जगण्याच्या एखाद्या व्यक्तीच्या वैध प्रयत्नांना कोणीही अडथळे न करण्यावर त्याचे आरोग्यपूर्ण जीवन जगण्याचे स्वातंत्र्य अवलंबून आहे – हे नकारात्मक स्वातंत्र्य आहे, तर तो आरोग्य पूर्ण जीवन जगू शकेल अशी व्यवस्था समाजाने निर्माण करण्यावर प्राप्त करण्याच्या एखाद्या व्यक्तीचे आरोग्यपूर्ण जीवन जगण्याचे स्वातंत्र्य अवलंबून आहे – हे सकारात्मक स्वातंत्र्य आहे. गरिबीची पातळी ठरविण्यासाठी व्यक्तींच्या आर्थिक क्षमतेभोवती हा सिद्धांत केंद्रित आहे. मानवाधिकार हे गरिबीच्या व्याख्येचा हिस्सा नसले तरीही ते गरिबीची पातळी घटविण्यास सहाय्यभूत होतात व गरिबी घटविण्यासाठी आवश्यक असलेल्या लक्ष्य केंद्रित धोरणे निर्दीष्टीत करतात.

व्यक्ती व राष्ट्रराज्ये ह्या दोघांच्याही शाश्वत विकासासाठी गरिबीचा मुद्दा हाताळणे अत्यंत आवश्यक असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या विकास निधीने अनेक अहवालांमध्ये नमूद केले आहे. त्यानुसार सर्व स्तरांवर परिणामकारक अंमलबजावणीसाठी अनेक धोरणे सुचविण्यात आली असून ती खालील प्रमाणे आहेत –

## उत्तरदायित्त्व

गरिबीच्या पातळीचे निर्मुलन करण्यात व अधिकारांच्या सर्व भागधारकांना सक्षम करण्यात जबाबदारी महत्वाची भूमिका निभावते. विकासाच्या प्रक्रियेतील प्रत्येक भागीदाराने प्रत्येक स्तरावरील त्याच्या कृतीची जबाबदारी घेण्याची गरज आहे. मानवाधिकाराच्या वैश्विक जाहीरनाम्यातील कलम २९ मध्ये नमूद केल्यानुसार मानवाधिकारांची परिपूर्ती होण्यासाठी कर्तव्याची भूमिका महत्वाची आहे. प्रत्येक कर्तव्यधारकाने त्यांच्या व अन्यांच्या अधिकारांच्या परीपुर्तीमध्ये आपण कोणती भूमिका निभावू शकतो, हे ठरविले पाहिजे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायद्याची चौकट गरिबांना मानवाधिकाराने सक्षम करते व अन्यांवर कायदेशीर दायित्व टाकते. त्यानुसार राष्ट्रे, आंतरराष्ट्रीय संघटना, व बिगर शासकीय संघटनांना राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर गरिबी निर्मूलनाची यंत्रणा विकसित करण्यासाठी जबाबदारीची भूमिका निभावणे आवश्यक आहे.

## अभेदभाव व समानता

बरेचदा गरीब लोक विशेषतः आर्थिक दृष्ट्या कमकुवत वर्गांना अनेक आधारांवर भेदभाव केला जातो व त्यांना असमानतेची वागणूक मिळते. मानवाधिकारांची चौकट मुख्यतः अभेदभाव व समानता अशा जुळ्या संकल्पनांच्या भोवती फिरते. समावेशक धोरणे आखून गरिबांना सक्षम करून इतर समाजाच्या सोबत एकीकृत करणे ही प्रत्येक सहभाग्याची जबाबदारी आहे. भेदभावात्मक प्रथांचे निर्मुलन करून व त्यांना समानतेने सहभागीत्व देऊनच ही समावेशकता साधता येईल.

कोणत्याही समाजात गरिबांना वरून कायदेशीर विनियम स्वीकारण्याऐवजी त्यांचा आवाज ऐकला जायला व त्यानुसार धोरणे आखून त्यांच्या गरजा पूर्ण व्हायला हव्या असतात. कोणत्याही समाजात सदर बाबी पूर्ण करण्यासाठी नियमित व मुक्त वातावरणातील निवडणुका व निर्णय प्रक्रियेत गरिबांच्या गरजांना सामावून घेण्यातूनच हे सहभागीत्व साध्य होईल. गरिबांच्या चिंतांचे निराकरण करण्यासाठी सहभागीत्वाचा अधिकार हा मानवाधिकारांचा मध्यवर्ती पैलू आहे. त्यामुळे जीवन स्वतंत्रपणे व प्रतिष्ठेने जगता येण्यासाठी त्यांच्या मानवाधिकारांची परिपूर्ती करण्याच्या व प्रशासनात सहभागीत्व देण्याच्या दृष्टीने गरिबांना समान संधी देण्याची प्रत्येक राष्ट्राची जबाबदारी आहे.

जगभरातील गरीबांपैकी एक तृतीयांश गरिब भारतामध्ये राहतात. भारताच्या नियोजन आयोगाच्या अहवालानुसार गरिबीचा दर हा २०१० मधील ३७.२% वरून २०११-१२ मध्ये २१.९% पर्यंत खाली आला आहे. मात्र जागतिक बँकेच्या २०१३ मधील अहवालानुसार, देशातील अनेक लोक आंतरराष्ट्रीय प्रमाणित जीवनमानाच्या पेक्षा कमी दर्जाचे जीवन जगत आहेत

म्हणजेच अपुऱ्या रोजच्या उत्पन्नावर गुजराण करीत आहेत. स्वातंत्र्य मिळताना ५०% असलेली गरिबीची पातळी घटविण्यात भारत सरकारला लक्षणीय यश प्राप्त झालेले आहे. गरिबीचा मुकाबला करण्यासाठी व आम जनतेला प्रतिष्ठेने जीवन जगता येण्यासाठी भारत सरकार व राज्य सरकारे अनेक उपाययोजना करत आहेत. गरिबीमुळे पुष्कळवेळा लोकांना त्यांच्या गरजा पूर्ण करता येत नाहीत आणि त्यामुळे प्रशासनाच्या विविध पैलुंमधील त्यांच्या सहभागीत्वावर विपरीत परिणाम होतो. निवारा, अन्न, कपडे, आरोग्य, शिक्षण आणि सहभागीत्व यासारख्या मुलभूत अधिकारांचा उपभोग घेण्यापासून त्यांना वंचित करणाऱ्या सदर गरिबीत जगणाऱ्या लोकांच्या चिंतांचे निराकरण करण्यासाठी जागतिक बँक व अन्य अभिकरणानी अनेक उपाय सुचविले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या सहस्त्रकातील विकास उद्दिष्टे ह्या सन २०१३ मधील अहवालामध्ये भारत सरकारने ऐंशी आणि नव्वदच्या दशकाच्या तुलनेने गरिबीची पातळी घटविण्यासाठी योजलेल्या उपाययोजनांची प्रशंसा केली असून भारत सन २०१५ पर्यंत गरिबी निर्मूलनाचे उद्दिष्ट पूर्ण करेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. शासनाने जरी गरिबी निर्मुलन केले, तरी राज्यघटनेच्या कलम ३८ नुसार प्रशासनात क्षमतेने सहभागी होण्यासाठीचे मार्ग व साधने विकसित करून गरिबांचे सक्षमीकरण करण्याची जबाबदारी शासनाच्या खांद्यावर आहेच. त्याचवेळेस जात, लिंग, व कायद्याने हमी दिलेल्या अधिकारांची परिपूर्ती करण्याच्या गरिबांच्या क्षमतेला धोका उत्पन्न करणाऱ्या अन्य सांस्कृतिक प्रथांच्या आधारावर लोकांच्या एका घटकाला वेगळी वागणूक देण्याचे निर्मुलन करण्यासठी समावेशन नीती विकसित करणे आवश्यक आहे. शासनासोबतच भेदभाव निर्माण करणाऱ्या प्रथा त्यागण्यासाठी शासनाच्या धोरणांच्या अमलबजावणी मध्ये परिणामकारकपणे सहभागी होऊन गरिबांच्या अधिकारांचे वर्धन करण्यासाठी देशातील व समाजातील विकसित गटांनी शासनाशी सहकार्य करणे आवश्यक आहे.

## क) जात




जात म्हणजे समानता व अभेदभाव ह्या मानवाधिकारांच्या तत्वांना दिलेला नकार आहे. हजारो करोडो लोकांच्या दयनीय स्थितीचे पुरातन प्रथा म्हणून समर्थन करता येणार नाही किंवा कौटुंबिक व्यवसाय म्हणूनही तो ग्राह्य धरता येणार नाही. जात ही लज्जास्पद संकल्पना निर्मुलन करण्याची वेळ आली आहे. गुलामी आणि वर्णभेद ह्या अन्य ओलांडता न येणाऱ्या भिंती आम्ही जमीनदोस्त केल्या आहेत. जातीच्या ह्या भिंती आम्ही जमीनदोस्त करू शकतो आणि त्या आम्ही तशा केल्याच पाहिजेत.– नवी पिल्लई, संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार उच्चायुक्त

जात हे दक्षिण आशियात आढळून येणारे सामाजिक स्तरीकरण आहे. बांगलादेश, भारत, जपान, नेपाल, पाकिस्तान, सेनेगल, श्रीलंका व येमेन हे अशिया व आफ्रिकेतील व दायास्पोरा (पूर्वी एकाच ठिकाणी केंद्रित असलेले लोक, भाषा किंवा संस्कृतीचे अनेक ठिकाणी विभागले जाणे) जातीयवादाने ग्रस्त असे देश आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या तज्ञांच्या नुसार जगातील २६० दशलक्ष (२६ कोटी) लोक जातीव्यवस्थेवर आधारित भेदभावाच्या चालीरीतींने पिडीत आहेत. जातीवर आधारित प्रथांमध्ये व्यापक पैलूंवर व्यक्ती, समूह, समाजातील मानवाधिकारांच्या उल्लंघनावर गहन प्रभाव आहे. जातीवर आधारित भेदभावाबाबत आंतरराष्ट्रीय सल्लामसलतीच्या २०१२ मधील अहवालानुसार जातीवर आधारित प्रथांचा खालील पैलूंवर प्रभाव पडतो –

- महिलांच्या विरुद्ध पद्धतशीर हिंसाचार कमालीची गरिबी
- मानहानीकारक अस्पृश्यतेच्या प्रथा (वरिष्ठ जातींसाठी असणाऱ्या पाणवठ्यातून पिण्याचे पाणी नाकारणे, सार्वजनिक व धार्मिक स्थळांमध्ये प्रवेश नाकारणे)
- पिढ्यानुपिढ्या बेठबिगारी व बालकामगार
- बेरोजगारी किंवा धोकादायक/मानहानीकारक रोजगार (उदाहरणार्थ हाताने मैला उचलणे
- रोजगारावर निर्बंध किंवा सक्तीचे व्यवसाय (उदाहरणार्थ वेश्या व्यवसाय)
- न्याय नाकारला जाणे व पोलीस व न्यायव्यवस्थेकडून व पोलिसांकडून भेदभाव
- साधनसंपत्ती वापरण्याची संधी, त्यावर नियंत्रण किंवा त्यापासुनचे लाभ यांचा अभाव – जमीन व मिळकतीच्या मालकी हक्कावर बंदी
- घरे, शाळा, दफन / दहन करण्याच्या ठिकाणी विलगीकरण
- आंतरजातीय विवाहावर प्रत्यक्ष्यात बंदी
- शाळांमध्ये दलित मुलांच्या विरुद्ध भेदभाव किंवा गैरवर्तन – गरिबी व भेदभावामुळे शाळेतून गळतीचे प्रचंड प्रमाण
- प्रत्येक स्तरावर राजकीय सत्ता किंवा यथार्थ / स्वतंत्र राजीकीय प्रतिनिधित्वाचा अभाव
- आपत्ती किंवा संघर्षाला मानवी प्रतिसादामध्ये जातीय भेदभाव
- आरोग्य सुविधा वापरण्याची संधी नसणे किंवा भेदभाव – संबंधित उच्च माता मृत्यू दर.

संयुक्त राष्ट्रे अशा भेदभावाला वांशिक भेदभावाच्या समकक्ष समजतात. संयुक्त राष्ट्रांचे नियमित आढावा अहवाल, व मानवधिकार परिषदेच्या विशेष प्रक्रियेवर आधारित निरीक्षणांच्या आधारे जातीवर आधारित भेदभावाचा समावेश वांशिक भेद्भावामध्ये करून अधिकारांच्या उल्लंघनावर देखरेख ठेवण्यासाठी सदस्य राष्ट्रांना सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली. मात्र भारतासहित अनेक राष्ट्रांनी सदर विषय वांशिक भेद्भावाशी जोडण्यास विरोध केला व त्यांच्या त्यांच्या राष्ट्रीय पातळीवर तो विषय हाताळण्याचे आश्वासन संयुक्त राष्ट्रांना दिले.

जातीवर आधारित भेदभावाच्या प्रथा हाताळण्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय संघटनांनी अनेक उपाययोजना अंगीकारल्या आहेत. नागरी समाजासाठी त्या परिणामकारक नीती आहेत – अशा अनिष्ट प्रथांचा कठोरपणे मुकाबला करण्यासाठी विनिर्दिष्ट संस्थांची स्थापना, संपर्क व माहिती व्यवस्थेचा परिणामकारक वापर करणे, शासनाच्या व नागरी समाजाच्या पाठबळाने समाजातील मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समावेशन धोरणे अंगीकारणे इत्यादी.

भारतामध्ये जातीव्यवस्थेमुळे लोकांच्या विविध घटकांना मानवाधिकारापासून वंचित करण्यात येते. भारताच्या राज्यघटनेने जातीवर आधारित भेदभाव निर्मुलीत केले आहेत. सामाजिक स्तरावर कोणताही भेदभाव न करता सर्वांना मुलभूत अधिकार बहाल करणाऱ्या लोकतांत्रिक राज्यघटनेचा पुरस्कार प्रस्तावानेमध्ये केला आहे. मात्र ह्या कट्टर प्रथांचा आधुनिक भारतात विशेषतः अर्धनागरी व ग्रामीण भागात अजूनही प्रभाव दिसून येतो. आंतरराष्ट्रीय समुदाय जातीवर आधारित भेदभावाच्या प्रथांचा विचार वांशिक भेदभाव निर्मुलन करण्याच्या १९६५ मधील आंतरराष्ट्रीय कराराच्या परिप्रेक्ष्यामध्ये करतो. भारत सदर कराराचे एक पक्षकार राष्ट्र आहे.

वांशिक भेदभाव निर्मुलन समितीच्या सर्वसामान्य शिफारशींमध्ये जात आणि जन्मावर आधारित भेदभावाचा निषेध करण्यात आला आहे. मात्र भारत सरकारने आपल्या अंतर्गत बाबींमध्ये संयुक्त राष्ट्रांचा हस्तक्षेप नाकारला असून जातीवर आधारित भेदभाव हा वंशाधारित असल्याचा दावा ठामपणे नाकारला आहे.

शासनाच्या मतानुसार जातीवर कायद्यानेच बंदी आणली असून राज्यघटनेने हमी दिलेल्या सवलती देण्यास्तव लोकांच्या विविध घटकांचे आर्थिक मागासलेपण निर्धारित करण्यासाठीच फक्त जातीचा विचार केला जातो. जातीवर आधारित भेदभावाच्या प्रथांना मूठमाती देण्यासाठी भारत सरकारने स्वातंत्र्यापासून अनेक कायदे व संस्थात्मक यंत्रणा कार्यान्वित केल्या आहेत. जातीवर आधारित एखादा अयोग्य प्रसंग हा गुन्हेगारी कायदा व शासनाने वेळोवेळी स्वीकारलेल्या कायद्यांतर्गत शिक्षा होण्यायोग्य आहे.

शासनाकडून एवढे सगळे प्रयत्न होऊन सुद्धा विविध घटकातील लोकांच्या पूर्वकल्पित समजांमुळे जातीवर आधारित प्रथा भारतात अजूनही सुरुच आहेत. लोकांचे प्रबोधन करण्यासाठी अंगीकारल्या जाणाऱ्या प्रचलित धोरणांच्या व्यतिरिक्त अशा प्रथा लोकांच्या एका घटकाचे अधिकार कशा नाकारतात व त्यामुळे देशाच्या विकासाला कशी खीळ बसते, ह्याबाबत सुद्धा शासनाने लोकांचे प्रबोधन केले पाहिजे.

## ड) कायदेशीर उपाय करण्यासाठी सुविधेंचा अभाव

कायदेशीर निवारण विशेषतः न्यायाशी संबंधित यंत्रणा दुर्गम असणे, हे मानवाधिकारांचे मुलभूत उल्लंघन आहे. मानवाधिकार किंवा नागरी अधिकारांच्या उल्लंघनाने पीडितांना देशात योग्य कायदेशीर, प्रशासकीय किंवा न्यायिक यंत्रणेच्या अभावामुळे कायदेशीर निवारण यंत्रणा वापरण्याची संधी मिळत नसेल. जिथे शासनाने कायदेशीर मार्ग उपलब्ध करून दिले असतील, तिथे समाजातील विपरीत आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनामुळे पिडीत व्यक्ती कायदेशीर निवारण यंत्रणेचा आधार घेण्यास असमर्थ ठरु शकते. मानवाधिकारांच्या उल्लंघनामुळे पीडितांना असा दुरुपयोग टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याने न्याय मिळणे हा मुलभूत मानवाधिकार असल्याचे मान्य केले आहे. भारतीय संदर्भात कायदेशीर निवारणाच्या दुर्गमतेच्या बाबीची परीक्षा करण्यापूर्वी मानवाधिकार असलेल्या न्याय मिळण्यातील सुगमता ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

न्याय सुलभतेने मिळणे हा मुलभूत मानवाधिकार आहे. मानवाधिकारांच्या उल्लंघनाशी संबंधित बाबी हाताळताना कोणत्याही प्रकारचा बेकायदेशीरपणा टाळण्यासाठी आपल्या कार्यपालिका, न्यायपालिका व विधिमंडळ व्यापक व स्वतंत्र असल्याचे अनेक देश सैद्धांतिकदृष्ट्या प्रतिपादन करीत असतात, पण प्रत्यक्षात मानवाधिकारांच्या उल्लंघनाच्या पिडीतांसाठी तो सत्याचा अपलाप असतो. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याच्या तत्वानुसार नागरी किंवा मानवाधिकाराशी संबंधित प्रत्येकाला परिणामकारक दृष्टीकोनातून न्याय मिळण्यासाठी राष्ट्रांनी उपाययोजना करणे आवश्यक आहे. परिणामकारक न्याय साध्य करण्यासाठी कोणत्याही भेद्भावाशिवाय न्याय दिला जाण्याची काळजी राष्ट्रांनी घेतली पाहिजे व मानवाधिकारांच्या उल्लंघनाने पिडीत लोकांच्या चिंता निवारण करण्यासाठी राज्यघटनेतच उपाययोजना करणारी यंत्रणा उभारण्याची, न्याय सुगम रीतीने मिळण्यासाठी राष्ट्रांनी अनेक उपाययोजना केल्या पाहिजेत.

मानवाधिकार पीडितांसाठी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याने विविध कायदेशीर साधनांच्या द्वारे अनेक परिणामकारक उपाययोजना केल्या आहेत. मानवाधिकारांचा उल्लंघन झाल्यास दाद मागण्यासाठी परिणामकारक उपाययोजना १९४८ च्या वैश्विक मानवाधिकार जाहीरनाम्याच्या कलम ८ नुसार विहित केल्या आहेत. १९६६ मधील नागरी व राजकीय




अधिकारांच्या आंतरराष्ट्रीय करारातील कलम २ (३) हे मानवाधिकारांच्या पीडितांना न्यायिक उपाय सुलभतेने प्राप्त होण्यासाठी न्यायिक, प्रशासकीय किंवा वैधानिक किंवा अन्य कायदेशीर यंत्रणेद्वारे परिणामकारक उपाययोजना असण्याच्या अधिकाराचे समर्थन करते. १९६५ मधील सर्व प्रकारच्या वांशिक भेद्भावांचे निर्मुलन करण्याबाबत आंतरराष्ट्रीय करारातील कलम ६, महिलांच्या विरुद्धचे सर्व प्रकारचे भेदभाव निर्मुलन करण्याबाबत आंतरराराष्ट्रीय करारातील कलम २ (क), १९८४ मधील छळवणूक व अन्य सर्व क्रूर किंवा अमानवी किंवा मानहानीकारक वागणूक किंवा शिक्षा विरोधी करारातील कलम १४ हे सुद्धा परिणामकारक उपाययोजनेची हमी देतात. राष्ट्रीय न्यायाधिकरणे व शासनाने स्थापित केलेल्या अन्य यंत्रणांकडून परिणामकारक उपाययोजना होण्याची मागणी करणे हा मानवाधिकारांच्या उल्लंघनाने पिडीत व्यक्तींचा स्थापित अधिकार आहे. तसेच दोषींना शिक्षा करणे व पीडितांना नुकसानभरपाई व आवश्यक तिथे पुनर्वसन करणे हे शासनाचे दायित्व आहे.

राज्यघटनेची प्रस्तावना व अन्य तरतुदींच्याद्वारे घटनाकारांनी सर्वांना सर्व बाबतीत सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी दिली आहे व लिंग, जात, धार्मिक, आर्थिक, सामाजिक, व सांस्कृतिक आधारावर कोणताही भेदभाव न करता आपल्या मुलभूत अधिकारांची परिपूर्ती करण्याची समान संधी बहाल केली आहे. मात्र अनेक कारणांमुळे न्याय सुलभतेने मिळणे दुरापास्त होते. त्यामधील प्रथमतः राज्यघटना, वैधानिक, कार्यपालिका व न्यायिक घोषणांच्या मागील तत्वांचे पालन करण्यातील विचलन. दुसरे म्हणजे गरिबी, भेदभावात्मक सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक प्रथा, राज्यव्यवस्थेतील बहुतांशी लोकांना अधिकारांची मुक्तपणे परिपूर्ती करण्याच्या बाबतीतील घोर अज्ञान. तिसरे म्हणजे जर पिडीत हे गरीब किंवा समाजातील दुर्लक्षित घटकांमधून असतील किंवा राजकीय व सामाजिकदृष्ट्या सधन लोकांच्या विरोधात असतील तर पुष्कळ वेळा पोलिसांनी तक्रार नोंदवून न घेणे. चौथे म्हणजे न्यायाल्यायात न्याय मागायला जायचे म्हणजे होणारा प्रचंड खर्च, प्रलंबित प्रकरणांचे प्रमाण, उलटणाऱ्या साक्षीदारांची समस्या इत्यादी. पाचवे म्हणजे न्यायालयाची प्रक्रिया, तेथील भाषा, ह्याबाबतीत माहितीचा अभाव, सार्वजनिक अभियोक्त्यांचे प्रकरणाची पुढे प्रगती होण्याबाबत असणारी उदासीनता, तपास अहवालांची सुमार गुणवत्ता व तपास यंत्रणांकडून ते न्यायालयाला सादर होण्यातील विलंब इत्यादी. अंतिमतः जुने कालबाह्य कायदे, लांबण असलेल्या प्रशासकीय व न्यायिक प्रक्रिया व पर्यायी न्यायिक यंत्रणेचा निष्फळ वापर इत्यादी व अशी भारतातील बहुतांशी लोकांसाठी न्याय सुगम नसण्याची करणे आहेत.

ह्यावर उपाय म्हणून खालील सकारात्मक पाउले उचलल्यास न्याय मिळणे सुगम मोठ्या प्रमाणात सहाय्य होईल. प्रथम म्हणजे विविध विशेषतः वैयक्तिक कायदे व मोटार वाहन अधिनियम, डाक व तार कायदे, रेल्वेज अधिनियम, कामगार व सामाजिक कल्याण कायद्यासारखे सेवा कायदे व समाजातील असुरक्षित व वंचित वर्गांसाठी विशेषत्वाने केलेल्या केलेले कायदे यांचे संहिताकरण व सुलभीकरण करणे. दुसरे म्हणजे गरीब पीडितांना व गरजू आरोपींना मोफत कायदेशीर मदत देणे, व पर्यायी प्रक्रिया अवलंबून अनेक वर्ष प्रलंबित असलेले विवाद मिटविण्यास प्रोत्साहन देणे. तिसरे म्हणजे राज्यघटनेने हमी दिलेल्या पीडितांच्या अधिकारांचा प्रसार करणे, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचें दिशानिर्देश अंगीकारून वाटाघाटी, लवाद लोक अदालत जिल्हा पातळीवर, कायदा महाविद्यालये व विद्यापीठातील कायदा विभागात कार्यरत कायदेशीर मदत कक्ष इत्यादी पर्यायी विवाद निवारण प्रक्रिया अंगीकारणे. चौथे म्हणजे राज्यघटनेच्या ७३ व ७४व्या दुरुस्ती विधेयकात पुरस्कृत केल्यानुसार पंचायतींना न्यायिक निर्णय देण्यासाठी सक्षम करणे, भारताच्या संसदेने पुरस्कृत केलेली महिला न्यायालये व मानवाधिकार न्यायालये स्थापणे. पाचवे म्हणजे लोकांनी व विशेषतः न्याय मागणे सुगम नसलेल्या पिडीतांचे अधिकार प्रतीपुरीत करणे, राज्यघटनेने हमी दिलेल्या मानवधिकार व मुलभूत अधिकारांबाबत त्यांना सहज समजेल अशा एतद्देशीय भाषेत शिक्षित करणे. अंतिमतः शासनाच्या चुकीच्या किंवा निष्काळजी कृत्यासाठी पीडितांना पर्याप्त नुकसानभरपाई मिळण्यासाठी देखरेख ठेवणे.

## २. कार्यकारी सत्तेचा गैरवापर – भ्रष्टाचार –बांधवपक्षपात, किंवा वशिलेबाजी




रीतसर विधीप्रक्रियेचे पालन करून जबाबदेय झाल्याशिवाय कोणत्याही स्थिती किंवा दशेतील व्यक्तीला त्याच्या जमिनीतून किंवा रहात्या जागेतून बाहेर काढता कामा नये किंवा बेवारस किंवा मृत्यू देता काम नये.

इंग्लंडचा राजा जॉनच्या माग्ना कार्टा ह्या सन १२१५ मधील सनदेत पुरस्कृत केल्यानुसार कायद्याचे राज्य हे प्रशासनाचा मुलभूत आधारतत्व असले पाहिजे. जॉन राजाचे हे कायदेशीर वचन हे आधुनिक जगातील कायद्याच्या राज्याचे किंवा विहित प्रक्रियेचा आधार झाला आहे. कायद्याची विहित प्रक्रिया म्हणजे कायद्याने हमी दिलेल्या व्यक्तीच्या अधिकारांचा आदर करण्याचे दायित्व शासनावर असते. त्यानुसार राज्याला किंवा एखाद्या शासकीय प्राधिकरणाला त्या व्यक्तीवर किंवा त्याच्या किंवा तिच्या संपत्तीवर कोणतीही कार्यवाही करावयाची असल्यास, अशा संबंधित

व्यक्तीला तपशीलवार सूचना देणे व ज्याचे अधिकार बाधित होणार आहेत अशा व्यक्तीला त्याची बाजू मांडण्याची व दावा लढविण्याची वाजवी संधी देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. जर शासन किंवा त्यांच्या कोणत्याही अभिकरणाने उपरोक्त प्रक्रियेचा अवलंब न करता कार्यवाही सुरु केल्यास ते कायद्याच्या राज्याचे उल्लंघन किंवा कार्यकारी अधिकाराचा गैरवापर ठरतो.

कायद्याने स्थापित सक्षम, स्वतंत्र व निष्पक्षपाती न्यायाधिकरण किंवा न्यायालयासमोर सर्व दिवाणी व फौजदारी कामकाजात वाजवी सुनावणीच्या अधिकाराची मानवाधिकारावरील सर्व आंतरराष्ट्रीय कायदेशीर दस्तऐवज हमी देतात. त्याप्रमाणे कायद्यानुसार विहित प्रक्रियेचे कोणतेही पालन न करता किंवा सुनावणीची कोणतीही संधी न देता शासनाची जी कृती एकाधिकारशाही पद्धतीने व्यक्तीचा जीवन किंवा स्वातंत्र्याच्या अधिकार हिरावून घेते, ती कृती हा कार्यकारी अधिकाराचा दुरुपयोग आहे. पुष्कळवेळा काही ना काही कारणाने शासन किंवा त्यांची अभिकरणे मानवाधिकारांचे उल्लंघन होईल अशा मनमानी पद्धतीने आपल्या अधिकारांचा वापर करत असतात. कोणत्याही कायदेशीर आधाराशिवाय सत्तेवर असणाऱ्या काही थोड्या व्यक्तींच्या फायद्यासाठी शासन किंवा त्यांची अभिकरणे स्वतःच्या कार्यकारी अधिकाराचा दुरुपयोग करून व्यक्तीच्या नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांचे गंभीर उल्लंघन करतात. राष्ट्रांच्या समुदायाने अंगिकारलेल्या आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याच्या अनेक कायदेशीर दस्तैवजांचं उद्दिष्टांचा पराभव करणारा असा दुरुपयोग टाळण्यासाठी संयुक्त राष्ट्रे व त्यांच्या विविध संस्था नियमितपणे राष्ट्रराज्यांना आवश्यक त्या लोकतांत्रिक उपाययोजना करण्यासाठी आवाहन करीत असतात. भ्रष्टाचार ही अशी एक बाब आहे, जिथे शासनाची अधिकरणासहित सर्व प्राधिकरणे आपल्या सग्यासोयऱ्याचे हित जपण्यासाठी आपलेच नियम वाकवतात. भ्रष्ट प्रथांमुळे काहीजणांना बेकायदेशीर लाभ होतो, पण अनेकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर हमी दिलेल्या मानवाधिकारांची मुक्त परिपूर्तता करण्यात अडचणी येऊन त्यांचे कायदेशीर नुकसान होते.

संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त श्रीमती नवी पिल्लई यांच्या मतानुसार, भ्रष्टाचार मारतोच. ''**जगभरात भ्रष्टाचाराने जेवढी पैशांची चोरी होते, त्या पैशांमध्ये जगातील भुकेले लोक ८० वेळा जेवण करू शकतील. जवळपास ८७० दशलक्ष लोक रोज भुकेल्यापोटी झोपी जातात व त्यामध्ये मुलेच जास्त प्रमाणात असतात. त्या पुढे म्हणतात नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांची त त्याच्याशी अनुस्यूत विकासाच्या अधिकाराची परिपूर्ती करण्यात भ्रष्टाचार हा प्रचंड मोठा अडथळा आहे. पारदर्शकता, जबाबदारी, अभेद्भाव व समूहजीवनाच्या प्रत्येक पैलूत अर्थपूर्ण सहभागीत्व ह्या मानवाधिकाराच्या चार मुलभूत तत्वांचे भ्रष्टाचारात उल्लंघन होत असते. ह्याउलट जेव्हा वरील तत्वांचे पालन व अंमलबजावणी केली**

**जाते, तेव्हा भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्याचे ते एक परिणामकारक साधन असते.**'' व्यक्तींना हमी देण्यात आलेल्या मानवाधिकारांची परिपूर्ती करण्यामध्ये भ्रष्टाचाराशी संबंधित वाईट गोष्टी मानवाधिकार उच्चायुक्तांच्या वरील विधानात अधोरेखित होतात.

आपल्या अनेक वर्षांच्या केलेल्या कामाच्या आधारे भ्रष्ट्राचाराचे निर्मुलन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी सन २००४ मध्ये एक करार स्वीकारला. बहुतांशी राष्ट्रांनी त्याला मंजुरी दिल्यामुळे सदर करार सन २००५ मध्ये अमलात आला. भ्रष्टाचाराचे निर्मुलन करण्यासाठी आपली कायदेशीर व नियामक चौकट मजबूत करण्यासाठी सर्व राष्ट्रे लागू करू शकतील अशा प्रमाणे, उपाययोजना व नियमांचा व्यापक संच सदर कराराने विहित केली आहेत. सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील प्रचलित भ्रष्टाचाराच्या सर्व स्वरूपाचे गुन्हेगारीकरण करण्याचे व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन त्यात केले आहे. त्याव्यतिरिक्त ज्या देशामध्ये अशा भ्रष्ट मार्गाने संपत्ती निर्माण झाली असेल त्या देशाने ज्या देशातून सदर संपत्ती चोरली गेली त्या देशाला परत करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ही तरतूद निश्चितच एक महत्वाचे पाउल आहे.

मुलभूत अधिकारांच्या द्वारे भारतीय राज्यघटनेने आपल्या नागरिकांना मानवाधिकारांची हमी दिली आहे आणि व्यक्तीच्या अधिकारांची परिपूर्ती करण्यासाठी त्या कळीच्या तरतुदी आहेत. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अनेक परस्पर संबंधित प्रकरणांमध्ये विविध अधिकारांमागील खरे तत्वज्ञान विषद केले आहे व  अनेक अधिकारांचा समावेश करून जीवन व स्वातंत्र्याच्या अधिकारांच्या तरतुदींची व्याप्ती वाढविली आहे. त्याचवेळेला कार्यपालिकेने अधिकारांवर अतिक्रमण करू नये म्हणून भारताच्या राज्यघटनेनेच विविध उपाययोजनांची तरतूद केली आहे. मात्र देशातील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मागासलेपणामुळे व श्रीमंत व राजकीय वरिष्ठांच्या सग्यासोयऱ्याना सहाय्य होईल अशा रीतीने व स्वतःच्या व्यक्तिगत किंवा आर्थिक लाभासाठी अधिकारपदावरील काही व्यक्तींचे गट स्वतःच्या अधिकारांचा दुरुपयोग करतात. भ्रष्टाचार व भाईभतीजावाद ह्याद्वारे आपल्या कार्यकारी अधिकारांचा दुरुपयोग करण्याचे शासनाच्या विविध अंगांमधील लोकांच्या एका गटाचे मुख्य गुणधर्म आहेत. अशा प्रथांमुळे असुरक्षित व वंचित लोकांना आरोग्य, शिक्षण, जमीन, अन्न, निवारा व कपडे ह्या मुलभूत गोष्टीसुद्धा मिळणे अवघड होऊन बसते.

अशा अपगम्य प्रथांचा सामना करण्यासाठी व कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी अनेक उपाययोजना करण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य व विकास संघटनेने आशिया व प्रशांत महासागर क्षेत्रातील भ्रष्ट व भाईभतीजावाद स्वरूपातील सत्तेच्या दुरुपायोगाला

ORGANISATION FOR ECONOMIC CO-OPERATION AND DEVELOPMENT
OECD

हाताळण्यासाठी विकसित केलेल्या विविध उपाययोजनांपैकी काहींचा खरोखर विचार होण्यासारखा आहे. त्यानुसार –

**अ. सार्वजनिक अधिकाऱ्यांची सचोटी व सक्षमता** – सार्वजनिक अधिकाऱ्यांची सचोटी व सक्षमता हा सर्वात महत्वाचा पैलू आहे. अधिकाऱ्यांच्या निवडीमध्ये व बढतीमध्ये पारदर्शकता व न्याय्य पद्धती द्वारे हे साध्य केले पाहिजे. योग्य मेहेनताना व अन्य सुखसोयी, नियमितपणे आचारसंहिता लागू करणे, नियम, विनियम व प्रक्रियेतील स्वारस्य टाळण्यासाठी नियमित आढावा, नियमन व प्रक्रिया, जुने कालबाह्य कायदे निरसित करून कालसुसंगत नवीन कायदे आणणे व सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या कामात राजकीय हस्तक्षेप होणार नाही यावर निगराणी ठेवणे.

**ब. सार्वजनिक व्यवस्थापन प्रणाली** – सार्वजनिक व्यवस्थापन प्रणाली हे एक परिणामकारक साधन आहे. व्यापक प्रमाणावर स्वेछात्मक तरतुदी, सार्वजनिक अधिकारी व लोकांमध्ये नियमित परस्पर संवादी चर्चेची सत्रे, इ- प्रशासन, विहित कालावधीने अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे, स्वतंत्र अभिकरणाच्या द्वारे सार्वजनिक लेखापरीक्षणाद्वारे सार्वजनिक दायित्व यंत्रणा व सार्वजनिक भावना असलेल्या व्यक्ती इत्यादी

**क. राजकीय प्रणालीच्या वर्धानात शासनाची भूमिका** – सदर प्रणालीद्वारे शासनाने राजकीय पक्षांना निवडणूक मोहिमेसाठी निधी देणे आवश्यक आहे. राजकीय व्यक्तींसाठी आचारसंहिता लागू करणे, त्यांचे भूमिका व जबाबदारी जनतेप्रती उत्तरदायी करणे, तुलनात्मक प्रशासकीय व वैधानिक प्रक्रिया देणे व प्रशासनाची प्रक्रिया नियमितपणे सुधृढ करणे.

**ड. व्यवसाय संस्थेचे नियमन** – विविध व्यवसाय गृहांच्या धोरणांचा नियमित आढावा, व नैतिक प्रथा पद्धती अंगीकारण्यावर अनिवार्य भर. त्यांच्या उत्तम पद्धतींचे व सामाजिक जबाबदारीच्या घटकांच्या प्रती असणाऱ्या भूमिकेचे व जबाबदारीचे नियमित लेखापरीक्षण इत्यादी. उपरोक्तशिवाय शासनाने नेमलेल्या विविध समित्या व आयोगांनी व न्यायालाय्च्या विविध निर्णयांनी वेळोवेळी हे अधोरेखित केले आहे की सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचार व भाईभतीजावादाचे निर्मुलन करण्यासाठी आवश्यक तिथे बडतर्फीसहित कडक शिक्षेची तरतूद आवश्यक आहे. त्याचवेळेस सरळ व पारदर्शक प्रक्रिया, एकाच अधिकाऱ्याच्या हातात सर्व अधिकार एकवटण्याऐवजी विविध अधिकाऱ्यांना अधिकारांचे वाटप, नियमित कालावधीने उत्तम नैतिक पद्धती अवलंबणे; मुलभूत सोयी, आकर्षक मानधन, व बढतीच्या संधी असल्यास भ्रष्टाचारी व भाईभतीजावादी पद्धतींचे उच्चाटन होण्यास सहाय्य करून कार्यकारी अधिकार उलथविता येतात. ह्याशिवाय जे राजकीय नेते सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या कामात हस्तक्षेप करतात व आपल्या सत्तेचा वापर अधिकाऱ्यांना नाउमेद करण्यासठी करतात, त्यांच्या विरुद्ध कडक

कारवाई केली गेली पाहिजे. भ्रष्टाचारी व भाईभतीजावादी पद्धतींद्वारे कार्यकारी अधिकारांचा दुरुपयोग टाळण्यासाठी व त्यायोगे राज्यघटनेने हमी दिलेल्या मुलभूत अधिकारांच्या वर्धनासाठी अशी कार्यवाही हा आवश्यक घटक आहे.

### ३. मानवाधिकार व उत्तम शासन




सद्य काळामध्ये जगातील राष्ट्रांमधील कुशासनामुळे उत्तम शासनाच्या संकल्पनेचा वारंवार उच्चार केला जातो आहे. सुशासन ही काही नवीन संकल्पना नाही आहे. ती फार पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. औपचारिक किंवा अनौपचारिक क्षेत्राशी संबंधित कोणत्याही बाबीवर निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत विविध घटक व अभिकरणांना सामील करून घेणे म्हणजे शासन. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये लोकांना परिणामकारक सेवा देण्यासाठी व देशाच्या प्रगतीसाठी काम करण्यासाठी विविध धोरणे, कायदे व नियम यांची अंमलबजावणी करताना शासन केंद्रस्थानी असते. शासन ह्या संकल्पनेत स्थानिक शासन, राष्ट्राचे शासन, क्षेत्रीय शासन व आंतरराष्ट्रीय शासनाचा समावेश होतो.

प्रत्येक राष्ट्राने स्वीकारलेल्या शासनाच्या प्रतिमानेवर मानवाधिकारांचे प्रवर्तन व परिपूर्ती अवलंबून आहे. मात्र शासनाच्या विविध अंगांना बहाल केलेल्या कार्यकारी अधिकारांचा मनमानी उपयोग केल्यास कुशासन येतेच, पण सामान्यपणे जनतेच्या व विशेषत्वाने असुरक्षित व वंचित गटांच्या मानवाधिकारांच्या परीपुर्तीवर परिणाम होत असतो. कुशासन, अधिकारशाहीची राजवट, क्षेत्रीय व आंतरराष्ट्रीय संघर्ष, निर्वसाहतीकरण, शासनातील थोड्या प्राधिकरणांना व्यापक अधिकार, प्रत्येक समाजातील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या वंचित लोकांच्या अधिकारांच्या प्रवर्तनामध्ये एका गटातील लोकांनी केलेला गैरवाजवीपणा, निर्णय प्रक्रियेत कायदे, नियम व प्रक्रिया यांची अंमलबजावणी करण्यात अपगम, विज्ञान व तंत्रज्ञान विशेषतः माहिती तंत्रज्ञानाचा विकास, विविध क्षेत्रांमध्ये बहुराष्ट्रींय कंपन्यांचा शिरकाव, संयुक्त राष्ट्रांकडून मानवाधिकारांच्या प्रवर्तन व संरक्षणासाठी आग्रह इत्यादीमुळे सुशासनाची संकल्पना विकसित झाली.

सुशासानाची अशी एकाच व परिपूर्ण व्याख्या नाही. त्याच्या व्याप्तीची आणि संकल्पनेची कोणतीही मर्यादा नाही. अनेक पैलूंची व्याख्या करण्यासाठी तिचा उपयोग केला जातो. मात्र त्या वाक्प्रचाराची अंमलबजावणी आणि त्याच्या परीचालनाचा भाग साध्य करणे अतिशय अवघड आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्च्युक्तांच्या कार्यालयानुसार संदर्भ व उद्दिष्टांच्या आधाराने

सुशासन साध्य करण्यासाठी खालील वैशिष्ट्यांचा परामर्श घेणे गरजेचे आहे जसे मानवाधिकारांचा संपूर्ण आदर, कायद्याचे राज्य, परिणामकारक सहभागीत्व, राजकीय बहुविधता, पारदर्शक व जबाबदार प्रक्रिया व संस्था, कार्यक्षम व परिणामकारक सार्वजनिक क्षेत्र, कायदेशीरपणा, ज्ञानाची सुगमता, नागरी समाजाचा शासनातील सहभाग, माहिती व शिक्षण, लोकांची राजकीय सक्षमता, जबाबदारी, एकता व सहिष्णुता ह्या मूल्यांचे वर्धन करणारी न्यायबुद्धी, शाश्वतता, व दृष्टीकोन. पण सर्वसामान्यपणे बोलायचे तर सुशासनामध्ये शासनाकडून राज्यसंस्थेतील सर्व घटकांना समाविष्ट करून त्यांच्याशी व्यवहार करताना पारदर्शकता अपेक्षित आहे व त्याची निष्पत्ती विकास प्रक्रियेभिमुख असणे अपेक्षित आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार परिषदेच्या ठराव क्रमांक २००० / ६४ नुसार लोकांच्या गरजांच्या बाबतीत पारदर्शकता, जबाबदारी, दायित्व, सहभाग व प्रतिसादात्मकता हे सुशासनाचे गुणधर्म आहेत. आशिया व प्रशांत क्षेत्रासाठीच्या संयुक्त राष्ट्र आर्थिक व सामाजिक आयोगानुसार, सुशासनाचे आठ गुणधर्म आहेत.




**सहभागीत्व –** शासनासाहित विविध पातळ्यांवर लोकांचा सहभाग हा सुशासन साध्य करण्यासाठी महत्त्वाचा मुद्दा आहे. शासनाबाबत लोकांच्या अपेक्षांचा अभिप्राय प्राप्त होईल असा संवादाचा पूल शासनाकडे असला पाहिजे. तो प्रातिनिधिक स्वरुपात किंवा अन्य साधनांच्या स्वरुपात असू शकतो. मानवाधिकारांची हमी हा मुख्य पैलू आहे.

**कायद्याचे राज्य –** कोणताही भेदभाव न करता उपाययोजनांची यंत्रणेसहित कायदेशीर नियम व प्रक्रियांची न्याय्य अंमलबजावणी म्हणजे कायद्याचे राज्य. त्यामध्ये मानवाधिकारांचे पूर्णपणे संरक्षण केले जाते.

**परिणामकारक व कार्यक्षम –** लोकांच्या गरजा व अपेक्षा पूर्ण करणारी निष्पत्ती प्राप्त करण्यासाठी शासनाच्या संस्था कार्यक्षम असणे गरजेचे असते. संसाधनांचा वापर शाश्वत दृष्टीकोनातून कार्यक्षमपणे होणे सुद्धा अध्यारुत आहे..

**न्याय्य व समावेशक –** सामान्य जनतेच्या न्याय्य स्थितीवर समाजाचे स्वास्थ्य अवलंबून असते. सदर न्याय्य स्थिती साध्य करण्यासाठी सामाजिक, आर्थिक व अन्य वंचित गटांच्या लोकांना सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यसाठी समानतेच्या पातळीवर संधी देण्याची आवश्यकता असते.

**प्रतिसादात्मकता –** सर्व संस्थांनी वेळेच्या चौकटीत काम करून कमाल निष्पत्ती अभिमुख असे काम करणे गरजेचे असते.

**पारदर्शकता –** कायदेशीर नियम व विनियमानुसार निर्णय व त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यामध्ये माहिती मुक्तपणे मिळणारा समाज, प्रतिसादात्मक मुक्त माध्यमे व निर्णय प्रक्रियेत भाग घेण्याची संधी समाविष्ट असते.

**दायित्व –** दायित्व ही एक सर्वंकष संकल्पना असून त्यामधील सर्व घटक म्हणजेच सार्वजनिक, खासगी व नागरी समाजाच्या संघटना ह्या त्यांच्या कृतीसाठी समाजाला उत्तरदायी असतात. प्रत्येक संस्थेच्या उपक्रमांच्या स्वरूपावर दायीत्वाचे प्रमाण ठरते. कोणत्याही अपगामाशिवाय कायद्याच्या राज्याचे पालन करणे हा दायित्व साध्य करण्यासाठीचा मुलभूत नियम व वैशिष्ट्य आहे.

**सहमती अभिमुख –** प्रत्येक समाजामध्ये अनेक घटक असतात. सर्वांनी सहमतीने उत्तम नीती विकसित करून समूहाचे हित समानतेने साध्य केले पाहिजे. त्याचवेळेस शाश्वत मानवी विकासासाठी दीर्घमुदतीची उद्दिष्टे ठरवून व ती साध्य कशी करायची ह्याबाबतची नीती ठरवून तसा दृष्टीकोन ठेवणे आवश्यक असते.

मानवाधिकार व सुशासन यामध्ये एकमेकांना पूरक अशा अनेक साखळ्या आहेत. दोन्ही मिळून प्रमाणके दर्शवितात व काम करणाऱ्याने ती अंगीकारावी लागतात. ते मिळून संस्थांचे मजबुतीकरण, लोकतांत्रिक सहभागीत्व, कायद्याचे राज्य तत्वाचे पालन, परिणामकारक सेवा देणारी यंत्रणा, शासनात भ्रष्टाचार व भाईभतीजावाद विरोधी पद्धतीचे प्रवर्तन करतात. मानवाधिकारांच्या वैश्विक जाहीरनाम्याच्या कलम २१ व २८ मध्ये आंतरराष्ट्रीय सहभागासहित सर्व स्तरांवर सुशासनाचा पुरस्कार केला आहे. नागरी व राजकीय अधिकार, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार विषयक करार व अन्य अनेक दस्तऐवज मानवाधिकारांच्या प्रवर्तनासाठी सुशासनाच्या संकल्पनेचे प्रवर्तन गरजेचे मानतात. सहस्त्रकाच्या विकास उद्दिष्टांमध्ये सुद्धा सुशासनाच्या संकल्पनेचा पुरस्कार केला असून मानवाधिकारांच्या परीपुर्तीच्या दृष्टीने ते कळीचे आहे.

मानवाधिकार व सुशासनाच्या प्रवर्तनासाठी भारताची राज्यघटना संयुक्त राष्ट्राच्या दृष्टिकोनाचा पुरस्कार करते. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर शासनाने गरीबीचे निर्मुलन करण्यासाठी व वंचित गटातील लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक योजना आखून त्यांची अंमलबजावणी केली. मात्र निरक्षरता, गरिबी, बेरोजगारी, लोकांच्या एका घटकाकडून भ्रष्ट व भाईभतीजावादाच्या पध्दती अवलंबणे, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, व अशा अनेक उदाहरणांमुळे

देशाच्या शासनावर धब्बा लागला आहे. जरी शासनाने माहितीचा व शिक्षणाचा अधिकाराची रुजवात केली, व वंचित गटातील लोकांच्या सर्वसमावेशक विकासासाठी अन्य धोरणे व नीती आखल्या तरीसुद्धा लोकांच्या व अंतरराष्ट्रीय समुदायाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणखी पुढाकार घेण्याची गरज आहे. नागरी समाजाला निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे, गरीबीचे निर्मुलन व बालकांमधील कुपोषण कमी करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेणे, महिलांचा आर्थिक स्तर उंचावणे, निवडणूक खर्चासाठी निधी पुरविणे, विवादांचे निराकरण करण्यासाठी पर्यायी यंत्रणांचा वापर करण्यास उत्तेजन देणे, न्यायव्यवस्थेतील प्रलंबित प्रकरणे घटविण्यासाठी धोरण व नीती आखणे, मानवाधिकार अधिनियमात म्हटल्यानुसार मानवाधिकार न्यायालये स्थापन करणे, शासकीय खर्चात कपात, मुलभूत अधिकारांची परिपूर्ती होण्यासाठी उपाययोजना करणे, मानवाधिकारांचे सक्तीचे शिक्षण देणे, शासनाच्या अधिक पारदर्शक पद्धती अवलंबणे, हे शासनाचे कर्तव्य आहे. अशा उपाययोजनामुळेच एक चैतन्यपूर्ण लोकशाही होण्याची भारताची क्षमता वृद्धिंगत होईल.

## ४. सारांश

राज्यघटना व शासनाने मानवाधिकारांची हमी दिली आहे. मात्र समाजातील असमानतेमुळे त्यांच्या वर्धनाचे चित्र उदास भासते. सामान्यतः राज्यासंस्थेला भेडसावणाऱ्या विविध समस्या, व विशेषत्वाने व्यक्ती सक्षम नसणे यामुळे कार्यकारी अधिकारांमध्ये निहित हितसंबंध निर्माण होतात व त्याचा दुरुपयोग करण्याची प्रवृत्ती बळावते. ह्या सर्व विकृतींवर मात करण्यासाठी कोणत्याही प्रकारे भेदभाव किंवा भीती न बाळगता लोकांनी आपल्या कर्तव्याचे निर्वाहन केले पाहजे. त्यामुळे भूत, वर्तमान व भविष्यातील समस्यांवर परिणामकारक उपाय विकसित होऊन शासनाच्या उत्तम पद्धती रुजण्यास व विकसित होण्यास मदत होईल.

## नमुना प्रश्नोत्तरे

१. संयुक्त राष्ट्रांनी त्यांच्या लोकसंख्या विषयक अहवाल ..............मध्ये लोकसंख्या नियंत्रित करण्याची गरज प्रतिपादन केली आहे

अ) २०१२

ब) २०११ (अ)

क) २०१०

ड) १९८८

२. ओसीईडी म्हणजे

अ) पर्यावरणीय सहकार्य व विकास संघटना

ब) आर्थिक सहकार्य व विकास संघटना (अ)

क) शैक्षणिक सहकार्य व विकास संघटना

ड) वरीलपैकी कोणतेही नाही

३. आशिया व प्रशांत क्षेत्रासाठीच्या संयुक्त राष्ट्र आर्थिक व सामाजिक आयोगानुसार सुशासनाचे ............... मुख्य गुणधर्म असतात.

अ) ७

ब) ६

क) ५ (ड)

ड) ८

४. वैश्विक मानवाधिकार घोषणापत्राच्या ............... नुसार आंतरराष्ट्रीय सहभागासहित सर्व स्तरांवर सुशासनाच्या संकल्पनेचा पुरस्कार केला आहे. .

अ) कलम २१ व २८

ब) कलम १२ व १८ (अ)

क) कलम १३ व २८

ड) कलम १६ व २८

५. कायद्याचे राज्य म्हणजे ..................कोणत्याही पक्षपाताशिवाय कायदेशीर नियम व प्रक्रियांची अंमलबजावणी

अ) न्याय्य

ब) अन्याय्य (अ)

क) पूर्वग्रहदुषित

ड) ह्यापैकी कोणतेही नाही.

# घटक ४

## समर्थक गटांची भूमिका

मानवाधिकारांचा अंगीकार करण्याची राजकीय – कायदेशीर प्रक्रिया जागतिक आहे. कायद्याने हमी दिलेल्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी सर्व व्यक्तींना राजकीयदृष्ट्या सक्रीय करणे हे आंतरराष्ट्रीय, क्षेत्रीय, उपक्षेत्रीय व स्थानिक पातळीवरील सर्व कायदेशीर दस्तैवजांचे उद्दिष्ट आहे. समाजातील सर्व घटकांच्या कल्याणासाठी हमी दिलेले सामाजिक व राजकीय अधिकारांची समानतेने पूर्तता करण्याचे कर्तव्य व दायित्व आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांनी राष्ट्रांवर ठेवले आहे. मात्र गरिबी, कुपोषण, शांततेला व सुरक्षिततेला असलेला धोका, अविकसितपणा, समाजातील व्यक्तींची असमान स्थिती इत्यादी चीड आणणाऱ्या बाबींमुळे हमी दिलेल्या मानवाधिकारांची पूर्तता होणे व समान स्थिती सहित मुक्त जीवन व्यतीत करणे अवघड होते. मानवाधिकारांच्या पीडितांना सहाय्य करण्यासाठी, त्यांची दुर्दशा निवारण करण्यासाठी व शासनाच्या अभिकारणांशी लढा देण्यासाठी समर्थक व अन्य अनेक गट कृती करतात. सदर प्रकरणामध्ये विविध समर्थक गटांच्या महत्वाचे व मानवाधिकारांच्या उल्लंघनाच्या पीडितांची स्वप्ने साकार करण्यासाठी त्यांच्या भूमिकेची विद्यार्थ्यांना थोडक्यात ओळख करून देण्यात आली आहे.

### १. परिचय

विचार वैश्विक कृती स्थानिक ह्या उक्तीनुसार प्रत्येक राष्ट्रराज्याने प्रवर्तित केलेल्या उपक्रमांवर मानवाधिकारांची पूर्तता अवलंबून असते. त्यांच्या मानवाधिकारांच्या बद्दलच्या बांधिलकीत उलथापालथ झाल्यास हमी दिलेले अधिकार नाकारण्यात आणि मग त्यासाठी लढा देण्यात त्याची परिणती होते. ज्या लोकांचे अधिकार पेचात आहेत, त्यांना मदत करण्यासाठी व पीडितांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी नागरी समाज व अनेक समर्थक गट राष्ट्रीय व वैश्विक पातळीवर पुढे आले आहेत. सदर समर्थक गटांना मानवाधिकार संरक्षक म्हणून संबोधित केले जाते., व्यक्तिगत व गटाच्या पातळीवर त्यांची वाढती संख्या व सहभाग पाहता, शासनाची अभिकरणे त्यांच्या कायदेशीरपणा, स्वभाववृत्ती व इतरांच्या वतीने अधिकारांच्या वर्धनासाठी असलेल्या लढ्यामधील त्यांच्या भुमिकेबाबत प्रश्न उपस्थित करतात. जगभरातील अनेक व्यक्तींनी समर्थक गटांनी ह्या समस्यांना तोंड दिल्यावर व असे अनेक प्रसंग घडल्यावर सदर समर्थक गटांना कायदेशीर स्वरूप देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी सन १९९९ मध्ये जागतिक पातळीवर मान्यता असलेल्या मानवाधिकार व मुलभूत स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी व



प्रवर्तनासाठी समाजातील व्यक्ती, गट व अंगांचे अधिकार व दायीत्वे ह्या बाबत एक जाहीरनामा स्वीकृत केला.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवाधिकार व मुलभूत स्वातंत्र्याच्या परिपूर्ती व संरक्षण करण्याचा व त्याच्या प्रवर्तनासाठी झटण्याचा प्रत्येकाला व्यक्तीशः व अन्यांच्या सहयोगाने अधिकार आहे असे सदर ठरावाद्वारे मान्य करण्यात आले आहे. सदर गटांच्या किंवा समर्थकांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी सन २००० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांचे मानवाधिकार समर्थकांसाठीचे विशेष दूत हे पद निर्माण केले. त्याचेच पुढे २००८ मध्ये संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार संरक्षकांविषयीचे विशेष संवादक मध्ये रुपांतर करण्यात आले. विशेष संवादकांनी मानवाधिकारांच्या संरक्षकांच्या विरुद्ध दमबाजीच्या कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी संवादासहीत अनेक संरक्षणात्मक उपाययोजना सुचविल्या असून आशय दुरुपयोगाचा प्रतिबंध करण्यासाठी राष्ट्रराज्यांनी विनिर्दिष्ट उपाययोजना अंगीकारण्याची विनंती केली आहे.

## २. समर्थक गटांची भूमिका

मानवाधिकार हे मानवी इतिहासापेक्षा पुरातन आहेत. नैसर्गिक अधिकार असल्यामुळे ते निसर्गाचाच एक अविभाज्य हिस्सा आहेत. मानवतेच्या उगमापासून प्रत्येक समाजाने कोणत्या ना कोणत्या स्वरुपात त्याचा पुरस्कार केला आहे. सन १२१५ मधील मॅग्ना कार्टा जाहीरनाम्यामुळे व त्यानंतरच्या अन्य संहितांमुळे त्यात क्रांतिकारी बदल होत गेले. संयुक्त राष्ट्रांचा व मानवाधिकारांचा वैश्विक जाहीरनामा स्वीकारला गेल्यावर त्याला अंतिम स्वरूप देण्यात आले. असा मोठा इतिहास असून सुद्धा आणि त्यांच्या अभिव्यक्तीमध्ये क्रांतिकारी बदल होऊन सुद्धा जगातील अनेक लोकांना त्यांच्या अधिकारांची कल्पना नाही. त्याचा दुरुपयोग टाळण्यासाठी व मानवाधिकारांच्या पीडितांना प्रत्येक स्तरावर हमी दिलेल्या राजकीय व कायदेशीर रचनेमध्ये न्याय प्राप्त करण्यासाठी समर्थक गट महत्वाची भूमिका बजावतात.

## ३. व्यावसायिक संस्था – माध्यमे, वकिलांची भूमिका – कायदेशीर मदत

### अ) माध्यमे

माध्यमे म्हणजे संपर्काचे साधन. मुद्रित व दृक्श्राव्य प्रसारण, चित्रांसहित दृष्यातेने लिहिणे, बातम्या इत्यादीचा समावेश ह्या व्यापक संकल्पनेत होतो. त्यानुसार वर्तमानपत्रे, पाक्षिके, दूरचित्रवाणी, महाजाल इत्यादी माध्यम संकल्पनेचे प्रतिनिधित्व करतात. मानवाधिकार युगानुयुगे अस्तित्वात आहेत. मात्र कुठल्याही देशामध्ये अधिकारांचा व त्यांची परिपूर्ती करण्यसाठीच्या यंत्रणेचा निश्चित तपशील लोकसंख्येच्या एखाद्या गटालाच ज्ञात असतो. प्रत्येक समाजातील

प्रचलित आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक उपक्रमांनुसार नागरिक उपभोगत असलेल्या अधिकारांमध्ये बदल होतो. सदर संदर्भामध्ये मानवाधिकारांच्या प्रवर्तन, संरक्षण व परिपूर्तीमध्ये माध्यमे महत्वाची भूमिका बजावतात. माध्यमे हे शक्तिशाली साधन असल्यामुळे मानवाधिकारांचे उल्लंघन झाल्यास किंवा मानवाधिकारांच्या शिक्षणामध्ये गुंतलेल्या व्यक्ती आणि संघटनांना प्रसिद्धी देऊ शकतात. लोकांना शिक्षित करू शकतात व अशी उल्लंघने होऊ नयेत म्हणून उपाययोजना व साधने सुचवू शकतात.



सांप्रतकाळी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने माध्यमे कुठल्याही विषयावर थेट चर्चा करण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून तज्ञांना पाचारण करू शकतात व मानवाधिकारांच्या उल्लंघनाला प्रतिबंध करण्याबाबत उपाययोजना व मार्ग सुचवू शकतात. ह्यामध्ये लोकांना जागरूक व संघटीत करून अपराध्यांना कायद्याच्या कक्षेत आणण्याची क्षमता आहे. माध्यमांमधून व्यापक स्वरुपात बातम्या व अहवाल प्रसारित केले गेल्यामुळे व लोक ते सतत पाहत असल्यामुळे ज्या लोकांनी मानवाधिकारांचे उल्लंघन केले त्या राष्ट्रप्रमुखांसहित अनेक लोकांना न्यायासनासमोर आणून योग्य ते शासन करण्यात आले. त्याच वेळेस माध्यमे हा चौथा स्तंभ असल्यामुळे त्यांनी संयम व खबरदारी बाळगण्याची आवश्यकता आहे. लोकशाही व मानवाधिकारांची मुल्ये प्रवर्तित करण्यामध्ये योगदान देण्यासाठी वृत्तपत्रांना बहाल करण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होता कामा नये. मानवाधिकाराच्या पीडितांना न्याय मिळण्यासाठी व त्यांना सहाय्यभूत होणारे सत्य कथन सादर करण्यासाठी त्यांनी स्वयं नियामक यंत्रणा अंगीकारणे आवश्यक आहे. सादर केलेल्या बातमीतील तपशील, भाषा शालीन व सभ्य असण्याची आवश्यकता आहे. तसेच वार्ताहरसुद्धा उत्तम अर्हताधारक व प्रशिक्षित असणे, समाजाच्या विविध घटकांमध्ये तणाव किंवा संवेदनशीलता निर्माण करणाऱ्या साहित्य, बातम्या, अहवाल, छायाचित्रे प्रकाशित करताना संयम बाळगणे आवश्यक आहे.

भारतामध्ये माध्यमांनी पुरातन काळापासून महत्वाची भूमिका निभावली आहे. मात्र संपर्काचे माध्यम म्हणून ते थोड्याजणापुरतेच मर्यादित होते व अन्य तपशील भूर्जपत्रांवर लिहिला जात असे. आधुनिक मुद्रित माध्यमांची सुरवात ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या कार्यकाळात झाली. जेम्स ऑगस्टस हिक नावाच्या एका इंग्रज व्यक्तीने २९ जानेवारी १७८० रोजी बंगाल गॅझेट सुरु केले व Calcutta Advertiser म्हणून तो लोकप्रिय झाला. उच्चार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मुलभूत अधिकार असल्याची इस्ट इंडिया कंपनीची भूमिका होती. बंगाल गॅझेट प्रसिद्ध होऊ नये

म्हणून त्यांनी अनेक उपाययोजना केल्या व अखेर सन १७८७ मध्ये ते बंद पाडून हिक इंग्लंडला परत पाठवून दिले. मात्र हिकच्या सदर कृतीमुळे भारतात मुक्त वृत्तपत्रांचा पायरव झाला. सन १७८० मध्ये इंडियन गॅझेट, सन १७८४ मध्ये कलकत्ता गॅझेट, सन १७८५ मध्ये बंगाल जर्नल ह्यामुळे देशाच्या अन्य भागात मुद्रित माध्यमे (वृत्तपत्रे) सुरु होण्यास चालना मिळाली. द मद्रास कुरियर (१७८५) व सन १७८९ मधील मुंबई हेराल्ड व अन्य वर्तमानपत्रे स्वातंत्र्य व संपर्काची माध्यमे म्हणून हळूहळू मूळ धरू लागली. लॉर्ड हेस्टींग्जने सन १८१८ मध्ये वृत्तपत्रांवर कडक सेन्सॉरशिप लादल्यामुळे भारतामध्ये अनेक वृत्तपत्रे उत्क्रांत झाली. भारतीय भाषांमध्ये प्रसिद्ध झालेले पहिले वृत्तपत्र कन्नड भाषेमध्ये असल्यचे समजले जाते. एका जर्मन व्यक्तीच्या प्रयत्नाने सन १८४३ मध्ये मंगळूर समाचार नावाने पहिले एतद्देशीय वृत्तपत्र सुरु झाले. ह्यामुळे देशातील अन्य अनेक भाषांमध्ये एतद्देशीय वर्तमानपत्रे सुरु होण्यास चालना मिळाली. सर्वात जुन्या वर्तमानपत्रांपैकी अमृत बझार पत्रिका हे बंगाली वृत्तपत्र बंगाल मध्ये अजूनही लोकप्रिय आहे. वृत्तपत्रांची मोठ्या प्रमाणावर छपाई व सर थॉमस मुन्रो ह्यांच्या सुधारणा योजनेमुळे व त्यानंतर सर मेटकाफ यांच्या प्रयत्नांमुळे ब्रिटीश सरकारने १८३५ चा कायदा निरसित करून व्यापक वृत्तपत्र कायदा १८६७ मध्ये पारित केला. वृत्तपत्रे व पुस्तके नोंदणी अधिनियम असे सदर कायद्याचे नाव असून नंतर झालेल्या दुरुस्त्यांसहित तो आजही लागू आहे. सदर अधिनियमाव्यतिरिक्त अनेक अधिनियम पारित केले गेल्यामुळे उच्चार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला एक कायदेशीर आधार प्राप्त झाला.

राज्यघटना स्वीकारल्यानंतर, त्यामधील हमीनुसारच्या मुलभूत अधिकारांची परिपूर्ती होण्यासाठी उच्चार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे एक मुलभूत निर्धारक आहे. माहितीच्या अधिकाराची संकल्पना हे सर्व अधिकारांच्या परीपुर्तीमध्ये त्यांना वेढून टाकणारे मुलभूत स्वातंत्र्य आहे. उच्चार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दुरुपयोग होऊ नये म्हणून सार्वजनिक हितार्थ प्रतिबंधक उपाय योजण्याचा जरी शासनाला अधिकार असला तरीही वृत्तपत्रामध्ये विचार प्रकाशित करण्यावर असलेले प्रतिबंधात्मक उपाय हे हृदयात जतन करून ठेवलेल्या उच्चार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे गंभीर उल्लंघन ठरते असा निर्णय भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने (बेनेट कोलमन कंपनी ऑफ इंडिया विरुद्ध भारत सरकार) प्रकरणी १९८६ मध्ये दिला. त्याचवेळेस कोणत्याही असत्य बातम्या न छापण्याची ताकीद वृत्तपत्रांना हरीजयसिंग प्रकरणी १९९६ मध्ये दिली.

मानवाधिकारांची परिपूर्ती करण्यासाठी सामान्य जन व शासनाला अनेक मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यासाठी माध्यमे महत्वाची भूमिका बजावतात. महत्वाच्या योजना, शासनाची नीती, राजकीय पक्ष, न्यायालयांचे निर्णय, विविध संस्थांचे व व्यक्तींचे मानवाधिकारांच्या परिपूर्तीसाठीचे प्रयत्न, इत्यादी महत्वाचे स्त्रोत आहेत. बातम्यांची व मतांची अभिव्यक्ती व जनतेमध्ये प्रसारणा

व्यतिरिक्त गृहबांधणी, शाळा, लोकशिक्षण, आपत्कालीन किंवा आपत्तीमध्ये जनतेकडून देणग्या जमा करून लोकांना मदत करणे इत्यादी कळीचे उपक्रम हे मानवाधिकारांच्या परिपूर्तीसाठी माध्यमांनी घेतलेला पुढाकार समजला पाहिजे. एक मुक्त व जबाबदार माध्यम मानवाधिकारांचे उल्लंघन प्रतिबंधित करण्यासाठी दक्षतेने काम करेलच, पण मानवाधिकारांच्या तत्वांचे परिणामकारक प्रसारण सुद्धा करेल.

## ब) वकिलांची भूमिका – कायदेशीर साहाय्य

मानवाधिकारांच्या प्रवर्तनासाठी व संरक्षणासाठी कायदा व्यावसायिक महत्वाची भूमिका बजावतात. मानवाधिकारांचे संरक्षणव प्रवर्तन हे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचा जरी युक्तिवाद करण्यात येत असला तरीही विधी व्यवसाय व व्यावसायिक हे त्यांच्या कायद्याशी असलेल्या निकटच्या संबंधांमुळे मानवाधिकाराची तत्वे व त्याची लागुता विकसित करण्यात महत्वाची भूमिका बजावतात.

विधी व्यावसायिकांमध्ये वकील, न्यायाधीश, विधी अधिकारी, विधी सल्लागार, कायदा विषयाचे प्राध्यापक, व मानवाधिकारांच्या प्रवर्तनासाठी काम करतात (ज्यांना मुक्त विधी व्यावसायिक असे संबोधले जाते) अशांचा समावेश असतो. कायद्याची अर्थउकल करण्याच्या आपल्या कौशल्याचा उपयोग करून नवीन तत्वे उत्क्रांत करून व्यापक कायदेशीर वादचर्चा, लिखाण व मानवाधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या दडपशाही राजवटींचा निषेध करत मानवाधिकारांच्या प्रवर्तनामध्ये ते आघाडीवर असतात. सांप्रत काळात जगभरामध्ये अनेक वेळा वकील व अन्य विधी व्यावसायिकांनी छळवणूक, महिलांच्या अधिकारांची परिपूर्ती, तस्करी प्रतिबंधक कायदे विकसित करण्यात महत्वाची भूमिका निभावली आहे. वकिलांच्या व्यतिरिक्त अन्य न्यायाधीश, विधी पुरस्कर्ते, व विधी प्राध्यापक अशा विधी व्यावसायिकांनी यांनी आपत्कालात, युद्धकाळात, व एकाधिकारशाही राजवटींमध्ये मानवाधिकारांचा उपभोग घेण्यात अडथळे आणणाऱ्या धोरणांना विरोध करण्यात व कायद्याच्या तत्वांशी छेडछाड करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे.

भारताच्या संदर्भाने बोलायचे तर वकिलांच्या सहित अनेक व्यावसायिकांनी मानवाधिकारांच्या विकासात महत्वाची भूमिका निभावली आहे. सार्वजनिक हिताच्या याचिकांच्या माध्यमातून अनेक विधी व्यावसायिकांनी दाखल केलेल्या खटल्यांमुळे भारताच्या

राज्यघटनेतील कलम २१ मधील जीवन व स्वातंत्र्य संकल्पनेचा विस्तार झाला. राज्यघटनेत निसंदिग्ध व्याख्या न केलेल्या अनेक अधिकारांचा न्यायव्यवस्थेने जीवन व स्वातंत्र्याच्या अधिकारामध्ये समावेश केला. भारतातील वकील व प्राध्यापकांनी दाखल केलेल्या खटल्यांमुळे महिलांच्या अधिकारांच्या विकासासाठी तसेच समान काम समान वेतन, पर्यावरण संरक्षण कायदे, एचआयव्ही/एड्स रुग्णांच्या अधिकारांचे संरक्षण, कौटुंबीक हिंसाचाराला प्रतिबंध, कारागृहांमधील छळ, जलद न्याय इत्यादी बाबी विकसित होण्यास मदत झाली. विधी व्यवसाय करता करताच लोकांना मानवाधिकारांच्या बाबत शिक्षित करण्यासाठी व ज्यांच्या मानवाधिकारांचे संरक्षण करण्याची गरज आहे, त्यांच्या साठी अनेक वकील व न्यायाधीश हे वकील क्लब, वकील मंडळ इत्यादी उपक्रमातून एकत्र आले व नागरिकांच्या अधिकारांच्या प्रवर्तनासाठी त्यांनी लढा देऊन त्यांना शिक्षित केले.

मानवाधिकारांचे प्रवर्तन व परिपूर्ती करण्यासाठी मोफत कायदेशीर मदत हे एक महत्वाचे व्यासपिठ आहे. फ्रांस मध्ये सन १८५१ मध्ये त्याची रुजवात करण्याचे प्रयत्न झाले असले, तरीही सन १८७६ मध्ये न्यूयॉर्कमध्ये पहिली मोफत कायदेशीर साहाय्य संस्थेची स्थापना करून अमेरिकेत मोफत कायदेशीर मदतीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. सन १९४९ मध्ये इंग्लंडमध्ये कायदेशीर मदत व सल्ला अधिनियम पारित करण्यात आला. रेजिनल हर्बर स्मिट यांनी त्यांच्या न्याय व गरीब ह्या पुस्तकामध्ये मोफत कायदेशीर सल्ल्याचा पुरस्कार केला आहे. गरिबांच्या सहित प्रत्येकाचे प्रकरण लढविणे हे विधी व्यावसायिकांचे दायित्व असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे. कायदेशीर मदत म्हणजे कोणतेही शुल्क न घेता गरिबांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सल्ला देणे असे आहे.

भारतामध्ये सन १९५२ पासून मोफत कायदेशीर मदतीचा मुद्दा कायदामंत्र्यांच्या परिषदेत व कायदा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या विविध चर्चासत्रात व परिषदांमध्ये विचारात घेण्यात आला. सन १९६० मध्ये मोफत कायदेशीर मदत देण्यासाठी काही दिशानिर्देश तयार करण्यात आले व कायदा मंडळांच्या मार्फत त्याची रुजवात करण्यात आली. मोफत कायदेशीर मदतीच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सन १९८० मध्ये भारत सरकारने भूतपूर्व न्यायाधीश पी एन भगवती यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. सदर समितीने लोक अदालत ह्या अभिनव संकल्पनेची रुजवात करून न्यायिक अधिकाऱ्यांच्या समक्ष तडजोडीने व सामंजस्याने खटले निकाली काढण्याची प्रक्रिया सुरु केली. राज्यघटनेच्या कलम ३९ (अ) नुसार न्यायपालिकेचे परिचालन हे समान संधीच्या तत्वावर झाले पाहिजे विशेषतः मोफत कायदा सल्ला देण्याची व योग्य तो अधिनियम पारित करून किंवा योजना राबवून किंवा अन्य मार्गाने आर्थिक किंवा अन्य अक्षमतेमुळे न्याय नाकारला जाणार नाही ह्याची काळजी घेण्याचे टाकण्यात आलेले दायित्व

निभावण्याच्या दृष्टीने सन १९८७ मध्ये भारत सरकारने विधी सेवा प्राधिकरण अधिनियम लागू केला. सदर हमी मुलभूत अधिकारांच्या कलम १४ व २२ (१) नुसार असून कायद्यासमोर समानता व सर्वांना न्याय मिळण्याची समान संधी देणारी न्यायप्रणालीची तरतूद करणे आवश्यक आहे.

विधी विभाग व विधी महाविद्यालयांनी मोफत कायदेशीर सल्ला देण्यात बजावलेल्या भूमिकेचा विचार करून भारतीय विधी परिषदेने (The Bar Council of India) गरिबांना न्याय्य रीतीने मोफत विवाद सोडवणूक करून मिळण्यासाठी मोफत कायदा सल्ला केंद्रांची स्थापना केली. सदर प्रणालीद्वारे न्याय मिळवून देण्यासाठी व नागरिकांच्या मानवाधिकारांचे प्रवर्तन करण्यासाठी विधी व्यावसायिक महत्वपूर्ण भूमिका निभावत आहेत.

## क) शैक्षणिक संस्था

मानवाधिकारांचे प्रवर्तन व प्रसार होण्यात शिक्षणाची भूमिका महत्वाची असते. कोणत्याही समाज, व्यक्ती, किंवा संस्थेला एकत्र आणण्यासाठी शिक्षणाची कळीची भूमिका लक्षात घेऊन वैश्विक मानवाधिकार जाहीरनाम्याच्या रचनाकरांनी कलम २६.२ द्वारे मानवाधिकार समजण्यासाठी, मजबूत करण्यासाठी व त्यांच्या प्रवर्तनासाठी मानवी व्यक्तिमत्वाची जडणघडण करण्याची जबाबदारी शिक्षकांवर टाकली आहे. मानवाधिकारांच्या जागतिक परिषदेने व्हिएन्ना जाहीरनामा व कार्ययोजना (१९९३) मध्ये शिक्षण व शैक्षणिक संस्थांनी निभावायच्या महत्वाच्या भूमिकेवर भर दिला आहे. त्यानुसार, मानवाधिकारांच्या उल्लंघनाच्या विकृतीशी लढा देण्यास लोकांना सज्ज करण्यासाठी व निरक्षरतेचा नायनाट करण्यासाठी सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्थांमधून व शिक्षणाच्या सर्व साधनांमधून मानवाधिकारांची तत्वे बाणविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना राष्ट्राराज्यांनी कराव्यात अशी विनंती केली आहे. त्यानुसार संयुक्त राष्ट्रांनी सन १९९५ ते २००४ हा कालावधी मानवाधिकार शिक्षणाचे दशक म्हणून घोषित केला. शिक्षण व शिक्षण संस्थांच्या भूमिकेचे महत्व विषद करताना, मानवाधिकार विषयक शिक्षण ही जीवनभर चालणारी प्रक्रिया असल्यामुळे ते सतत देण्यात यावे असे संयुक्त राष्ट्रांनी सन २०११ मध्ये घोषित केले.

मानवतेच्या बुद्धिमत्तेची व नैतिकतेची अभेद्य भिंत उभारून राष्ट्रराज्यांमध्ये शांतता साध्य करण्यामध्ये शिक्षण व शैक्षणिक संस्था महत्वाची भूमिका निभावू शकतात ह्या ठाम विश्वासाने संयुक्त राष्ट्रांची १९४५ मध्ये स्थापना झाल्यावर लगेचच राष्ट्रराज्यांनी संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक संघटनेची (युनेस्को) स्थापना केली. मानवाच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी जगातील प्रत्येक बालकावर मानवाधिकारांची मुल्ये रुजविण्यासाठी त्याला गुणवत्तापूर्ण मानवधिकार शिक्षण मिळण्यासाठी व मानवाधिकार हा मुलभूत अधिकार असल्याचे

त्यांच्यावर बिंबविण्यासाठी, संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक संघटनेने स्थापनेपासूनच अनेक योजना आखल्या व राबविल्या आहेत. सामान्यतः शिक्षणाच्या प्रवर्तनासाठी व विशेषत्वाने मुलांच्या शिक्षणामध्ये योग्य ती धोरणे अनुसरण्यासाठी संघटनेने अनेक कार्यक्रम व योजना देऊ केल्या आहेत.

संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक संघटने व्यतिरिक्त सुमारे ६० वर्षांपूर्वी मानवाधिकारांचे प्रवर्तन करण्यासाठी मानवाधिकार उच्चायुक्तांच्या कार्यालयाची एक छोटा विभाग म्हणून स्थापना करण्यात आली. मात्र संयुक्त राष्ट्रांनी मानवाधिकारांना प्राप्त होणारे वाढते महत्व लक्षात घेऊन सन १९९३ मध्ये महासभेने मानवाधिकार केंद्राचे मानवाधिकार उच्चायुक्तांच्या कार्यालयात रुपांतर केले. शैक्षणिक संस्थांनी प्राथमिक स्तरापासून संशोधनाच्या दृष्टीकोनातून मानवाधिकारांचे शिक्षण देण्यासाठी मानवाधिकार उच्चायुक्तांच्या कार्यालयाने अनेक शैक्षणिक मालिका विकसित केल्या आहेत. सदर कार्यालय संयुक्त राष्ट्रसंघाच्या अनेक संस्थां व सदस्य राष्ट्रांच्या सोबत योजना विकसित करण्यासाठी व मानवाधिकार शिक्षणावर देखरेख ठेवण्यासाठी काम करीत आहे.

शैक्षणिक संस्थाकडे विद्यार्थ्यांना कौशल्ये व ज्ञान देणारी प्रशिक्षण केंद्रे म्हणून न पाहता सामाजीकीकरणाची प्रक्रिया शिकवणारी संस्था म्हणून पाहिले पाहिजे. हे सर्वात महत्वाचे आहे आणि कारण ते ज्ञानाधारित केंद्राव्यतिरिक्त पाल्यांमध्ये शाश्वत विकासात्मक दृष्टीकोण विकसित करतात व जीवन कौशल्ये, सामाजीकीकरण, सांस्कृतिक, नैतिक, मुल्ये सुद्धा शिकविण्याचे काम करतात. शैक्षणिक संस्थांचे मानवाधिकारांच्या उपभोगात व परीपुर्तीमध्ये असलेली महत्वाची भूमिका लक्षात घेऊन राष्ट्रराज्यांनी प्राथमिक ते विद्यापीठीय स्तरापर्यंत मानवाधिकारांचे शिक्षण अनिवार्य करण्याची विनंती करणारे ठराव संयुक्त राष्ट्रांनी स्वीकारले आहेत. त्यानुसार वेगवेगळ्या स्तरांवर मानवाधिकार शिक्षण देण्यासाठी संयुक्त राष्ट्रे व त्यांच्या इतर संस्थांनी अनेक उपाययोजना अनुसरल्या आहेत.

अनेक दस्तैवजानुसार प्राथमिक स्तरावर मानवाधिकारांचे तत्वज्ञान सोप्या व समजेल अशा पद्धतीने साध्या सोप्या व्यंगचित्रांच्या व चित्रांच्या सहाय्याने शिकविले पाहिजे. माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना संयुक्त राष्ट्रे व मानवाधिकारांच्या विकासासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराची माहिती देण्यात आली पाहिजे. महाविद्यालयीन पातळीवर मानवाधिकारांचे महत्वाचे घटक समजून

घेण्यावर जोर असला पाहिजे. ह्या स्तरावर समाजाच्या खऱ्या समस्या जाणून त्यावर उपाययोजना शोधण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विद्यापीठ पातळीवर विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध तांत्रिक यंत्रणांची ओळख करून देऊन संयुक्त राष्ट्रांनी विविध दस्तैवजांमध्ये पुरस्कृत केलेल्या विविध विषयांच्या मूल्यप्रणालींचे दुवे एकमेकांना जोडण्यास सांगितले पाहिजे. संशोधन पातळीवर शाश्वत विकासाभिमुख उपचारात्मक यंत्रणा माहित करून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दृष्ट्या महत्वाच्या बाबींची तपासणी केली पाहिजे. संपूर्ण अभ्यासक्रमांत कर्तव्याभिमुख संकल्पना व अधिकार व कर्तव्यामधील अंतर्संबंध असला पाहिजे.

भारतीय तत्वज्ञानाने पुरातन काळापासून ते आधुनिक काळात सुद्धा कोणत्याही भेदभावाशिवाय सामाईक बंधुत्वाचा व कर्तव्याची जाणीव असलेल्या नागरिकांचा पुरस्कार केला आहे. मात्र मध्य व आधुनिक युगात परकीय आक्रमणांमुळे आधुनिकतेच्या नावाखाली तत्वज्ञानाचा आधार बदलून अधिकार केंद्रित शिक्षणाची रुजवात केली. मात्र स्वातंत्र्यलढ्यातील उराशी जपलेली प्राचीन मुल्ये घटनाकारांनी राज्यघटनेत रुजवून एक मूल्याधारित कर्तव्यनिष्ठ समाजाच्या निर्मितीचा संकल्प सोडला आहे .

Government of India
Ministry of Human
Resource Development

राज्यघटनेच्या तत्वज्ञानाला अनुसरुन शासनाने मूल्याधारित मानवाधिकार शिक्षण रुजविण्यासाठी अनेक पाउले उचलली आहेत. मात्र बहुतांशी दस्तऐवज हे दुर्दैवाने दस्तऐवज म्हणूनच राहिले आहेत व आपल्या देशात मानवाधिकारांच्या शिक्षणाची प्रवर्तन चळवळ अजूनही बाल्यावस्थेतच आहे. १९९३ मधील जागतिक मानवाधिकार परिषदेने स्वीकारलेल्या मानवाधिकार व लोकशाही शिक्षण विषयक कार्ययोजनेची दखल घेऊन व मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या वाजलेल्या तुतारीला प्रतिसाद म्हणून, विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठ पातळीवर मानवाधिकार शिक्षणाला प्रवर्तित करण्यासाठी अनेक मार्गदर्शक सूचना विकसित करून जारी केल्या. ह्याव्यतिरिक्त मानवाधिकार अधिनियम १९९३ मध्ये मानवाधिकार शिक्षणाचे महत्व व राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राज्य मानवाधिकार आयोग व शैक्षणिक संस्थांच्या भूमिका विषद केल्या आहेत. अलीकडे काही संस्था मानवाधिकारांच्या शिक्षणाचे महत्व ओळखून त्याची सुरवात करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मदुराईच्या मानवाधिकार शिक्षण संस्थेने मानवाधिकारांच्या बाबत साक्षरता वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न केले असून १९९७ पासून अनेक शाळांना दत्तक घेतले आहे. हेच उद्दिष्ट ठेवून पुणे विद्यापीठ सन २०१० पासून व्यापक स्तरावर मानवाधिकार शिक्षण देत आहे.

मानवाधिकारांचे शिक्षण दिल्यास जगभरातील समाजासमोर असलेल्या अनेक समस्यांवर उपाय योजण्यासाठी लोक सक्षम होतील व अनुकूल वातावरण निर्माण करून कुठल्याही विरूपण किंवा दैन्याशिवाय प्रत्येकाला आपले जीवन स्वतंत्रपणे व सुखासमाधानाने व्यतीत करता येईल व शांतता व सुरक्षितता सुस्थापित करेल. मानवाधिकारांचे हेच प्राथमिक उद्दिष्ट आहे.

## ड) सामुदायिक (कॉर्पोरेट) क्षेत्राची भूमिका



व्यापार आणि समाजामध्ये अतूट संबंध आहे. कंपन्या एक कायदेशीर व्यक्ती असल्यामुळे त्यांनी त्यांची सामाजिक उत्तरदायित्वांचे निर्वहन करण्याची, भागधारक, कर्मचारी, यांचे अधिकार व दायीत्वे यांचे रक्षण करण्याची, व उत्तम कायदेशीर व्यक्ती होण्यासाठी कायदेशीर व्यवहार करण्याची गरज आहे. जागतिकीकरणामुळे, विज्ञान व तंत्रज्ञानातील विकासामुळे, व अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व कायदेशीर पैलूंमुळे सामुदायिक (कॉर्पोरेट) व्यावसायिकांना आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी सीमापार आपली दृष्टी न्यावी लागली. वर्चस्वासाठीच्या त्यांच्या स्पर्धेत व व्यापार व उदिमाचा विस्तार करण्याच्या त्यांच्या प्रयत्नात समाज व अनेक भागधारकांच्या व कर्मचाऱ्यांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याप्रती असणारी दायीत्वे दुय्यम ठरण्याची शक्यता आहे.

सामुदायिक (कॉर्पोरेट) क्षेत्राच्या वर्तनाचे नियमन करण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये अनेक नियम व विनियम अस्तित्वात आहेत. मात्र शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर व जागतिकीकरणाच्या चौथ्या टप्प्यानंतर सामुदायिक (कॉर्पोरेट) क्षेत्राचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रावर प्रभाव पडला आहेच, पण प्रत्येक क्षेत्रात मानवाधिकारांच्या वाढत्या चर्चेमध्ये, ज्यामध्ये व्यापार सुद्धा समाविष्ट आहे, ते उत्तरदायी सुद्धा आहेत. तसेच व्यवसायाचा विस्तार व विकसनशील जगामधील शासन विषयक अन्य बाबींमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वर्चस्वामुळे संयुक्त राष्ट्रांना मानवाधिकार व व्यापार यामधील वाढत्या संबंधांकडे जास्त लक्ष पुरवावे लागले. सन १९९९ मध्ये जागतिक आर्थिक व्यासपीठाच्या दावोस मधील वार्षिक सभेमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांनी संक्षिप्त जागतिक दस्तऐवज जारी करून त्यांच्या प्रभावक्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय मानवाधिकार जाहीरनाम्यातील मानवाधिकारांचे संरक्षण होण्यासाठी प्रयत्न करण्याचे व मानवाधिकारांचे उल्लंघन

होण्यात त्यांचे सहभागीत्व असणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन केले होते. त्यांनी जागतिक स्तरावर एकमत असलेल्या आंतरराष्ट्रीय कायदेशीर प्रमाणकांवर आधारित दहा तत्वे स्पष्टोच्चारित केली व त्यांचा आदर करून त्यांची अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. सदर तत्वे पुढीलप्रमाणे आहेत –

१. व्यवसायाने त्याच्या प्रभावक्षेत्रात मानवाधिकारांना पाठबळ व संरक्षण दिले पाहिजे.;

२. त्यांची कोणतीही निगमे मानवाधिकारांचा दुरुपयोग करण्यात सहाभागी नसल्याची खात्री करणे.

३. व्यवसायांनी कामगारांचे संघटना तयार करण्याचे स्वातंत्र्य व सामुदायिक सौदेबाजी करण्याच्या त्यांच्या अधिकाराला मान्यता दिली पाहिजे;

४. सर्व प्रकारच्या सक्तीच्या व लादलेल्या श्रमाचे निर्मुलन

५. बालकामगारांचे परिणामकारक निर्मुलन ;

६. रोजगार व व्यवसाय यामधील भेदभावाचे निर्मुलन.

७. पर्यावरणाच्या समस्यांना व्यवसायांनी सावधानतेने पाठबळ दिले पाहिजे

८. मोठ्या प्रमाणवर पर्यावरणीय जबाबदारी प्रवर्तित करण्यासाठी पुढाकार हाती घेणे

९. पर्यावरण पूरक तंत्रज्ञानाच्या प्रसाराला व विकसनाला प्रोत्साहन देणे

१०. व्यवसायांनी खंडणी व लाचखोरी सहित भ्रष्टाचाराच्या प्रत्येक स्वरुपाविरुद्ध लढले पाहिजे.

सदर तत्वांवर आधारून सामुदायिक (कॉर्पोरेट) गृहांना मानवाधिकारांच्या प्रवर्तन व संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाचा जनादेश अंगीकारण्यासाठी पाठबळ देण्याच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रांनी business.un.org संकेतस्थळ सुरु केले. सदर संकेतस्थळाद्वारे विविध सामुदायिक (कॉर्पोरेट) गृहे संबंधित संयुक्त राष्ट्रांच्या संस्थांशी परस्परसंवाद करून मानवाधिकारांच्या प्रवर्तनाप्रती असलेले आपले अधिकार व दायीत्वे जाणून घेतील. मानवाधिकार उच्चायुक्तांच्या कार्यालयाने सामुदायिक (कॉर्पोरेट) गृहांकडून मानवाधिकारांच्या होत असलेल्या उल्लंघनाच्या सादर केलेल्या अहवालांच्या आधारे संयुक्त राष्ट्रांनी सन २००५ मध्ये हार्वर्ड विद्यापीठातील प्राध्यापक जॉन रंगी यांची सदर अहवाल सादर करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांचे विशेष प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली. प्राध्यापक रंगी यांच्या सन २००८ मधील अहवालानुसार विविध क्षेत्रांसोबातच तेल, वायू व खाण क्षेत्रात एकूण उल्लघनांच्या पैकी सुमार दोन तृतीयांश उल्लंघने झाली

आहेत. आपल्या जागतिक दस्तऐवजाचं माध्यमातून संयुक्त राष्ट्रे मानवाधिकारांच्या प्रवर्तनावर देखरेख ठेवण्यासाठी अनेक उपाययोजना करीत आहेत. राष्ट्रांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील व्यावसायिक आस्थापनांनी मानवाधिकार तत्वांची अंमलबजावणी करण्यावर देखरेख ठेवण्याची व त्यासाठी मानवधिकार तत्वांचा आपल्या राष्ट्रीय कायद्यांमध्ये समावेश करण्यासाठी योग्य असे कायदेदुरुस्ती करून कॉर्पोरेट क्षेत्राने त्यांच्या सामाजिक जबाबदारीचा एक भाग म्हणून मानवाधिकार तत्वांचे पालन करण्याचे आवाहन संयुक्त राष्ट्रांनी केले आहे.

व्यवसायांनी सामाजिक हितामध्ये व देशाच्या प्रगतीमध्ये सहभागी असण्याची मोठी परंपरा भारतात आहे. सन २०११ मध्ये भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने व्यवसायांनी ऐच्छिकपणे अंगीकार करण्याच्या सामाजिक, आर्थिक, व पर्यावरणीय दायीत्वांच्या तत्वांचा एक संच (२००९ मध्ये जारी मूळ तत्वे अद्ययावत करून) विकसित केला आहे. सदर तत्वे पुढील प्रमाणे –

Ministry of Corporate Affairs

१. व्यवसायांनी स्वतःचे वर्तन व प्रशासन नैतिकता, पारदर्शकता व जबाबदारीने युक्त असे ठेवले पाहिजे.

२. व्यवसायांनी त्यांच्या जीवनकालामध्ये सुरक्षित व शाश्वत सेवा व वस्तू पुरविल्या पाहिजेत.

३. व्यवसायांनी आपल्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणाचे प्रवर्तन केले पाहिजे.

४. व्यवसायांनी आपल्या सर्व विशेषतः वंचित, असुरक्षित व दुर्लक्षित भागधारकांचे हित जपून त्यांच्या स्वारस्याचा आधार केला पाहिजे.

५. व्यवसायांनी मानवाधिकारांचा आदर केला पाहिजे.

६. व्यवसायांनी पर्यावरणाचा आदर व संरक्षण केले पाहिजे व त्याची पुनर्स्थापित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

७. व्यवसाय जेव्हा सार्वजनिक व नियामक धोरणे प्रभावित करण्यात गुंतलेले असतात, त्यांनी ते जबाबदारीने केले पाहिजे.

८. व्यवसायांनी समावेशित वाढीला व समान विकासाला पाठबळ दिले पाहिजे.

९. व्यवसायांनी ग्राहक व उपभोक्त्यांना जबाबदारीने मूल्यवर्धन अदा केले पाहिजे.

प्रत्येक व्यवसायाने स्वेच्छेने आपल्या प्रत्येक व्यवसायाची सदर तत्वांशी सांगड घालावी अशी विनंती केली आहे. सदर मार्गदर्शक तत्वे जबाबदार व्यवसायाला विविध मार्ग दिग्दर्शन

करतात व तत्वांचे व्यवसायाशी एकत्रीकरण करण्याचे मार्ग व साधने सुचवितात. शासनाने नवी दिल्ली येथे भारतीय कॉर्पोरेट व्यवहार संस्थेची स्थापना केली असून शासन व व्यवसाय यांच्या गरजांवर लक्ष केंद्रित करण्याचे काम सदर संस्था करीत असते. त्याशिवाय कॉर्पोरेट कायदा व प्रशासनाच्या क्षेत्रामधील कायद्यांमध्ये दुरुस्ती अथवा नवीन कायदे करून तत्वांचे एकत्रीकरण करण्यासाठी संस्था पावले टाकत आहे.

व्यवसाय हा समाजाचा एक अविभाज्य हिस्सा आहे व कोणत्याही अपगमाशिवाय मानवाधिकारांचे पालन करणे त्यांचे कर्तव्य आहे. कॉर्पोरेट क्षेत्रात व समाजात अधिकारांचा कोणताही दुरुपयोग न होण्यासाठी व व्यवसायाच्या निकोप वाढीसाठी व्यवसाय संस्थांनी व शैक्षणिक संस्थांनी मानवाधिकारांचे शिक्षण देणे अनिवार्य आहे.

## इ) बिगर शासकीय संघटना

राष्ट्र व लोकांच्या सर्वांगीण विकासामध्ये क्षमता विकसन महत्वाची भूमिका निभावत असते. क्षमता विकासानामध्ये राष्ट्राचा विकास व मानवाधिकारांच्याप्रवर्तनामध्ये महत्वाची भूमिका निभावणाऱ्या सर्व क्षेत्रांमध्ये आणि विशेषतः शिक्षण व आरोग्य क्षेत्रात राष्ट्राने धोरणात्मक नियोजन अंतर्निहित आहे. व्यक्तींच्या बाबतीत क्षमता बांधणीमध्ये अधिकार व दायीत्वांच्या विकसन व ज्ञानाची प्रक्रिया ज्ञात होते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर क्षमता बांधणीमुळे लोकांना हमी दिलेल्या अधिकारांचे मार्ग व साधने सुरक्षित करण्यास सक्षम होतात व लोकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी क्षमता वर्धन करण्याचे राष्ट्रावर दायित्व टाकतात. पुष्कळ




वेळा, अनेक कारणांमुळे राष्ट्रे लोकांच्या अपेक्षांची पूर्तता करू शकत नाहीत व त्यामुळे एक पोकळी निर्माण होते. सदर पोकळी भरून काढण्यासाठी क्षमता बांधणीची संकल्पना साध्य करण्यासाठी बिगर शासकीय संघटना अस्तित्वात आल्या. पोकळी भरून काढण्यासाठी त्या शासनावर दबाव आणतात व समाजातील वंचित वर्गांवर विशेष लक्ष केंद्रित करून हमी दिलेल्या अधिकारांची परिपूर्ती होण्यासाठी धोरणात्मक नियोजन कार्नायची मागणी करतात. थोडक्यात सांगायचे तर बिगर शासकीय संघटना हे सामान्यतः टीकाकार, क्षमता बांधणी करणारे, नवे उपक्रम प्रस्थापित करणारे, समर्थक, व धोरणात्मक भागीदार व विशेषत्वाने मानवाधिकारांचे प्रवर्तन व परिपूर्ती करणारे असतात.

बिगर शासकीय संघटना स्थानिक, क्षेत्रीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवाधिकारांचे प्रवर्तन, संरक्षण व परिपूर्ती करण्यात महत्वाची भूमिका बजावतात. एखाद्या गटासाठी किंवा सर्वसामान्यतः समर्थन, जमवाजमव, क्षमता बांधणी व काम यांच्याद्वारे मानवाधिकारांच्या प्रवर्तानात्मक पैलुंमध्ये सहभागी होण्याची त्यांची मोठी परंपरा आहे. सन १९५० मध्ये आर्थिक व सामाजिक परिषदेने ठराव क्रमांक २८८ (द) द्वारे बिगर शासकीय संघटनांचा विस्तारित केलेला सल्लागाराचा दर्जा हा संयुक्त राष्ट्रांच्या सनदेच्या कलम ७१ मधील उद्दिष्टांशी सुसंगत आहे. आर्थिक व सामाजिक परिषदेने सन १९९६ मध्ये व्याख्यीत केल्यानुसार बिगर शासकीय संघटना म्हणजे संयुक्त राष्ट्रांच्या सनदेच्या उद्दिष्ट, भावना व तत्वांशी सुसंगत कार्य करण्यासाठी, लोकतांत्रिक संघटनात्मक संरचना असलेली व योग्य त्या जबाबदारीच्या यंत्रणेसह त्यांच्या सभासदांच्या वतीने बोलण्यास प्राधिकृत असलेली व त्या क्षेत्रात मान्यता असलेली शासकिय अभिकरणाने किंवा अंतरशासकीय कराराने स्थापित न केलेली, कोणतीही संघटना . सदर निकषां शिवाय सदर संघटना ही ना नफा ना तोटा तत्वावर काम करणारी व जिथे प्रायः स्थापन झाली त्या देशाच्या कायद्यानुसार नोंदणी झालेली असली पाहिजे.

मानवाधिकारांच्या प्रवर्तनासाठी काम करणाऱ्या बिगर शासकीय संघटनांना मानवाधिकार बिगर शासकीय संघटना म्हणून संबोधित करता येईल. सदर प्रकारच्या संघटना मुख्यतः मानवी विकास, माणुसकीच्या व पर्यावरणीय पैलुंसाठी काम करीत असतात. ते प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे काम करीत असतात. काही संघटना एखाद्या विशिष्ट क्षेत्रात काम करण्यात तज्ञ असतात व सद्य अस्तित्वातील आंतरराष्ट्रीय करारांची अंमलबजावणी करण्याची मागणी करतात किंवा एखाद्या विशिष्ट विभागासाठी नवीन नियमांचा मसुदा तयार करण्यासाठी राष्ट्रराज्ये व आंतरराष्ट्रीय संस्थांवर दबाव आणू शकतात. पुष्कळ वेळा स्थानिक पातळ्यांवर आंतरराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याच्या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपिठावरून शासनांवर दबाव आणण्याचा मार्ग त्या निवडतात. राष्ट्रीय पातळीवर कुठल्याही विभागात दुरुपयोग न होण्यासाठी अपेक्षित सुधारणा करून घेण्यासाठी ते नेहमीच आघाडीवर असतात. बिगर शासकीय संघटनांच्या सततच्या लढ्यामुळेच भारतात अनेक नवीन कायदे होऊ शकले व अस्तित्वातील कायद्यांमध्ये सुधारणा होऊ शकल्या. पर्यावरण संरक्षण अधिनियम, महिलांच्या अधिकाराविषयीचे कायदे, समलिंगी स्त्रिया व पुरुषांचे अधिकार, संबंधात राहण्यास मान्यता, अन्नाचा अधिकार व असे अनेक नियम व अधिनियम त्याच्या सततच्या लढ्यामुळे अस्तित्वात येऊ शकले.

बिगर शासकीय संघटनांची वाढत जाणारे महत्व स्वागतार्ह आहे. मात्र भ्रष्टाचार व अन्य दुरुपयोग न करता त्यांनी शासकिय हाताळणीत पारदर्शक पद्धती आणणे गरजेचे आहे. बोधवाक्यापासून अपगम झाल्यास उद्दिष्टे लंगडी होतातच, पण लोक आणि शासन यांचा सुद्धा विश्वस ते गमावतात.

## ४. सारांश

समर्थक गटांच्या भूमिकेवरील सूक्ष्म चर्चेतून मानवाधिकारांच्या प्रवर्तनामध्ये त्यांच्या भूमिकेचे महत्व पुरेसे स्पष्ट झाले आहे. अनेकदा परिस्थितीमध्ये ते समर्थक गट म्हणून काम करतातच, पण प्रत्येक स्तरावर मानवाधिकारनच्या वर्धनासाठीच्या भविष्यातील नीतीगत दृष्टीकोनात सुधारणा करण्यासाठी शासन व आंतरराष्ट्रीय संस्थांना उपाययोजनात्मक यंत्रणा सुचविण्यासाठी एक सावध अभिकरण म्हणून सुद्धा ते काम करतात.

## नमुना प्रश्नोत्तरे

**१. दिनांक २९ जानेवारी १७८० रोजी जेम्स ऑगस्टस हिक ह्या इंगर्ज गृहस्थाने बंगाल गॅझेट सुरु केले व त्याचे लोकप्रिय नाव ................ होते.**

अ. मुंबई न्यूज (आ)

आ. कलकत्ता ॲडव्हायसर

इ. मद्रास इमेजेस

ई. वरीलपैकी कोणतेही नाही.

**२. मोफत कायदेशीर मदतीची रुजवात करण्याचा प्रयत्न १८५१ मध्ये फ्रांस मध्ये झाला असला तरीही सन १८७६ मध्ये पहिली मोफत कायदेशीर मदत संस्था स्थापून ..............ह्या देशाने मोफत कायदेशीर मदतीची बीजे पेरली**

अ. भारत

आ. ब्रिटन (इ)

इ. संयुक्त अमेरिकी संस्थाने

ई. कॅनडा

**३. युनेस्को म्हणजे**

अ. संयुक्त राष्ट, शैक्षणिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक संघटना

आ. संयुक्त राष्ट्रे पर्यावरणीय, सांस्कृतिक व वैज्ञानिक संघटना (अ)

इ. संयुक्त राष्ट्र, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक संघटना

ई. संयुक्त राष्ट्र आर्थिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक संघटना

**४. कायदेशीर मदत व सल्ला अधिनियमाच्या द्वारे सन १९४९ मध्ये ...................... ने मोफत कायदेशीर सल्ल्याची रुजवात केली.**

अ. भारत

आ. ऑस्ट्रेलिया (इ)

इ. इंग्लंड

ई. वरीलपैकी कोणतेही नाही.

**५. मोफत कायदेशीर सल्ला योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी भारत सरकारने सन १९८० मध्ये भूतपूर्व न्यायाधीश............यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली.**

अ. न्यायमूर्ती कृष्णा अय्यर

आ. न्यायमूर्ती गजेंद्रगडकर (इ)

इ. न्यायमूर्ती पी एन भगवती

ई. वरील पैकी कोणतेही नाही.

## निष्कर्ष

प्रथम पुस्तकात मानवाधिकारांच्या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उत्क्रांती व संकल्पनात्मक दृष्टीकोनाची रुजवात करण्यात आली. द्वितीय पुस्तकात सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक दृष्ट्या वंचित गटातील लोकांचे अधिकार व त्यांना सोयीसवलती देण्यासाठीचे मार्ग व साधने पुरवून त्यांना समानतेच्या स्तरावर आणण्यासाठी व अधिकारांची परिपूर्ती करण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची माहिती देण्यात आली आहे.

भारतातील मानवाधिकार व कर्तव्यांच्या मालिकेतील ह्या तिसऱ्या व अंतिम पुस्तकावर एक दृष्टीक्षेप – कायदा, नीती, समाज व अंमलबजावणी यंत्रणा हे दाखवून देतात की आंतरराष्ट्रीय स्तरावर कुठल्याही तत्वांचा व सिद्धांतांचा पुरस्कार केलेला असला तरीही राष्ट्रीय पातळीवर त्याची जोपासना व अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय कायद्यांमध्ये टिकाऊ नातेसंबंध असल्याची खात्री राष्ट्रीय पातळीवरील अंमलबजावणी प्रक्रियेवरून पटते. जगातील लोकांसाठी व राष्ट्रांच्या समुहासाठी कायदेशीर तत्वांच्या वर्धनासाठी राष्ट्रे व त्यांची कायदेशीर धोरणे व अंमलबजावणी यंत्रणा ह्या एक प्रयोगशाळाच असतात.

संबंधित घटनात्मक तरतुदींचे व अंमलबजावणी यंत्रणांचे परीक्षण व मानवाधिकार रक्षणकर्त्यांच्या भूमिकेमुळे मानवाधिकारांच्या प्रवर्तन, संरक्षण व परिपूर्तीसाठी आपण कोणती भूमिका निभावू शकतो याचा प्रत्येक जण विचार करू शकतो. जगातील एका मूल्याधारित, सांस्कृतिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण, व विकसित देशाचे नागरिक म्हणून मानवाधिकारांचे वर्धन करण्यासाठी कुठल्याही पद्धतीने आपला मदतीचा हात पुढे करणे हे आपले सर्वांचेच एक प्राथमिक कर्तव्य आहे.

राज्यघटनेच्या प्रस्तावनेत योग्यरीतीने पुरस्कृत केल्यानुसार न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता खऱ्या अर्थाने साध्य करण्यासाठी मानवाधिकारांनी व राज्यघटनने पुरस्कृत केलेल्या कर्तव्यांचे निर्वहन करण्याची आपल्यापैकी प्रत्येकाने शपथ घ्यायची गरज आहे. कर्तव्यांचे निष्ठेने निर्वहन केल्यास कायद्याने हमी दिलेल्या अधिकारांच्या वर्धानास त्याचा नक्की उपयोग होईल. सदर तत्वज्ञानात अपगम झाल्यास व्यक्तींच्या मुलभूत स्वातंत्र्याच्या वर्धानामध्ये मोठा गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे.

## संदर्भ/निर्देशित संकेतस्थळे


- A.G. Noorani, *Constitutional Questions & Citizens' Rights*, (Oxford University Press, New Delhi ,2006).
- Alice Donald and Elizabeth Mottershaw, *Report On Poverty, Inequality And Human Rights, September 2009*, United Kingdom
- Bethan Cobley, Ed. IDSN-2011 *Report : International Consultation On Caste-Based Discrimination, 29 November - 1 December, Kathmandu · Nepal, International Dalit Solidarity Network*, Denmark.
- Comprehensive Review on the Status of Implementation of Resolution 1540 (2004)
- Corporate Responsibility to Respect Human Rights, Dec. 4-5, 2007,Geneva
- *Corruption and Human Rights: Making the Connection*, International Council on Human Rights Policy,2009
- D. J. De, *Interpretation & Enforcement Of Fundamental Rights*, (Eastern Law House Pvt. Ltd., Calcutta 2000)
- Donald Heisel, *Population and Development : Challenges and Opportunities-Population and Human Rights, Encyclopedia of Life Support System (EOLSS),* New York, United States of America
- G.N. Ray, *The Role of Media in Protection of Human Rights, Human Rights Council*, January 11, 2007, Visakhapatnam
- Granville Austin, *Working A Democratic Constitution : The Indian Experience*, (Oxford University Press, New Delhi, 2000)
- *Human Rights and Poverty Reduction :A Conceptual Framework* , OHCHR United Nations, New York and Geneva, 2004
- Ilas Bantekas & Lutz Oette, *International Human Rights : Law and Practice*, (Cambridge 2013.)
- Inger Ulleberg, The Role and Impact of NGO's in Capacity Development :From Replacing the State to Reinvigorating Education,2009/10, International Institute For Educational Planning, Paris, France
- Jayanth K. Krishnan And C. Raj Kumar, *Delay In Process, Denial Of Justice: The Jurisprudence And Empirics Of Speedy Trials In Comparative Perspective*, *Georgetown Journal Of International Law, Vol, 42, 2011, 747-784*
- Lee Macqueen Paul1 Addressing caste discrimination In Humanitarian Response, National Dalit Watch-National Campaign on Dalit Human Rights (NCDHR), November 2011,New Delhi
- Mandeep Tiwana , Ed. Sara Hossain, *Chennai Judicial Exchange on Access to Justice: A Report,* November 5- 7, 2004, the Commonwealth Human Rights Initiative (CHRI) New Delhi,
- Mandeep Tiwana, Ed. Maja Daruwala, *Human Rights And Policing: Landmark Supreme Court Directives & National Human Rights Commission Guidelines*, April 2005, CHRI, New Delhi

- Marc Titus D. Cebreros, *Empowering The Poor Through Human Rights Based Access To Justice, Asian Regional Consortium for Human Rights-Based Access to Justice, University of the Philippines Law Center.*
- *National Human Rights Institutions :History, Principles, Roles And Responsibilities*, Series No. 4 (Rev. 1), 2010, United Nations Publication, New York and Geneva
- *National Voluntary Guidelines on Social, Environmental & Economic Responsibilities of Business of Business,* Ministry of Corporate Affairs, Government of India, New Delhi, 2011
- Preventing Corruption, Anti-Corruption Policies in Asia and The Pacific
- Reed Boland, Population Policies, *Human Rights, And Legal Change*, The American University Law Review Vol. 44, 1995, 1257-1278
- Richard J. Wilson, Jennifer Rasmusen,Reseached By, Scott Codey *Promoting Justice : A Practical Guide to Strategic Human Rights Lawyering,* International Human Rights Law Group, 2001,Washington, USA,
- Slamming the Courthouse Doors: Denial of Access to Justice And Remedy in America, December,2010, American Civil Liberties Union, New York
- State of human rights in india, 2001, Indian Institute of Human Rights
- Sujata V. Manohar, *T.K.Tope's "Constitutional Law Of India*", 3rd Ed. (Eastern Book Company, Lucknow,2010,)
- Surinder Khanna, *Dalit Women And Human Rights.*, Swastik Publications, Delhi, 2011.
- T.S. Devadoss, "*SARVODAYA And The Problem Of Political Sovereignty*", 1st Ed., 1974, University of Madras
- T.S.N. Sastry, "*India And Human Rights Reflections*", (Concept Publishing Company, New Delhi 2005
- Thomas E. Carbonneau*T*he French Legal Studies Curriculum: Its History and Relevance as a Model for Reform, McGILL Law Journal*, Vol. *25, 1980, 445-477*
- UNIVERSAL DECLARATION OF HUMAN RIGHTS (ILLUSTRATED), by United Nations, United Nations Office in Geneva, (also available in French), ISBN 13: 9789211014921, Sales Number: GV.08.0.2, October 2008.
- Victoria Chioma Nwankwo, *The Role of The Media in Promoting Human Rights: An Analysis of the BBC documentary, 'Chocolate: the bitter truth',* 2011, London.


## Websites Referred:


- Christopher Koliba, Democracy and Education : Schools and Communities Initiative : Conceptual Framework and Preliminary Findings, May 8, 2000, available at http://www.uvm.edu/~dewey/articles/Democonc.html
- Good Governance and Human Rights, available at http://www.ohchr.org/en/Issues/Development/GoodGovernance/Pages/GoodGovernanceIndex.aspx
- Child protection and child rights available at http://www.childlineindia.org.in/child-in-india.htm

- Boca Raton, Sociology: The Basic Principles of Sociology for Introductory Courses., Quick Study. (2000) available at http://sociology.about.com/od/ Disciplines/a/Sociology-Of-Social-Inequality.htm
- The Constitution (Sixty-Fifth Amendment) Act 1990 available at http://indiacode.nic.in/coiweb/amend/amend65.htm
- Khadija Turay : Human Rights and Population Politics in India during the Emergency and at the Present Moment : A Population Policy Transition, available at http://www.irmgard-coninxstiftung.de/fileadmin/user_upload/pdf/Population_Politics/PopPolitics/Turay.pdf
- Meredith McBride : History of Population Control in India available at http://humanrightsinasia.wordpress.coam/2012/07/31/history-of-population-control-in-india/
- Business and Human Rights: A Progress Report available at http://www.ohchr.org/Documents/Publications/BusinessHRen.pdf
- Introduction To Print Media available at http://www.ohchr.org/Documents/Publications/BusinessHRen.pdf
- Missionary Herman Kannada litterateur launched first Kannada Newspaper and Journalism available at http://www.persecution.in/content/ missionary-herman-kannada-litterateur-launched-first-kannada-newspaper-and-journalism
- Justice T. Mathivanan, Judge ,Madras High Court : Legal Aid Issues , Challenges And Solutions -An Empirical Study available at http://www.hcmadras.tn.nic.in/legalaid-issues.pdf
- Introduction And History of NALSA available at http://nalsa.gov.in/
- International Human Rights Advocacy Groups available at http://www.guidetoaction.org/intlgrps.html
- Good Governanace available at http://smilefoundationindia.org/ governance.htm
- Human Rights Bodies - Complaints Procedures available at http://www.ohchr.org/EN/HRBodies/TBPetitions/Pages/HRTBPetitions.aspx#interstate
- http://www.business-standard.com/article/economy-policy/maha-govt-sets-up-committee-to-frame-child-welfare-policy-113051601012_1.html
- http://ncsc.nic.in/files/ncsc/new3/200.pdf
- http://www.persecution.in/content/missionary-herman-kannada-litterateur-launched-first-kannada-newspaper-and-journalism
- http://www.buzzle.com/articles/what-is-distributive-justice.html
- http://www.vegaenviron.org/
- http://sacredheartattheun.org/content/disarmament
- http://www.oijj.org/sites/default/files/images/eventos/agenda_195573.jpg
- http://www.humanrightslogo.net/sites/default/files/styles/galleryfull/public/images/sumssions/11913%2520-%2520hr6.png?itok=3F9Mdt0k

- http://www.sarvodayanano.org/vinobha-bhave.jpg
- http://lucideus.com/images/clients/c20.png
- http://www.ohchr.org/SiteCollectionImages/Design/EN/header_EN.jpg
- http://www.assignmentpoint.com/wp-content/uploads/2013/09/Legal-Aid.jpg
- http://www.mshrc.gov.in/Images/Logo.jpg
- http://www.antya.com/upload/3/NCST.JPG
- http://grist.files.wordpress.com/2010/07/earth-people-population_463x463.jpg
- http://upload.wikimedia.org/wikipedia/en/4/41/Flag_of_India.svg
- http://www.american.com/archive/2011/november/right-to-work-unionism/FeaturedImage
- http://images.mid-day.com/2013/jul/border.jpg
- http://www.boldsky.com/img/2011/09/05-teach-kids-050911.jpg
- http://www.malaysianur.com/wp-content/uploads/2012/04/Brotherhood.gif
- http://www.thecapitalconferencecenter.com/ccc/images/adr_logo.jpg
- http://www.cie-waseda.jp/en/news/international/2658/
- http://www.ejpress.org/ImageGallery/61baa9d5-2e2e-42a4-a00d-552386f858ec.jpg
- http://education.oneindia.in/img/2013/09/02-hrdministry.jpg
- http://2.imimg.com/data2/AQ/JA/MY-2230294/mpj043313900001-250x250.jpg
- http://reflectivepr.files.wordpress.com/2010/03/ngo.jpg
- http://www.keanlaw.com/wp-content/uploads/2011/02/Scales-of-Justice.jpg
- http://www.divineinn.com/images/RedFort.jpg
- http://www.borgenmagazine.com/wp-content/uploads/2013/06/2013-WorldEnvironment-Day-Think-Eat-Save.png
- http://www.viewdigital.org/wp-content/uploads/2013/08/legal-aid-logo.jpg
- http://www.digitalrtimission.com/Judiciary,_Executive_and_Legislative_Affairs.html
- http://www.socialwelfaredepartment.com/wp-content/uploads/2013/06/Domestic-Violence-Act-2005.jpg
- http://4.bp.blogspot.com/-5ee5MxN8KhQ/T0d29dZBZ0I/AAAAAAAABpA/1b-GxZFYVac/s320/media+mikes.jpg
- http://www.google.co.in/imgres?um=1&hl=en&sout=0&biw=1366&bih=667&tbm=isch&tbnid=GfVXmsz5lYwWGM:&imgrefurl=http://www.firstpost.com/tag/uniform-civil-code&docid=mqDI0UjWoUK65M&imgurl=http://cache.daylife.com/imageserve/03F3deyej3fx9/600x609.jpg&w=600&h=609&ei=fCAsUtvOD4PPkwXpjIHQBg&zoom=1&ved=1t:3588,r:17,s:0,i:129

- http://www.ohmeghalaya.com/wp-content/uploads/2013/07/nhrc.jpg
- http://www.indianetzone.com/photos_gallery/32/NationalHuman_22354.jpg
- http://ncw.nic.in/Images/logo-ncw.gif
- http://images.jagran.com/ncpcr-b-29-9-2012.jpg
- http://muslimmirror.com/eng/wp-content/uploads/2013/03/june9-2005.jpg
- http://ncsc.nic.in/upload/logo/logo.png
- http://ncst.nic.in/index.asp?langid=1
- http://www.opportunitiesforafricans.com/wp-content/uploads/2013/05/united-nations-logo.jpg
- http://people.howstuffworks.com/population-six-billion.htm
- http://1.bp.blogspot.com/-bjCOCB3DHNU/UT2qSWMC0mI/AAAAAAAAAVc/BNoVKWq0BVo/s1600/Caste-Discrimination.jpg
- http://www.unescap.org/HUSET/gg/image2.gif
- http://loreal-dam-front-resources-corp-en-cdn.brainsonic.com/ressources/afile/1533-7e431-picture_photo-the-global-compact-we-support-logo.html
- http://parliamentofindia.nic.in/ls/gif/par1.jpg
- http://www.nursinguniforms.net/blog/wp-content/uploads/2011/06/dis.jpg
- http://scm-l3.technorati.com/12/11/28/73551/male-female-equality.jpg?t=20121128160858
- http://jaymans.files.wordpress.com/2012/12/equality_fence.png?w=595&h=488
- http://adam1cor.files.wordpress.com/2010/06/20070828bizreligion_dm_500.jpg
- http://inspirationaldaily.files.wordpress.com/2012/01/mahatma-gandhi-inspirational-daily.jpg
- http://3.bp.blogspot.com/-Q-1351-0hMY/URnujVRq0OI/AAAAAAAAAVI/gJuK4pyaLo8/s1600/fundamental-rights+(1).jpg
- http://www.jharkhand.gov.in/ceo/2005/preamble.gif
- http://www.co.ozaukee.wi.us/sheriff/JailArrest.jpg
- http://leadbihar.wordpress.com/tag/total-revolution/
- http://girlsjustwannahaveguns.com/wp-content/uploads/2012/12/hammer.jpg
- http://4.bp.blogspot.com/-eEZILFw4L44/TyVIEJgN9CI/AAAAAAAAASw/D9XVnH9a5OY/s1600/scmid.gif
- http://supremecourtofindia.nic.in/sciphoto/images/image008.jpg
- http://www.mapsofindia.com/india-images/delhi/landmarks/rashtrapati-bhawan.jpg

- http://reasonsoflife.files.wordpress.com/2008/08/indian-flag-12.gif
- http://qph.is.quoracdn.net/main-thumb-t-285902-50-VvJujkSA2J168g7mmnuzqrvVCnMY8X6z.jpeg
- http://www.lsbauctions.com/771/the-low-commission-fallacy-the-games-other-auction-houses-play/
- http://getfile3.posterous.com/getfile/files.posterous.com/temp-2012-10-01/yFjpyuFblvIdsElCqisqrBvngmDCssfIJegdpshEdFlJuAjCwldhhIoEyjnd/divinejustice.jpg.scaled1000.jpg
- http://www.canstockphoto.com/images-photos/tripura.html
- http://www.city.fukuyama.hiroshima.jp/jinkenheiwashiryoukan/aisatu/mark.gif
- http://www.123rf.com/photo_5744705_hand-discriminating-green-goldfish-isolated-on-white.html
- http://thecalmspace.com/wp-content/uploads/2010/07/Freedom-iStock_000007259315Small.jpg
- http://1.bp.blogspot.com/-clzI5ER2Ed4/UfE9aj5GUxI/AAAAAAAAAL8/VbuzwVDgFNA/s1600/Political+Science.jpeg
- http://4.bp.blogspot.com/-SD2fTTdSEVE/TpvKfpvJYAI/AAAAAAAAARY/UK4mUu1BP5o/s1600/thght948.gif
- http://www.ohchr.org/en/Issues/Development/GoodGovernance/Pages/GoodGovernanceIndex.aspx
- http://www.business-standard.com/article/economy-policy/maha-govt-sets-up-committee-to-frame-child-welfare-policy-113051601012_1.html


❑❑

## लेखकाबाबत थोडेसे

प्रा. डॉ. टी. एस. एन. सास्त्री हे तामिळनाडू डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ चेन्नईचे कुलगुरू असून त्यांना तीन दशकांचा, विशेषतः आंतरराष्ट्रीय कायदा व मानवाधिकारामधील अध्यापनाचा व संशोधनाचा अनुभव आहे.

त्यांनी उत्तराधिकारी राष्ट्रांविषयीचा आंतरराष्ट्रीय कायदा व मानवाधिकारा वरील तीन पुस्तके लिहिली आहेत. अंतरराष्ट्रीय कायदा, मानवाधिकार, व भारतीय राज्यघटना यांच्याशी संबंधित अनेक प्रतिष्ठित नियतकालीकांमध्ये त्यांचे संशोधनात्मक निबंध प्रकाशित झाले आहेत.

त्याचप्रमाणे युरोपियन आयोगाच्या इरास्मस मुंडस कडून शैक्षणिक व सामाजिक कार्याबाबतचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच त्यांना दोन वेळा फ्रेंच सरकारची संशोधनवृत्ती तसेच सन २०१७ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सर्वोत्तम शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे. मानवाधिकारांच्या प्रसारासाठी प्रयत्न केल्याबद्दल भारत आंतरराष्ट्रीय मैत्री संस्था नवी दिल्ली यांचा विजयश्री पुरस्कार त्यांना सन २००५ मध्ये प्राप्त झाला आहे.

त्यांनी तामिळनाडू डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ, चेन्नई व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा येथे आंतरराष्ट्रीय स्वामित्व अधिकार व विधी विभागाचे प्रमुख, तसेच अधिष्ठता, संचालक व परीक्षा नियंत्रक म्हणून सुद्धा काम केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व अन्य विद्यापीठांच्या विविध विद्याशाखा व व्यवस्थापन परिषदेवर सभासद म्हणून काम केले आहे.

पुद्दुच्चेरी विद्यापीठात सन १९९७ मध्ये मानवाधिकार व कर्तव्ये शिक्षणासाठीचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे केंद्र स्थापन करण्यात डॉ. सास्त्री यांनी पुढाकार घेतला. केंद्राचे समन्वयक म्हणून मानवाधिकारांच्या प्रसारासाठी मानवाधिकारातील संशोधनात्मक व शैक्षणिक उपक्रमांच्या व्यतिरिक्त अनेक कार्यक्रम, परिषदा व चर्चासत्रे आयोजित केली.

सध्या ते महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या अभ्यासमंडळाचे सभासद आहेत.

डॉ. सास्त्री यांनी अनेक चर्चासत्रे, परिषदा व कार्यक्रम आयोजित केले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विधी विभागाचे प्रमुख म्हणून विभागाच्या विकासासाठी अनेक प्रशासकीय व शैक्षणिक उपक्रम त्यांनी हाती घेतले. त्यामध्ये १ वर्षाच्या स्नातकोत्तर विधी अभ्यासक्रमाचा समावेश आहे. स्नातकपूर्व अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रम समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अभ्यासक्रमांत कालोचित बदल केले असून परीक्षा पद्धतीमध्ये सुद्धा सन २०१७ पासून सुधारणा केल्या आहेत.


POONA